
# संजय कळाळे

# सायकल यात्रा

# नागपूर ते नेपाळ



आपल्या जन्मापासून मृत्यू पर्यंतचा प्रवास
म्हणजे “आयुष्य”.
हा आयुष्याचा प्रवास प्रत्येक वेळेस
राजमार्गावर होईलच असे नाही.
कधी दगडधोंड्यातून
तर कधी काट्याकुट्यातून,
कधी डोंगर माथ्यावरुन
तर कधी नदीच्या खोल पात्रातून,
कधी पंच पक्वान्न तर कधी मीठ भाकरी,
कधी झोपेला नरम गादी
तर कधी निजेला धोंडा
या अनुभवासाठी सिध्द असावे
हे सांगणारी कथा म्हणजे,
माझी
“नागपूर ते नेपाळ सायकल यात्रा”

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# नागपूर ते नेपाळ सायकल यात्रा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

**यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.**

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

**दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.**

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नागपूर ते नेपाळ सायकल यात्रा

लेखक

संजय वासुदेव कठाळे

# नागपूर ते नेपाळ सायकल यात्रा

## लेखक... संजय वासुदेव कठाळे

पत्ता - 207 , रचना आंगन  अपार्टमेंटस, सुभाषनगर जयताळा रोड,
नागपूर  440022
फोन 94236 30709 ईमेल - sanjaykathale60@gmail.com

Photo courtesy
photographer  shri Gulkari and Camera photo by Sanjay kathale (हे सर्व रोलवाला कॅमेरा वापरून काढलेले फ़ोटो आहेत)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : १२ नोव्हेंबर २०२० (वसुबारस)**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे- आवश्यकआहे.

## ❀ लेखक परिचय ❀



सर्वसाधारण कुटुंबात जन्म घेतलेला मी संजय वासुदेव कठाळे नागपूर येथील रहिवासी. कॉलेजात शिकत असताना नामवंत लेखक व आमचे प्राध्यापक डॉ. शिरिष गोपाळ देशपांडे हे मराठी शिकवत असताना त्यांनी माझी साहित्यात असलेली आवड हेरली व भविष्यात काहीतरी लेखन करावे यासाठी प्रोत्साहित केले.

पुढे शिक्षण व नोकरी याला प्राथमिकता असल्याने नोकरीत स्थिरस्थावर झाल्यावर यवतमाळच्या संस्थेने १९८६ साली घेतलेल्या एकांकिका लेखन स्पर्धेत “ज्वालामुखी” या एकांकिकेला लेखनाचा तिसरा पुरस्कार मिळाला व आपण काही लिहू शकतो हा आत्मविश्वास मिळाला

त्यानंतर “द वेब” हि एकांकिका विदर्भ साहित्य संघाच्या “युगवाणी” मासीकात प्रकाशित झाली. मुंबईतील चतुरंग प्रतिष्ठान तर्फे

आयोजित स्पर्धेत “निवड” ही एकांकिका लेखन करून रंगमंचावर सादर करण्यात आली. तसेच “सत्याग्रह व अतिथी” या दोन एकांकिकांना पद्मगंधा प्रतिष्ठान तर्फे आयोजित लेखन स्पर्धेत २००४ व २००५ साली लेखनाचे प्रथम पुरस्कार मिळाले.

पुढे संसार चक्रात अडकल्याने मोठे नाही परंतु बारीक सारीक लिखाणं होत राहिले. त्यानंतर सन २००० साली कविता लिखाणास सुरूवात झाली. अनेक कथा, कविता, वैचारिक लेख इ. तरुण भारत या दैनिकात व योगप्रकाश, केशवप्रकाश, संवाद आदी मासीकात प्रकाशित झाले. २०२० साली सेवानिवृत्त झाल्यावर लॉकडाऊनच्या काळात हे प्रवास वर्णन कुलदेवतेच्या कृपेने लिहून पुर्ण झाले. ते आपल्या वाचनासाठी सादर करीत आहे.

आपला 🙏

संजय वासुदेव कठाळे 💐💐

## ۞ लेखकाचे मनोगत ۞

प्रवास वर्णन हे सत्य घटनेवर आधारित समृध्द झालेले अनुभवपुष्पच असते. प्रवासात आलेले थरारक प्रसंग, सुखदुःखाचे क्षण आपणास खूप काही शिकवून जातात. कुठल्याही प्रसंगी खचून न जाता धेर्याने तोंड देत अडचणीतून मार्ग कसा काढावा हे सांगतात.

सायकलने परदेशात केलेला प्रवास करताना तुम्हाला अनुकूल नसलेल्या वातावरणात कसे राहावे ते आपण शिकत जातो. विविध गावे तेथील माणसे, त्यांचे राहणीमान व स्वभाव कसे आहेत, लोकांशी कसे वागले पाहिजे, कुठलीही आर्थिक स्थिती नसताना लोक आपुलकीने आपल्याला जेऊ घालतात. आपले शारिरिक बळ, बुध्दीमत्ता याची चाचणी या प्रवासामध्ये होत असते. घराबाहेर पडल्यावर कुठल्याही सुखसोयी शिवाय कसे राहावे हे शिकविते. एकप्रकारे जीवन शिक्षणाचा पाठच शिकविते. हा अनुभव तारूण्यात प्रत्येक व्यक्तीने घेतल्यास पुढील आयुष्यात येणाऱ्या संकटाना सामोरे कसे जावे याचा धडा मिळेल.

हि गोष्ट आहे १९८० च्या दशकातली, नेपाळ सारख्या अनोळखी

देशात, हिमालयातील उत्तुंग पर्वतावर विदाऊट गेअरच्या सायकलने प्रवास करणे हे धाडसाचेच काम होते. असे म्हणतात ना “हिमंत असली तर देव ही पाठिशी असतो” असा अनुभव नित्य येत होता. अरुंद महामार्ग, संपर्काची कसलीही व्यवस्था अथवा साधने (मोबाईल) जवळ नसताना आपल्या शहरापासून दूर सतत ४० दिवस सायकलने ३४०० कि.मी. प्रवास कसा केला असेल असा प्रश्न आजच्या पिढीला नक्की पडेल.

जेमतेम २५ वर्षाचे वय कधी एकट्याने वा कुटुंबा सोबत ही एवढा लांबचा प्रवास न केलेला मी, नागपूरच्या बाहेर कुणी ओळखीचे नसतांना, आजच्या सारखा गुगल मॅप ही मदतीला नव्हता. घरची सामान्य परिस्थिती, कमवता कमवता शिक्षण पुर्ण करुन बॅंकेत लागलेलो, त्याकाळी पगार ही आजच्या

सारखे नव्हते. बाकी मित्र तर शिक्षण घेणारेच होते.

केवळ १० रु. किमतीचा भारताचा नकाशा त्यात नेपाळची राजधानी काठमांडू सोडून अन्य माहिती नाहीच. म्हणजे नेपाळ मध्ये कोणत्या गावातून प्रवेश करायचा, मध्ये कोणती गावे पडणार, राहण्याची व्यवस्था होईल काय? काहीच माहित नव्हते. केवळ ट्रॅव्हल कंपनीची जुजबी माहिती वरुन आखलेला प्रवास आराखडा व १५ पैसे किमतीचे पोस्ट कार्ड हेच संपर्काचे साधन होते. सायकलच्या कॅरीयर

वर असलेल्या बॅगेत मावेल एवढे सामान व खिशात मोजके पैसे याचे पाठबळावर केलेला, अनेक घाट, नद्या यांना पार करत ऊन, वारा, पाऊस, थंडी याचा सामना करत झालेला प्रवास धाडसाचा होता. अनेक मित्रांना वाटत होते आपणही यावे. पण एवढा मोठा प्रवास करु देण्यास त्यांचे पालक तयार नव्हते.

उत्तर प्रदेश सारखा मागास भाग, जेथे जातीपातीचे राजकारण गावोगावी पेटत असे तर बिहार सारख्या प्रदेशात दिवसा ढवळ्या लूटमार होत असे. अश्या परिस्थितीत आमच्या माता पित्यांनी विश्वास व्यक्त करुन जाण्यास परवानगी दिल्यामुळेच हे शक्य झाले.

हिंदूस्थान सारख्या देशात अतिथीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, "अतिथी देवो भव", हि भावना घराघरात रुजली आहे. आपल्या घासातला घास काढून द्यावा हि परंपरा आम्हाला संस्कृती शिकवून जाते. व्यवसायाचा विचार न करता पोटभर खाऊ घालणारे हॉटेल मालक व कुठलिही ओळख नसताना छोटाश्या घरात आसरा देणारे नेपाळी कुटुंब यांचे ऋण कधीच फेडता येणार नाही.

भारतीय युवक चौकटीच्या बाहेर जाऊन धाडस करण्यास घाबरतो हा गैरसमजही खोटा ठरविणारा हा सायकल प्रवास होता. तसेच केवळ २१ रुपयात चौघांचे जेवण झालेले वाचून विश्वास बसणार नाही. ५०

पैशात नास्ता व ३० पैशात चहा होत असे हे वाचून खोटे वाटेल. केवळ चारशे रूपयात रिलवाला रंगीत कॅमेरा, १७८ रुपयात इम्पोर्टेड जिन्स, १० रु. गौगल, ५ रुपयात बेल्ट हे दर वाचून विश्वास बसणार नाही पण आजही माझ्या डायरीत नोंदी आहेत.

हे पुस्तक लिहिण्याचा उद्देश केवळ प्रवासवर्णन नसून त्याकाळी असलेली भौगोलिक स्थिती, लोकांचे राहणीमान, जातीपातीच्या प्रथा खानपान, आतिथ्य, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची स्थिती ३४ वर्षापूर्वी कशी होती हे अवगत करुन देणे हा आहे.

आजच्या भारतीय युवकाने केवळ शैक्षणिक योग्यता, नोकरी, व्यवसाय याच विचारासोबत कुठल्याही साधना शिवाय जगण्याचे अनुभव कसे घ्यावेत हे सांगणारी हि गाथा आहे. आपल्या जीवनात कधीही नैराश्य येणार नाही हे सांगणारी कथा आपणास नक्की आवडेल हा विश्वास मला वाटतो.

१९८६ साली केलेला प्रवास आजच्या पेक्षा खूप वेगळा होता. हे प्रवास वर्णन मी लिहून समाज माध्यमा द्वारे प्रकाशित करावे असा अनेक मित्र नातेवाईकांचा आग्रह होता म्हणून तो लिहून फेसबुकवर ३९ भागात प्रकाशित केला. त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. वाचक पुढील भागाची उत्कंठेने वाट पहात असत व हे लेखन पुस्तक रुपाने

प्रकाशित करावे असा आग्रह करीत होते. हा अनुकूल प्रतिसाद बघता हे अनुभव अधिकाधिक लोकांपर्यंत जाऊन त्यांना यातून साहस करण्याची प्रेरणा मिळावी एवढाच मानस याप्रसंगी व्यक्त करतो.

या लेखनासाठी माझे मित्र अनिल माहूरकर, दिनेश बक्षी व मोहन जोशी यांनी मला प्रोत्साहित केले. पत्नी सौ शुभलक्ष्मी, मुलगा आदित्य, सुन सौ वैष्णवी व माझी गोड नात मैत्रेयी या सर्वांनी सहकार्य करुन मला लेखन करण्यास भरपूर वेळ दिला व चि.आदित्यने पेज सेटिंग, प्रुफ रिडिंग या कामात सहकार्य केल्यामुळे हे लेखन पुर्ण करु शकलो.

संजय वासुदेव कठाळे



## 🙏 अर्पण पत्रिका 🙏

आपला भारत देश खूप सुंदर आहे. निसर्गाने मुक्तपणे या भारतभूमीला समृद्ध केले आहे. अनेक महापुरुषांनी या मायभूमीत जन्म घेऊन आपला इतिहास संपन्न केला आहे. अश्या भारतमातेचे दर्शन प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी केले पाहिजे हा विचार ज्यांनी माझ्या मनात रुजविला व पुर्ण करण्यासाठी भक्कम असे पाठबळ ज्यांनी दिले ते माझे माता-पिता

**श्रीमती प्रतिभा वासुदेव कठाळे**

**व श्री वासुदेव आण्याजी कठाळे**

यांना भक्तीपुर्वक हे अनुभवपुष्प अर्पण.

# 🚴 नागपूर ते नेपाळ सायकल यात्रा 🚴

## लेखक - संजय वासुदेव कठाळे

### -यात्रिक-

**संजय वासुदेव कठाळे**

**अनिल माहूरकर**

**प्रदिप कुळकर्णी**

**प्रशांत रथकंठीवार**

## पुर्व तयारी

हि गोष्ट आहे १९८६ सालची. म्हणजेच आजपासून ३४ वर्ष मागे. जेव्हा आजच्या सारखे फोर-लेन रस्ते नव्हते वा विशेष प्रकारच्या सायकली पण नव्हत्या. मनात जिद्द होती सायकलने थेट काठमांडू (नेपाळ) गाठायची, साथीला होता परम मित्र अनिल माहूरकर.

तत्पूर्वी नागपूर - आदासा, नागपूर - रामटेक, नागपूर - नवेगाव बांध, नागपूर–माहूर अश्या छोट्या-मोठ्या सायकल सहली केल्यामुळे एका दिवशी १५० कि. मी. सायकल चालवू शकतो एवढा अनुभव व विश्वास होता. त्याप्रमाणेच प्रतिदिन प्रवासाची तयारी करायची होती. यापुर्वी एवढा मोठा प्रवास बसने किंवा आगगाडीने सुध्दा केला नव्हता हे विशेष.

सुमारे दिड वर्षापूर्वी नागपूर नागरिक सहकारी बॅंकेत रुजू झालो होतो. संघ आणि भाजपचे काम सुरू होते आणि त्याच वर्षी तृतीय वर्ष संघ शिक्षा वर्गात प्रबंधक म्हणून जावे असा आदेश मिळाला. सकाळी अधिकोष विभागात काम करुन रेशीमबागेतून सदर येथे कामास जावे

लागे व पून्हा संध्याकाळी अधिकोषाचे काम झाल्यावर वेळ मिळत होता. रोज विविध शहरातून आलेले स्वयंसेवक पैसे काढण्यास येत असत त्यांचा परिचय झाला होता. त्यातूनच नेपाळ पर्यंत जाण्याचा विचार समोर आला. मग पुस्तक भांडारातून १०रु. किंमतीचा भारताचा नकाशा विकत घेतला आणि रात्री भोजनोत्तर नकाशा समोर ठेवून मुक्काम करावयाचे टप्पे ठरवित आखणी करत गेलो. अनेक ट्रॅव्हल एजंटला भेटून माहिती घेत जाण्याचा मार्ग निश्चित केला. त्याप्रमाणे त्या त्या मुक्कामा वरील स्वयंसेवक परिचित झाले, पत्ते घेतले व येण्यासंबधी पुर्व सुचना ही दिली.

प्रवासाला जाण्याची तारीख निश्चित झाली १५ऑक्टोबर १९८६. पुर्ण प्रवासाला ४० दिवस लागणार होते. तेवढया रजा जमा नव्हत्या, मग त्या काळचे भाजप पश्चिम मंडळाचे अध्यक्ष व नगरसेवक श्री गजानन राव बापट व नगरसेवक यांच्या मदतीने तत्कालीन अध्यक्ष श्री कैलासचंद्र अग्रवाल यांचेशी भेटून काही पगारी तर काही बिन पगारी रजा मंजूर करवून घेतल्या. रॅले कंपनीची जुनीच सायकल दिलीप सायकल स्टोअर्स मधून तयार करुन घेतली. काही सामाजिक संस्था, बॅंक, सहकारी यांनी मदत केली. मा. महापौर, मा. कमिश्नर, मा. कलेक्टर यांचे कडून ओळख पत्रे घेतली. संघ मुख्यालयातून पत्र मिळाले त्यामुळे अनेक ठिकाणी निवासाची सोय होणार होती.



एव्हाना आमचे सोबत दोघे मित्र प्रदिप कुळकर्णी, प्रशांत रथकंठीवार यांनी ही प्रवासाला येण्याची तयारी दाखविली. आवश्यक कपडे सामान औषधे सोबत घेतली आणी तो दिवस उजाडला बुधवार दि. १५ ऑक्टोबर १९८६.

तर प्रवासाची दमदार सुरवात कशी झाली, किती पल्ला गाठला काय त्रास झाला, कशी मजा आली बघू या **पुढील भागात.**

## सिवनी कडे प्रयाण

बुधवार दि १५ ऑक्टोबर १९८६

सकाळी ८ वाजता स्वा. सावरकरांना अभिवादन करुन प्रयाण करावयाचे ठरले होते. पण जेव्हा आम्ही चौघे नागपूरच्या शंकर नगर चौकात पोहचलो तेव्हा पेट्रोल पंपासमोरील छोट्या आयलंडवर निरोप समारंभाचे आयोजन आमच्या प्रेमीजनांनी केले होते. अर्थात याची आम्हाला कल्पनाही नव्हती. आम्हाला शुभेच्छा व आशिर्वाद द्यायला समाजातील महनीय व्यक्ती तेथे उपस्थित होते. त्यामध्ये प्रामुख्याने मा. सहसंघचालक श्री बापूरावजी वऱ्हाडपांडे, नागपूर नागरिक सहकारी बॅंकेचे माजी अध्यक्ष श्री अण्णाजी उधोजी, आमच्या धरमपेठ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष श्री गोविंदराव पुराणिक, डॉ. ब. ग. पांडे, नगरसेवक श्री गजानन राव बापट, नगरसेवक श्रीरंग खेडकर, नगरसेवक राजन भूत, नागपूर नागरिक सहकारी बॅंकेचे जनरल मॅनेजर श्री सुभेदार साहेब माझ्या बॅंकेतील माझे कर्मचारी सहकारी चंदूजी घरोटे, धनंजय वैद्य, रवि सहस्त्रबुद्धे, अजय कारेमोरे, जयंत गर्गे, गिरीश व्यास (आज मा. आमदार आहेत पण तेव्हा आवडते अधिकारी होते) तसेच मित्र दिनेश बक्षी, हेमंत अभ्यंकर, श्याम घरोटे आदी अनेक मित्र, आमच्या चौघांचे आईवडील व शिवाजीनगर नागरिक मंडळाचे अनेक सदस्य आम्हाला शुभेच्छा द्यायला उपस्थित होते.



सुरवातीला आमच्या चौघांतर्फे सायकल यात्रेसंबंधीची माहिती मी सर्वांसमक्ष मांडली त्यात आमचा प्रवास कोणत्या मार्गाने व कसा होणार हे सांगितले व प्रवासाचा मुळ उद्देश आपला भारत देश कसा आहे त्याचे दर्शन घेणे व त्याबरोबर प्रत्येक प्रदेशातील लोकांचे राहणीमान, भाषा, विचार आचार याचा अभ्यास करणे इ. माहिती दिली. त्यानंतर सर्वच मान्यवरांनी आमचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे संचालन चंदुजी घरोटे यांनी केले. त्यानंतर आम्ही स्वातंत्र्य वीर सावरकर यांना अभिवादन करुन मार्गस्थ झालो.


DMI NOTE 8
MP QUAD CAMERA

आज आमचा पहिला टप्पा शिवनी १३० कि. मी. एवढा होता. तत्पुर्वी नागपूर शहराचे ग्रामदैवत टेकडीचा गणपतीचे दर्शन घेऊन पुढे जायचे ठरवले होते. सोबत आमचे अनेक मित्र नागपूर सिमेपर्यंत सोडायला आले होते. आम्ही दर्शन घेऊन पुढे निघालो तेव्हा ९. ३० वाजले होते. आम्ही कामठी रोडने सिवनीकडे रवाना होण्यापुर्वी सोबत आलेल्या मित्रांना वापस जाण्यास सांगितलं ते सारे भावूक झाले होते. प्रत्येकाला वाटत होते आमचे बरोबर प्रवासाला यावे पण ते प्रत्यक्षात शक्य नव्हते. आम्ही भावूक मनाने सर्वाचा निरोप घेतला व मार्गस्थ झालो.

आज प्रवासाचा पहिला दिवस. आजचे डेस्टीनेशन शिवनी (म. प्र) हे होते. तसे आम्ही कोणत्या दिवशी कोणत्या गावाला पोहचू याचा तक्ता तयार केला होता व त्याप्रमाणे त्या त्या गावातील परिचितांना पोस्ट कार्डने कळवले होते. सायकल वर फलक लावला होता. “सारे जहाँ से अच्छा हिंदोस्तां हमारा”, आमचा पेहराव. मागच्या कॅरीयर वर लावलेले सामान यावरुन आम्ही सायकल प्रवासाला चाललो आहे हे सर्वांना दिसत होते. साधारण सकाळी १०.३० च्या सुमारास आम्ही कामठी येथे पोहोचलो. तेथे रथकंठीवार परिवार व अन्य नागरिकांनी आमचे स्वागत केले. चहापान झाले व आम्ही मार्गस्थ झालो. कन्हान नदी पार करुन पुढे निघालो तेव्हा रस्त्यावर फार वर्दळ नव्हती पण ऊन खुप होते. चटके जाणवत होते. पुढे मनसरला विश्रांती घेऊन दुपारी दोनच्या सुमारास देवलापारला पोहोचलो तेथे गुप्ता मेडीकल स्टोअर्स

चे गुप्ताजी यांनी स्वागत केले. एका झाडाखाली बसून घरून आणलेले डबे उघडून वनभोजन केले. थोडाश्या विश्रांती नंतर प्रवास सुरू केला, आता साराच जंगल भाग असल्याने उन्हाची दाहकता ही कमी झाली होती रस्त्यावर मोठी वाहने ट्रक, बस सोडता वाहतुक नव्हती बोलता बोलता खवासा आले व पुढे सिवनी घाट सुरू होणार होता त्यावेळी इतका रुंद वा फोरलेन रस्ता नव्हता. एखाद्या ट्रक समोरून घाटातुन येत असेल तर सायकल स्वारास फारशी जागा मिळत नसे. पण तरीही आम्ही सर्वांनी ठरविले हा ११ कि. मी. चा घाट एकदाही न उतरता चालवत जायचे. निसर्गाचे सौदंर्य पाहत व उत्साह खुप असल्याने आम्ही घाट सहज पार केला. पण फार दमछाक झाली होती. पायात गोळे भरुन आले होते थोडा वेळ विश्रांती घेऊन पुन्हा निसर्गाला न्याहाळत सिवनी येथे पोहोचलो. आता अंधारुन आले होते त्यावेळी स्ट्रीट लाईटची व्यवस्था फार नव्हती. पोलवर पिवळे बल्ब लावत असत. रस्तात विचारत सिवनी संघ कार्यालयात पोहचलो. त्याकाळी मोबाईल फोनची व्यवस्थाही नव्हती. तेव्हा संघ कार्यालय माडीवरच्या कौलारु घरात होते. तेथील लोकांनी भव्य स्वागत केले. आमचे सामान स्वतः घेऊन आले. आम्ही चौघेही खुप थकलो होतो पायात गोळे आले होते पावले निट पडत नव्हती. आमची अवस्था पाहून त्यांनी खुप व्यवस्था केली सर्वांनी विचारपूस चर्चा केली एवढयात स्थानीक स्वयंसेवक यांच्या घरुन भोजन आले. यथेच्छ भोजन करुन थोड्या गप्पा गोष्टी नंतर निद्राधीन झालो.

तर मंडळी पुढचा टप्पा जबलपूर अंदाजे १४५ कि. मी. हा होता तिथे दुसऱ्या दिवशी पोहोचलो किंवा नाही काय गंमती झाल्या असतील ते पाहू या **पुढील भागात**

"भारत माता की जय".

## जबलपूरला प्रयाण

गुरुवार दि. १६ आक्टोबर १९८६

पहाटे जाग आली तेव्हा प्रवासाचा थकवा गेला होता. सकाळचे आटोपून नव्या उमेदीने निघणार तत्पुर्वी सिवनीचे स्वयंसेवक श्री अग्रवाल यांनी जलपान करून जावे हा आग्रह धरला. त्यांचा मान ठेवून जलपान होताच छपारा कडे रवाना झालो. आज सिवनी ते जबलपूर असा प्रवास होता. यात चार घाट पार करावे लागतात. सकाळी ९. ३० वा. पहिला छपारा घाट उतरत वैनगंगा नदी पार केली छपाराला पुन्हा चहापान घेऊन लखनादौन कडे रवाना झालो. हा घाट ही खुप बिकट होता. घाट उतरून एका हॉटेल पाशी थांबलो,

तेव्हा हॉटेल मालकाने विचारले ‘‘सायकलसे कहा जा रहे हो"

मी उत्तरलो ‘‘नेपाल को’’.

‘‘इतनी दुर, भाई वो तो बहूत दुर है, कितना होगा?’’

‘‘आना जाना चार हजार कि. मी. ’’ अनील बोलला.

‘‘बापरे! बहूत हिम्मत कर ली आप लोगोने. चलो खाना यही खा लिजीये, फिर आप तो हमारे मेहमान हो’’ हॉटेल मालक.

पुढे बोलला “भरपेट खाना पैसे मत देना”. शिवाय त्याने खोव्याची मिठाई खाऊ घातली व पैसेही घेतले नाही.

आज ऊन खुप होते आम्ही प्रवासाच्या नियमाप्रमाणे कान डोके झाकून पंचा बांधला असल्याने त्रास झाला नाही. आज थोडी परिक्षेचा दिवस होता चार घाट असल्याने दमछाक होणार होती. सायकल चालवण्याचा कितीही अनुभव असला तरी सुरवातीचे काही दिवस पाय दुखतात नंतर पाय फ्री होतात, झालेही तसेच लखनादौन नंतरचा धुमा घाट खुप कठीण होता. घाट उतरून बरगी या गावाकडे येत असताना आमचा सहकारी प्रदिपला ऊन लागले, सायकल पुढे चालवेना, संध्याकाळ ही झाली होती आणि जबलपूर अजून २० कि. मी. लांब होते, आपण इथेच थांबू या असे प्रदीप म्हणाला. मग सर्वांनी एका ढाब्यासमोर सायकली उभ्या केल्यात. बरगीला मुक्काम करायचा निर्णय झाला आणि मुक्काम कुठे करावा शोधाशोध सुरु झाली, जवळच राम मंदिरात रामलिला सुरु होती तिथे शक्य नव्हते त्यामुळे पोलीस स्टेशनला विचारावे असे ठरले. चौकशीसाठी गेलो तर हवालदार म्हणाला “सफरनामा कहा है?"

आम्ही बुचकळ्यात पडलो “सफरनामा काय आहे?”. आम्ही आमचे ओळखपत्र दाखवल प्रवासाची माहीती दिली. तेव्हा तो बोलला “यहा कोई इंतजाम नही है, कही और धुंढो”.

पुन्हा ढाब्यावर वापस आलो. पहिले जेवण घेऊ मग पाहू असे ठरले. जेवताना आमचे बोलणे ढाबा मालकाने ऐकले व म्हणाला “आरे भाई, सामने सरकारी विश्रामगृह है वहा चले जाव इंतजाम हो जायेगा”.

म्हणतात ना परमेश्वर बरोबर मार्ग सुचवतो तसेच झाले. विश्रामगृहाचा चौकीदार भला माणूस होता. जेव्हा आम्ही सायकलने नेपाळ प्रवासाला जातोय असे सांगितले तेव्हा कुठलाही चार्ज न घेता मुक्कामाची व्यवस्था झाली. आम्ही आमचे बिछाने पसरले व उद्याचा प्लॅन ठरवला, एका दृष्टीने चांगलेच झाले बरगीला मुक्काम केला कारण आम्हाला भेडाघाटला आधी जायचे होते, जबलपूरला पोहचलो असतो तर पुन्हा वापस यावे लागले असते. नर्मदा नदी पार करताच भेडाघाटला जायचा रस्ता आहे त्यासाठी जबलपूरला जावे लागत नाही. “जो होता है वो अच्छे के लिये होता है”, असे म्हणून निद्राधीन झालो. तर भेडाघाटला नक्की काय झाले. पुढे प्रवास कसा झाला हे पाहू या **पुढील भागात**. .

## भेडाघाटचे मनोरम दर्शन

शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर १९८६

सायकल प्रवास हा नेहमी सकाळी प्रारंभ करून संध्याकाळच्या आत संपवायचा आमचा प्रयत्न असायचा पण कधी कधी तो लांबायचाही. पण आज मात्र थोडा कमीच प्रवास होता. नेहमीप्रमाणे प्रातःकर्म आटोपून बरगी घाट उतरून पुढे जाताच नर्मदा मैया चे दर्शन झाले. आमच्यासाठी तर ते प्रथम दर्शन खुप विलोभनीय होते. अथांग व थोडा खळबळता प्रवाह सकाळी पाहताच आनंदी करून गेला तेव्हाच ठरवले पहिले भेडाघाट दर्शन, धुवांधार धबधबा आणि नर्मदा मैया स्नान करायचे मगच जबलपूरला जायचे.

मैयावरचा पुल पार केला आणि डावीकडे असणाऱ्या मेडिकल कॉलेज त्याला वळसा घालून आमच्या सायकली भेडाघाटकडे वळविल्यात. नुकतीच शरद पौर्णिमा झाली असल्याने वातावरणात सुखद गारवा होता. प्रवासातला होणारा त्रास आता जाणवत नसल्याने सगळे रमत- गमत आनंद घेत सायकल चालवत होते. त्यात भेडाघाटमध्ये नर्मदा मैयाच्या जवळ केव्हा पोहचलो ते कळलेच नाही.

“अहाहा!” काय सुंदर धबधबा, मैयाचे पात्रातून तयार झालेला जलप्रपात पाहून डोळ्याचे पारणे फिटत होते. जणू दुधाची नदीच दरीत कोसळते आहे असेच दृश्य दिसत होते. खरोखर काही काळ भान हरपून डोळ्यात साठवतच आम्ही स्नानासाठी जलात प्रवेश केला. मैया च्या गारेगार जलाने अंग अंग पुलकित झाले. मैयाचे जल खाली कोसळत येणारा सुंदर नाद ऐकत रहावा असा गोडवा त्या नादात होता. जल खाली पडत असताना जलबिंदूचे तुषार चहूबाजूनी पडत होते व त्यावर कोवळ्या ऊन्हाची किरणे पडून इंद्रधनुष्याचा भास होत होता. त्या आल्हाददायक वातावरणात आम्ही खूप वेळ स्नानाचा आनंद घेतला. शरीराचा थकवा पार पळाला होता, पण नदीतून बाहेर पडूच नये असे वाटत होते. पण मोह आवरुन पुढे जाण्याचा निर्णय घेतला. लगेच आवरुन नर्मदा देवी मंदिरात दर्शन घेतले. कारण भुक ही लागली होती. गरमागरम पोहे खाण्याचा आनंद घेत नर्मदा मैयाचा परिसर न्याहाळत होतो. सर्वत्र संगमरवर दगडानी बांधलेले हे निसर्गाचे रुप अवर्णणीय होते. नदी पात्रात संगमरवर दगडापासून तयार केलेल्या कलाकृती विकण्यासाठी येत होते. सुंदर सुंदर नक्षीदार वस्तू नावाच्या पाट्या कोरुन देत होते. घेण्याची इच्छा झाली, पण आम्हाला पुढे प्रवास करायचा असल्यामुळे जवळ बाळगणे शक्य नव्हते. मोह आवरता घेऊन मार्गस्थ झालो. पुढे स्टेट बँकेच्या गढ शाखेत ट्रॅव्हलर चेक तयार करुन घेऊन जबलपूर शहराकडे वळालो. जबलपूरचे संघ कार्यालय राईट टाऊन भागात आहे तिथे नानाजी देशपांडे यांनी स्वागत केले.

जबलपूर कार्यालय प्रशस्त असून राहण्याची उत्तम व्यवस्था होती, पण भोजन व्यवस्था नव्हती. संध्याकाळी आम्ही महाराष्ट्र हायस्कूल मार्गे गोल बाजार परिसरात पोहचलो. यथेच्छ भोजन करुन कार्यालयात पोहोचलो. दुसऱ्या दिवशी मैहेर येथील देवीचे दर्शन घेऊन मुक्काम करायचा असा विचार ठरवून झोपी गेलो.

आपण ठरवतो एक व होते भलतेच असे कधी कधी प्रत्येकाचे बाबतीत घडते. तर आमच्या बाबतीत किस्सा काय घडला ते पाहु या **पुढील भागात**.

## झुकेहीला धाब्यावर मुक्काम

शनीवार दि. १८ ऑक्टोबर १९८६

काल भेडाघाट पाहून आल्यावर रात्री ९ वाजता झोपलो होतो. त्यामुळे पहाटे जाग आली. प्रातःकर्म आटोपून कार्यालयातील परिपाठीप्रमाणे प्रातःस्मरण व गितेचा १४ वा अध्याय म्हणून झाला. खुप ताजेतवाणे वाटत होते. आम्ही सामानाची बांधाबांध केली. मित्रांनो अश्या सायकल प्रवासात आपले कपडे आंथरुण पांघरूण आवश्यक सामान सारा बिस्तरा सायकलवर घेऊनच फिरावे लागते तिथे स्पेशल रुम पंलग पंखा आदी व्यवस्था नसते. अंधार झाल्यावर जिथे मिळेल तिथे रात्र काढावी लागते, कधी मंदिरात तर कधी ढाब्यावर तर कधी एखाद्या घरात आसरा मागावा लागतो. या भारत वर्षात म्हणा की नेपाळ मध्ये अशीच रात्र काढावी लागली ते पुढील भागात येणारच आहे. पण आज ही आमचा मुक्काम कोठे राहील असे नक्की ठरवता येत नाही. पण हे ही मात्र खरे की असे वेगळे अनुभव सर्व लोकांचे वाटूयाला यावेत. म्हणजे कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही वातावरणात सोयी अभावी रात्र काढण्याची सवय होते ते आता पुढे पाहूया. तर आम्ही आदरणीय नानाजींचा निरोप घेऊन कटनीच्या दिशेने प्रयाण केले.

शरद ऋतुचे आगमन झाल्यामुळे हवेत नैसर्गिक गारवा सुरु झाला होता आणि आज रस्ता ही खुप चांगला होता. सायकल चालवतांना पाय दुखणे कमी झाले असल्याने वाहन वेगात चालले होते. सकाळची वेळ असल्याने रस्त्यावर वाहतूक पण फारशी नव्हती, सायकल चालवण्यात आज मजा येत होती. अंदाजे ५० कि. मी. चालवून झाले होते. सकाळी ९ च्या दरम्यान एका गावात थांबून नास्ता करुया असा विचार आला तोच रस्त्याच्या कडेने एक झोपडी वजा स्वच्छ असे हॉटेल दिसले.

तेव्हा प्रशांत म्हणाला, ‘‘आपण इथे नास्ता घेऊ या".

काही हरकत नाही " अनिल म्हणाला.

प्रदिप व मी पण होकार भरला. मध्य प्रदेशात साधारणतः सकाळचा नास्ता पोहे व जोडीला गरमागरम जलेबी असा असतो. नेहमीप्रमाणे अनिल ने ऑर्डर केली. हॉटेल ची मालकीन एक मध्यम वयीन महिला होती तिने आमचा सर्वांचा अवतार पाहिला. मडगार्ड काढलेल्या सायकली, कॅरीयरवर सामानाची हॅंडबॅग पायात जोडे, कुणी हाफपॅंट तर कुणी ट्रॅकपॅन्ट असा वेष घातलेले, घामेजलेले चेहरे पाहून एमपीच्या लहेजात म्हणाली,

‘‘कौन गाँव के हो’’

मी उत्तर दिले "नागपूर, महाराष्ट्र से’’

“अरे बाप रे! ये साइकिल पे कहा जा रहे हो?”

“नेपाल जा रहे अम्माजी" प्रदिप म्हणाला.

“मतलब कौन देस?" अम्माजी बोलल्या.

“यहाँ से बहूत दुर है अम्माजी. दुसरा देस नेपाल. पशुपतीनाथ भगवान का दर्शन करने जा रहे है”.

तीला बहूदा पशुपतीनाथ कळाले असावे म्हणून ती म्हणाली, “अच्छा आव, जलेबी खाओगे?”

“हा हा अम्माजी पोहा भी देना साथमे”

अम्माजींनी गरमागरम प्लेट टेबलावर ठेवायला नोकराला सांगितले. आम्ही भरपेट आनंद घेतला. खरोखर खुप छान चव होती. चहा मातीच्या कुल्हडमध्ये देण्यात आला. चहाची चवही अप्रतिम होती. चहा पिऊन झाल्यावर कुल्हड चहाच्या भट्टी शेजारी ठेवत विचारले.

“कितने पैसे हुए अम्माजी?”

तश्या अम्माजी ओरडल्या “अरे! अरे! वो कुल्हड ऊधर रखो”.

“ये हमारा चुल्हा अपवित्र कर दिया, दुर खडे रहो, चुल्हा को छूना मत”.

आमच्यासाठी हा प्रसंग नविन होता. आम्ही एकदम स्तब्ध झालो. हळूच विचारले “क्या हूआ अम्माजी?”

तश्या अम्माजी उत्तरल्या “अरे! कौन जात के हो? कौनसे धर्मसे? पता नही हमारा धर्म भ्रष्ट कर दिया”.

मला तिचा रोख कळला या भागात छुआछूतचे प्रस्थ आहे, हे ऐकून माहित होते. म्हणून मी म्हणालो.

अम्माजी “डरनेकी बात नही हम उँचे जात के है”.

तशी अम्माजी ना हायसे वाटले. लगेच विचारले “कौन जातसे?”

“ब्राम्हण, पंडित जात के आम्माजी”.

तसा आम्माजीचा पारा खाली उतरला. लगेच सावरत म्हणाली “माफ करना बेटा, हम गाँव के गँवार लोग पहचान नही पाये, माफ कर देना”.

मी आवरते घेत पैशाचे विचारले तशी जवळ येत पाया पडत म्हणाली

“पैरी पौना महाराज. हम सुबह बामन से पैसा नही लेते. पाप पडेगा”

आमच्या मनात विचार आला आमच्या ऐवजी दुसऱ्या जातीच्या माणसाला येथे काय वागणूक मिळत असेल?

आम्ही निरोप घेत पुढे निघालो. साधारण ४२ कि. मी. चे अंतर पार करून कटनीला एक वाजता पोहचलो. भोजनालय शोधत रेल्वे स्टेशन पाशी गेलो. कटनीला थांबायचे असे आमच्या नियोजनात नव्हते त्यामुळे तेथील संघ कार्यालयाला तसे कळवले नव्हते व थांबायचा पण विचार नव्हता मग हॉटेलची शोधाशोध करुन जेवण आटोपून निघालो तर साधारण किरकोळ शरीर यष्टीचा एक युवक कुडता पायजामा असाच पेहराव घालून बाजूने चालला होता. तेव्हा अनिलच्या मनात आले याला संघ कार्यालयाचा पत्ता विचारावा म्हणून तो म्हणाला "अरे! आता जेमतेम २ वाजले आहेत, आपण संघ कार्यालयात जाऊ काय?"

"काही हरकत नाही", मी म्हणालो.

अनिलने त्याला विचारले तेव्हा तो संघ कार्यकर्ताच होता. तो म्हणाला"चलो मेरे साथ".

त्याच्या मागोमाग कार्यालयात पोहचलो. दरम्यान त्याने आमची चौकशी केली होती. आम्ही तेथे जाताच श्री अरविंद नेताम प्रचारक यांनी स्वागत केले. प्रवासाची चौकशी केली. तेव्हा अनिल म्हणाला "नागपूर से आये और नेपाल जा रहे सायकलसे और संघ के स्वयंसेवक है".

एवढे बोलल्या वर त्यांना खुप आनंद झाला. नागपूर च्या स्वयंसेवका बद्दल भारतभर आदराचे स्थान असते. तेव्हा म्हणाले "भोजन करके जाईये, अभी व्यवस्था करता हू".

तसे प्रदिप म्हणाला "अभी भोजन लेकर आये", मग म्हणाले "फिर विश्राम करलो".

आम्ही ही जरा झोपायच्या मुड मध्ये होतो, जेवण ही जरा जास्त झाले होते. म्हणालो "ठीक है" असे म्हणून आम्ही झोपी गेलो. गेले तीन दिवस सतत प्रवास झाल्यामुळे व सकाळी जवळ पास ९२ कि. मी. अंतर पार केल्यामुळे आम्हाला गाढ झोप लागली. चार वाजेनंतर झोप उघडली. सर्वांना जागे करुन पुढे जाण्याची तयारी करुन अरविंदजींचा निरोप घेऊन मय्यरकडे रवाना झालो.

साधारण पंधरा कि. मी. चालवून झाले असेल तर अनिलच्या सायकलचे पायडल जाम झाले. त्यामुळे वेग घेता येईना तेव्हा समोर सायकलचे दुकान पाहुन दुरुस्ती करुन पुढे जाऊ असे ठरले. पुढे लवकरच झुकेही (मोड) येथे सायकल चे दुकान पाहून थांबलो. दुरुस्ती होईपर्यंत दिवस मावळला व हिवाळ्याचे दिवस असल्याने अंधार झाला होता. झुकेही हे तेव्हा छोटेशे गाव होते. सात नंबरचा वाराणसी हायवे असल्याने जागोजागी ढाबे होते. तसे सायकलचे दुकानाचे बाजूलाच "श्री गुरुजी शाकाहारी भोजनालय" होते, दोरीने विणलेल्या

लाकडी खाटा टाकलेल्या होत्याच. एवढया वेळात आमच्या हालचालीकडे ढाबा मालक शर्माजीचे लक्ष होतेच त्यांनी चौकशी केली. तेव्हा आम्हाला पुढे मैहरला जायचे आहे असे सांगितले.

तसे ते म्हणाले "इयासे अडतालीस कि. मी. दुर है मैहर, बाबुजी रात हो गई है. रास्ते में अंधेरा भी है. ऐसा करो यही ढाबे पे रुक जाव. शुध्द शाकाहारी भोजन है. आम्ही तिथेच थांबायचा निर्णय घेऊन छान

दालफ्राय तंदुरी रोटी असे भोजन करुन निद्राधीन झालो. मी सुरवातीला म्हणालो होतो "मुसाफीर हू यारो ना घर है ना ठिकाणा", यहा चलते हि जाना है, चलते जाना" आता लक्षात आले असेलच या गमती जमतीमुळे आम्ही मैहर ला पोहचलोच नाही. मोकळ्या वातावरणात खुप छान झोप झाली. पण मैहरला काय झाले ते पाहू या **पुढच्या भागात**

## मैहरच्या शारदा देवीचे दर्शन

रविवार दि. १९ ऑक्टोबर १९८६

आज अनपेक्षित पणे एक असा प्रसंग घडला. त्याचा आनंद वेगळाच होता, त्याचे झाले असे की आम्ही नेहमीप्रमाणे आवरुन पुढे जाण्याची तयारी सुरु केली, तोच मागून आवाज आला "भैयाजी जा रहे हो क्या?"

"हां जी", मी उत्तरलो.

आमची तयारी पाहिली असावी. कारण काल रात्री भोजन झाल्यावर ढाबा मालक शर्माजी बराच वेळ आमच्याशी गप्पा मारत होते. आम्ही इतका लांबचा सायकल प्रवास करतोय याचे त्यांना कौतुक वाटत असल्याने एक प्रकारचा आत्मिक बंध त्यांच्या आणि आमच्यात तयार झाला होता. त्याला अनुसरूनच ते म्हणाले "

"भैयाजी, ऐसे जाना नही रुकिये, आप जलपान करके ही जाईये".

"इतनी सुबह तो नास्ता नही करते" - अनिल

"कोई बात नही" दुध तो ले सकते हो"

त्यांचा आग्रह पाहून आम्ही थांबलो. शर्माजीच्या नोकराने पाच मिनिटांत गरमागरम दुधाचे ग्लास समोर ठेवले. त्यात काजू बादाम व

जायफळाची पुड घातली होती. दुध प्राशन करुन निघणार तोच शर्माजी एका वाटीत भिजवलेले कुंकू घेऊन आले. सर्वांना कुंकूम तिलक करुन जोरदार घोषणा दिली "जय माता दी".

"आम्हीही जोरदार प्रतिसाद दिला, "जय माता दी".

एका अनोळखी प्रदेशात एवढी आत्मियता क्वचितच अनुभवायला मिळते. पण परमेश्वर तुमची व्यवस्था करतच असतो हा अनुभव आम्हाला पदोपदी येत होता. पुनश्च हरी ओम आम्ही मैहरकडे रवाना झालो. वाटेत सभागंज या गावी गरमागरम पकोडे व चहाचा आस्वाद घेऊन सकाळी ९. ३० ला मय्यरला पोहोचलो. मैहरला शारदा देवीचे मंदिर मोठ्या पहाडावर असून सुमारे ६०० पायऱ्या चढून वा टेंपोने जावे लागते. अग्रवाल धर्मशाळेत जाऊन स्नान केले व अनवाणीच दर्शनाला निघालो. पायऱ्या चढायला सुरवात केली तेव्हा ऊन तापले होते व पायऱ्या पण खुप उंच उंच असल्याने दमछाक

होत होती. गडावर पोहोचलो तेव्हा १२ वाजले होते. दर्शन घेऊन बाहेर आलो तर माध्यान्ह आरती सुरु झाली. आम्ही आरतीत सामील झालो. लयबध्द आरती व देवीचे सुंदर रुपाने मन प्रसन्न झाले.

पायऱ्या उतरत असताना आम्हाला वेगळाच प्रकार पाहायला मिळाला. एका पुरुषाने स्वतःला जमिनी खाली गाडून घेतले होते फक्त मान तेवढी वर होती. लोक भक्ती भावाने पैसे टाकत होते, तर तेथील पुजारी काही लोकांना गंडे दोरे बांधून पैसे उकळत होते. अंधश्रध्दा

माननारे व त्यांना फसवणारे यांचे जणू संमेलन भरले आहे काय असे वाटत होते. सर्वदूर लाल रेशमी दुप्पटे डोक्यावर बांधून “जय माता दी” हा जयघोष करत होते. तर एका बाजूला बकरे बळी देण्याचे प्रकार सर्रास चालू होते. एका बाजुला अनेक परिवारांचा वेगवेगळ्या चुली मांडून स्वयंपाक चालू होता. वेगवेगळ्या पदार्थाचे सुगंध येत होते. ते पाहून आम्हांला भुक लागली म्हणून आम्ही पायऱ्या उतरून खाली आलो व हॉटेलची शोधाशोध केली. पण तिथे मिठाई, पेढे व नास्ता यांची दुकाने होती. त्यामुळे, सामान घेऊन पुढे २४ कि. मी. अंतरावर पाटण या तालुक्याच्या गावी पोहचलो तेव्हा चार वाजले होते, त्यामुळे जेवण मिळण्याची वेळ निघून गेली होती. मग नास्ता घेऊन बराच वेळ टाईम पास केला, त्यात पुढे रिवा या गावी पोहोचायचे आहे हे ध्यानात राहिले नाही. निघालो तेव्हा जवळपासच्या गावातील गुराखी गाईचा कळपाला हाकलत चालले होते. रस्त्यात अडथळा निर्माण होत होता. पुढे पुढे असे अनेक गुरांचे कळप चालले होते. त्यांना चुकवत चालत असताना अंधार झाला. रीवा हे शहर लांब वर दिसत होते. वाहतूक ही वाढली असल्याने आम्ही उशीरा रीवा कार्यालयात पोहोचलो सर्वांनी स्वागत केले, आमची विचारपूस झाली व जवळच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रांत अधिवेशनात जाण्याची सुचना मिळाली. अधिवेशन स्थळी श्री कमलाकरजी व जुगराजजी द्विवेदी यांनी आमचे स्वागत केले. रंगमंचावर मनोरंजनाचे कार्यक्रम चालू होते ते थांबवून आमचा परिचय करुन देण्यात आला आम्ही पण आमच्या

अभियानाची माहिती दिली उत्साहाने जयघोष देण्यात आले. त्या स्थळी भोजनाचा आनंद घेऊन मुक्काम केला. तर उद्याचा प्रवास आहे प्रयाग येथे जाण्याचा तिथे जाताना व पोहचल्यावर रात्री जेवण घेताना शर्यत लागली जास्तीत जास्त पोळया खाण्याची व बिल पाहून तर अधिक गंमत आली ते पाहूया **पुढील भागात.**

## प्रयागराज मध्ये प्रवेश

सोमवार दि. २० ऑक्टोबर १९८६

सुप्रभातम! नेहमीप्रमाणे पहाटे उठून प्रवासाची तयारी केली. स्थानिक पदाधिकारी श्री कमलाकरजी, जुगराजजी व विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते यांनी कुकुंम तिलक करुन "भारत माता की जय", "वंदे मातरम" च्या जयघोषात निरोप दिला व प्रवासाला लागलो.

अंदाजे २० कि. मी. अंतरावर मनगवा हे गाव येते इथून पुढे एक रस्ता बनारसला तर दुसरा प्रयागला जातो. आम्ही प्रयागच्या रस्त्याने चालू लागलो. थोडे अंतर पुढे जाताच रस्ता बरेच ठिकाणी उखडलेला होता. रस्ताचे काम ही चालू होते. रस्ता खडबडीत असल्याने सायकलचा वेग कमी होत होता. काही भाग पहाडी व चढ उताराचा असल्यामुळे श्रम ही लागत होते तरीही गढ, गंगेव व चाकघाट चढून सोहागी या गावात उतरलो. येथुन चित्रकुट हे स्थान जवळ असून रामायण कालीन "तमसा" नदी पार करुन उत्तर प्रदेशात प्रवेश करतो. सिमेवर भव्य प्रवेशद्वार आहे. सिमेवर आमचे व सामानाचे चेकिंग झाले. एव्हाना भुक लागली होती व रस्ता खराब असल्याने थोडी विश्रांतीची गरज होती. एका ढाब्यावर सायकली उभ्या केल्या. आम्हाला पाहून खानसामा म्हणाला "आइये, महाराजजी गरमागरम आलू पराठे लिजीये".

"महाराजजी" म्हटल्यावर जरा चमकलो कारण इथे छुआ छुत खुप पाळल्या जाते. पण उच्च वर्णियांना मान दिला जातो. अनपेक्षितपणे कपाळावर हात गेला मनात म्हटले, "याला कसे कळले आपण महाराज आहोत म्हणून". कपाळावर हात जाताच हाताला कुंकू लागले तेव्हा लक्षात आले, या कुंकूमुळे महाराज म्हटले असावे. मग काय पराठ्याचा आनंद घेत पुढे निघालो. मार्गात नैनी हे शहर मागे टाकत प्रयाग येथे यमूना नदीचा पूल पार करु लागलो. हा पुल इंग्रज कालीन असून वरुन रेल्वेचा पुल आहे तो पार करुन पुढे आलो तर माझे परममित्र श्री अशोक मालवीय आम्हाला घ्यायला आले होते. आम्हाला पाहताच त्यांना खुप आनंद झाला व आम्हाला रस्ता दाखवत प्रयाग राज शहरातून जाऊ लागले. शहरात मोठा दुतर्फा रस्ता असून सिव्हिल लाइन्स भागात संघाचे पुर्व सरसंघचालक प. पू. रज्जूभैया यांच्या निवासस्थानी संघाचे कार्यालय आहे तेथे येऊन पोहोचलो.

खुप निटनिटके व स्वच्छ कार्यालय पाहून मन प्रसन्न झाले. प्रसन्न मुद्रेने स्वागत झाले. निवासाची व्यवस्था झाली. सर्वांनी गंगेच्या थंडगार पाण्याने स्नान केले. थकवा निघून गेला व सकाळी फक्त पराठेच खाल्ले होते त्यामुळे कडाक्याची भुक लागली होती. अशोकजी एका शाकाहारी भोजनालयात घेऊन गेले खरी गंमत इथेच आहे की हॉटेल

मध्ये जाताच अशोकजींनी मालकाला आमचा परिचय करुन दिला. नागपूरहून नेपाळला सायकलने जातो आहे असे सांगितले. नागपूरचे स्वयंसेवक आपल्या हॉटेल मध्ये आले याचा विशेष आनंद झाला, खुष होऊन म्हणाले "भरपेट खाईये खाना सिर्फ ५ रु. " अशोकजींचा उपवास असल्यामुळे ते जेवणार नव्हते.

इथे थाली प्रकार नव्हता व हॉटेलात कांदा लसूण चालत नाही. जेवणाला आलू, परवर व रस्सा आलू गोबी अशी भाजी व पोळया असा मेनू होता. सलाद म्हणून मुळा व लोणचे होते. पाच रुपयात भरपेट भोजन म्हटल्यावर मग विचारायलाच नको साधे पण रुचकर जेवण होते आणि भुक ही लागली होती. पोळया म्हणजे फुलके छोटे छोटे होते. साधारण पाच सहा पोळया झाल्यावर जरा जिवात जीव आला आणि प्रदिपला लहर आली तो म्हणाला "चल लगी शर्यत कोण जास्त पोळया खातो". झाले सर्वांनी पोळया खाण्याचा सपाटा लावला. वेटर पोळया वाढून पुढे जात नाही तो परतताना त्याला आवाज जात होता "भैया रोटी लाव". तो पोळया आणत होता व लगेच संपत होत्या. १० पोळया झाल्यावर मी थांबलो. वेटरला लक्षात आले इथे शर्यत चालू आहे हे पोळया खाण्याचे थांबवत नाही आहेत. वेटरने पुन्हा एक चळत आणून ठेवली व सांगितले, " भैयाजी रोटी में अभी दस मिनट टाईम लगेगा. सब्जी भी नई बन रही है".

खरे तर हा इशारा होता पण पोरं थांबायचे नाव घेईना. वेटरने मालकाला इशारा केला. मालकाने पण खुणेनेच सांगितले, “जाने दो”. तोपर्यंत तिघांच्या १२ पोळया खाऊन झाल्या होत्या. मी मात्र माघार घेतली होती. वेटरने पून्हा पोळयाची चळत आणून ठेवली. मग मात्र मी सर्वांना थांबायचा इशारा केला. शेवटी अनिल १४, प्रशांत १५ व प्रदिप १६ असा रेकॉर्ड करुन थांबले. प्रदिपने शर्यत जिंकली होती. हात धूवून मालकाला पैशाबद्दल विचारले ते म्हणाले “सिर्फ २१ रु”. आम्ही मात्र बुचकळ्यात पडलो. तर खरा प्रकार आम्ही नागपूरचे सायकल प्रवासी व अशोकजींचे मित्र होतो हा होता. आम्ही चालत चालत कार्यालयात पोहोचलो अशोकजींनी उद्या येतो सांगून आमचा निरोप घेतला व आम्ही निद्राधीन झालो.

उद्या त्रिवेणी संगम, आनंद भुवन, कंपनी पार्क पाहून मुक्काम करु असे ठरले पण झाले भलतेच. ते काय झाले ते पाहू या **पुढिल भागात**.

## त्रिवेणी संगमावर स्नान

मंगळवार दि. २१ ऑक्टोबर १९८६

कार्यालयाच्या परिपाठी प्रमाणे सकाळी प्रातःस्मरण आदी गतिविधीत सामील झालो. त्यानंतर स्नान करुन त्रिवेणी संगमाकडे निघालो हे. हिंदू धर्म भाविकांचे श्रध्दा स्थान. भारतातल्या तीन पवित्र नद्यांचा संगम. पश्चिम दिशेकडून वाहणारी भगवान श्री कृष्ण यांची आवडती नदी यमूना व उत्तर दिशे कडून येणारी परम पावन गंगा व यमूनेच्या प्रवाहात विलीन होणारी सरस्वती यांचा संगम. असंख्य भारतीयांच्या मनातली आकांक्षा असते संगम स्नान करण्याची असे स्थळ. दोन नद्यांच्या संगमामुळे तयार झालेला विस्तीर्ण वालूकामय प्रदेश फार दुर पासून दृष्टीस पडतो. याच जागेवर कुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते. प्रयाग व वाराणसी येथे पंडे लोकांचे मोठे प्रस्थ आहे. एक कि. मी. पासूनच एक पंडा आमच्या मागे लागला "बाबूजी नाव करलो". आम्ही वाळवंटात सायकली उभ्या करुन नाव ठरवली. दर होता फक्त पाच रु. प्रती व्यक्ती. त्यात येणे जाणे व स्नान होईपर्यंत थांबणे असे ठरले. नेहमी नावा यमूना नदीतूनच चालतात. कारण यमूना नदी ही संथ असून खोल असल्याने काळेशार पाणी आहे. याउलट गंगा नदीच्या प्रवाहाला वेग असून पाणी भूरकट आहे. ठरवल्याप्रमाणे नावेत बसलो नावाडी पंडा चांगला होता. नाव चालवता चालवता आम्हाला संगमा विषयी माहिती देत होता.

“बाबूजी, यमूनाजी बोहोत गहरी है, कुछ अंदाजा नही. बुढे इन्सान जैसी शांत तो गंगाजी तो चंचल लडकी जैसै. उसमे तैरना खतरेसे खाली नही. इतना उसकी धारा तेज है”

तिकडे नद्यांची नावे सुध्दा आदरार्थी घेतात यमूनाजी, गंगाजी असे घेतात.

त्याच्या रंजक कथा ऐकताना प्रदिपला लहर आली. त्याने विचारले. “सरकारी रेट तो तीन रुपया है. आपने तो पाच रुपया लिया”.

पंडा लगेच म्हणाला, “हमरा नाम रामप्रसाद है झूट नही बोलुंगा, आखीर पापी पेट का सवाल है, दिनमे चार छह सवारी मिलती है इसका कुछ पैसा नावमालिक को देना होता है. जो बचता है उसमे गुजारा कर लेते है. बारीश मे नाव नही चलती. अब बताओ, आपको हिफाजतसे लेकर जाना मैया मे इस्नान करवाना, रुकना पडता है और फिर वापीस ले आना सब करना पडता है”

त्याच्या बोलण्यात सत्यता होती म्हणून आम्हीही पुढे बोललो नाही. तो मात्र नाव चालवत असताना आम्हांला माहिती देत होता सुनो, ये यमूनाजी बहूत गहरी है अब यहा पर दो सौ फिट गहरी है. आगे और गहरी.

एवढे ऐकल्यावर उत्सुकता आणखी वाढली थोडे पुढे गेल्यावर प्रशांतने विचारले,

“रामप्रसादजी यहा कितनी गहरी है?”

“इहाँ, चारसौ फिट से कम नही”.

हे अंतर जवळपास दीड कि. मी. लांब आहे. संगमाजवळ जसे जसे जातो तशी खोली अधिक वाढत जाते. संगमाजवळ पोहचताच रामप्रसाद म्हणाला, “बाबूजी यहा नहा लो”.

संगमावर लाकडी प्लॅटफॉर्म उभारणी करुन स्नानाची सोय केली होती व त्याला दोर बांधले होते. पलीकडे जाऊ नका अशी सक्त ताकीद तेथे उभे आसणारे पंडे देत होते. आम्ही स्नानासाठी कपडेच न नेल्यामुळे संकोच करत होतो.

ती अवस्था पाहून नावाडी म्हणाला “बाबूजी, नहा लो. यहा तो स्नान करने देश के कोने कोने से लोग आते है और आप मना कर रहे है”.

आता मात्र एकंदरीत माहौल पाहता स्नान करण्याची इच्छा झाली.

असे म्हणतात इच्छा तेथे मार्ग! मग काय? माझ्या जवळ कानाला बांधायला मोठा पंचा होता. नावेवर कपडे ठेवून मनसोक्त स्नानाचा

आनंद घेत राहिलो. गंगेच्या शितल व निर्मळ पाण्याने अंग अंग ताजेतवाने झाले.

बराच वेळ आम्ही पाण्यातून बाहेर येत नाही हे पाहून नावाडी म्हणाला, "चलिये बाबूजी, देरी हो रही है".

मग मात्र आम्ही पंचा उपयोगात आणून कपडे बदलले व पुढे निघालो. मार्गात बडे हनुमानजीचे दर्शन घेऊन "आनंद भुवन" कडे निघालो.

"आनंद भुवन", पंडित नेहरु राजकारणात व्यस्त असताना श्रीमती कमला नेहरु व इंदिरा नेहरु यांचा बराच काळ या ठिकाणी व्यतीत झाला ती इमारत. त्यांच्या स्मृती खुप छान पध्दतीने जतन करुन ठेवल्या होत्या. मग पाहिले "जवाहर प्लॅनेटोरियम" हे आनंद भुवनला लागून असलेले प्रेक्षणीय स्थळ आहे. आकाशगंगेतील सर्व नक्षत्राची रोचक माहिती मिळते असा हा हॉल संपूर्ण वातानुकुलीत बैठक व्यवस्था खुप चांगली आहे. नक्षत्रगंगा पाहत असताना इथे एक गंमत झाली रोजचे झालेले सायकल प्रवासाचे श्रम व थंडगार वारा सुखदपणे घेत असताना आम्हा चौघांनाही गाढ झोप लागली. कार्यक्रम संपल्यावर लोकांनी आम्हाला उठवले.

आता आमचे पुढचे स्थळ होते "कंपनी पार्क" चंद्रशेखर आझाद यांनी इंग्रजांच्या हाती जिवंत सापडू द्यायचे नाही म्हणून स्वतःच्या

हाताने गोळी चालवून भारतमातेच्या चरणी आत्माहूती दिली ते स्थळ, नतमस्तक झालो. शासनाने दुर्लक्ष केलेले स्थळ असे म्हणता येईल. सध्या काय स्थिती आहे? माहित नाही.

दुपारी पुन्हा अशोकजी मालवीय यांचे सोबत आम्ही कालच्याच हॉटेल मध्ये भोजन केले पण काल सारखा प्रकार झाला नाही. कार्यालयात पोहोचलो तेव्हा तीन वाजले होते. थोड्या विश्रांती नंतर पुढे जाऊन उद्याच्या प्रवासाचे अंतर कमी करावे असा विचार आला. कारण प्रयाग वाराणसी हे अंतर १६७ कि, मी होते व प्रयाग मधिल प्रमुख स्थाने पाहून झाली होती आणि वेळही हाताशी होता. कार्यालय प्रमुख आनंदजी यांच्याशी चर्चा करुन पत्र घेऊन ४० कि. मी. अंतरावर हंडिया या गावी जायचे ठरवून निरोप घेतला तेव्हा चार वाजले होते.

हंडिया हे गाव नॅशनल हायवे नं २, ग्रँड टॅक रोड असे नाव असलेल्या मार्गावर आहे. वाराणसी – पठाणकोट असा महामार्ग असून दुतर्फा निलगिरीची झाडे हे वैशिष्ट्य आहे. रस्ता खुप चांगला असल्याने तासभरात आम्ही हंडियाला पोहोचलो. तिथे संघ कार्यालयात शिवमुरतजी, माणिकजी व रणबहादुरसिंग यांनी स्वागत केले. कार्यालय हे छोटेशेच होते. त्यात हे प्रचारक व काही विद्यार्थी राहत होते. त्यात आम्हा चौघांची भर पडली. आम्ही नागपूर चे स्वयंसेवक असल्याने आमचे आतिथ्य जोरात होत होते. विशेष आनंदित होते. आमच्याशी गप्पा मारुन माणिकजी यांना

त्यांचे गावी जायचे असल्यामुळे त्यांनी निरोप घेतला व उद्या येतांना माझ्या घरी थांबून जलपान करुन पुढे जावे असे निमंत्रण हि दिले.

थोड्या वेळातच सर्वांसाठी गरमागरम भोजन आले. पण आधी तुम्ही चौघांनी जेवायला बसावे असा आग्रह केल्यामुळे आम्ही जेवायला बसलो. प्रवासात आमचा आहार वाढलाय याचे भान न राहता जेवलो, पण बाकी लोकांसाठी पुरेसे अन्न शिल्लक राहिले नाही हे आमच्या लक्षात येताच आम्हाला बरे वाटले नाही. आमचे चेहरे पाहताच शिवमूरतजी म्हणाले, "कोई बात नही. हम फिर व्यवस्था कर लेंगे".

पहा स्वतः दुसऱ्या घरचे जेवण करुन संघकार्य करणारे प्रचारक अश्या वेळी मिळेल ते खाऊन आतिथ्य करतात तेव्हा त्यांचे समोर नतमस्तक व्हावे असे वाटते. त्यांनी शिल्लक अन्नातच जेवण केले आणि आमच्या बरोबर गप्पा मारतच झोपी गेले.

उद्या वाराणसीला जायचे, जाता जाता माणिकजी यांच्या बरौत या गावी जायचे असे ठरले. उद्याच्या भागात एक अविस्मरणीय घटना घडली. ती वाचल्या नंतर संघ स्वयंसेवक हे इतरांपेक्षा वेगळे आणि त्यागमय जीवन कसे व्यतीत करतात. ते पाहू या **पुढील भागात**.

## वाराणसी शहरात प्रवेश

बुधवार दि. २२ ऑक्टोबर १९८६

काल हंडिया येथे शिवमूरतजी यांनी केलेले आतिथ्य लक्षात राहावे असे होते. याचा अर्थ खुप पंचताराकिंत सुविधा होत्या असे नव्हे. पण जी आत्मियता अनुभवास आली ती विसरता येणार नाही. स्वतः अर्धपोटी राहून अतिथींना पोटभर खाऊ घातल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. आपल्याकडे जे तुटपुंजे आहे त्यातला अर्धा तुकडा अतिथींना देणे ही मनाची विशालता शहरामध्ये दिसत नाही. पण साधी दोन खोल्यांची जागा त्यात शिवमूरतजी व विद्यार्थी असताना आम्हा चार लोकांना सामावून घेऊन आदरातिथ्य करणे हे सामान्य काम नव्हते.

आज उठायला उशीरच, म्हणजे ५. ३० वा. जाग आली. पण गाढ झोप झाल्याने प्रसन्न वाटत होते. सकाळचे आवरुन आम्ही प्रवासाला निघणार तोच शिवमूरतजी गरम चणे, पेढे व चहा घेऊन आले. इतक्या सकाळी गोड खाण्याची सवय विदर्भातील लोकांना नाही. पण शिवमूरतजी यांचा मान ठेवत चणे, पेढे, चहा याचा आनंद घेतला.

सामान सायकल वर बांधून माणिकजीच्या, “बरौत” या गावी निघणार तोच शिवमूरतजी म्हणाले,

“चलो मै भी आपके साथ बरौत तक चलता हू”.

“बरौत” हे गाव हंडिया पासून १० कि. मी. अंतरावर आहे. म्हणजे २० कि. मी. जाणे येणे सायकल ने होणार होते. हि सहज बाब नव्हती. पण त्यांचा उत्साह पाहून आम्हीही म्हटले, “चलिये” सोबत निघालो.

सकाळची वेळ असल्याने त्यात हिवाळा सुरु झाल्याने हलकी थंडी हवा असताना आम्ही माणिकजीच्या बरौत या गावी कधी पोहोचलो ते कळले नाही.

माणिकजी आमची वाट पाहत बाहेर उभे होते. जोरदार स्वागत झाले. त्यांचे रस्त्याला लागूनच राहते घर व छोटेसे हॉटेल होते. विविध खाद्य पदार्थ नमकीन लाकडी अलमारीत ठेवले होते व बाकी पदार्थ गरम तळून विकण्याचा व्यवसाय होता. बाजूला भट्टीत लाकडे धगधगत असल्याने उबदार वाटत होते. माणिकजीची पत्नी काही गरम पदार्थ तयार करत होती. आमच्यासमोर पाणी व गरमागरम जलेबी आणून ठेवली.

सकाळी गोड खाण्याची सवय नसल्याने जिलेबी पाहून प्रशांत म्हणाला,

“इतनी सुबह हम मीठा नही खाते, सिर्फ चाय चलेगी. तेव्हा शिवमूरतजी म्हणाले, “यहा मेहमानोको सिर्फ चाय नही देते, कुछ मीठा नमकीन देनेका रिवाज है”.

माणिकजीचे आदरतिथ्य पाहून मी प्रशांतला इशारा केला खाऊन घे. पोटभर जिलेबी झाल्यावर गरम दुध आले तसे माणिकजी म्हणाले, “दुध लिजीये, अपने घरके गैया का है”.

दुधाची चव अप्रतिम होती. सुंदर अविट गोडीचा आनंद घेत आम्ही माणिकजीचा निरोप घेतला शिवमूरतजी पण हंडियाला जायला निघाले. रस्त्यात गोपीगंज महाराजपूर, बाबूसराय मागे पडून मोहनसराय आले तसे आम्ही चहापानासाठी थांबलो. एका टपरीवर चहाची ऑर्डर दिली.

या भागात स्पृश्य अस्पृश्य याचे प्रस्थ असल्याने चहा पण मातीच्या कुल्हड मध्ये देण्याची प्रथा आहे. आम्ही सायकल प्रवासी त्यात दाढी वाढलेली, केस विस्कटलेले, चेहरा घामेजलेला, एकंदरीत आमचा अवतार अस्पृश्य जमातीतला दिसावा

असा होता. चहाची चव छानच होती. पण कुल्हडमध्ये भराभर पिता येईना. चहा पिऊन झाल्यावर नेहमीच्या सवयीने कुल्हड त्याच्या भट्टी जवळ ठेवून पैसै विचारले तसा तो ओरडलाच, “अरे! अरे! कुल्हड कहा रख दिया, सब अपवित्र कर दिया, अब नहाना पडेगा”.

आमच्या या कृतीने आजूबाजूचे लोक जमा झाले. प्रत्येक जण रागाने पाहत होता. एकजण तर अंगावर ओरडत बोलला " समझता नही क्या ? झूटा कुल्हड भट्टीपर रख दिया ?

वातावरण खुप तापले होते. जास्त बोललो तर प्रकरण अंगाशी येणार हे ओळखून माघार घेत म्हणालो " माफ करना भाईसाहब, हमे मालूम नही था. हम लोक महाराष्ट्र से है. हमे यहा का रिवाज नही पता.

मी माघारीच्या स्वरात बोललेलो पाहताच त्याचा पारा उतरला म्हणाला " ठिक है "

बाकी लोकांना म्हणाला " नये लोग है जाने दिजीये. ". वातावरण शांत झाल्यावर मी म्हणालो ". हमारी सुरत मत जाईये, हम भी उची जात के पंडित है. सफर के वजह से ऐसे दिख रहै. "

उची जात व पंडित शब्द ऐकून आता मात्र तो खजील झाला " माफ" करना पहचान नही पाये " असे म्हणाला.

आम्ही पण फार न थांबता पैसे देऊन पुढे निघालो. जाता जाता दुपारी दोन वाजता संत कबीर यांचे जन्मस्थान राजातालाब आले तेव्हा

प्रदिप च्या लक्षात आले त्याचे स्वेटर हंडियाला विसरलो आहे. त्याचा एकदम मुड गेला. कारण आता वापस जाने ही शक्य नव्हते. मुड चेंज करण्यासाठी मी म्हणालो " चला चहा घेऊ या "

या प्रवासात अनेकदा चहा घेण्यासाठी आम्ही थांबत असू त्याचे कारण ही होते की, काही वेळानंतर आम्हाला विश्रांती घेण्याची गरज असायची. त्यासाठी मग चहाचे कारण असायचे एनर्जी यायची व कधीकधी जेवण ही झाले नसायचे तेव्हा चहा हा वेळ मारून न्यायचा.

अनिलने चहाचा ऑर्डर दिला " चहाचे घुटके घेत म्हणाला" जाऊ दे आपण वाराणसीला दुसरे स्वेटर घेऊ "

" अरे पण ते माझ्या आईने विणले होते. तिची आठवण आहे " - प्रदिप

हे सारे चालू असताना परिवहन विभागाची बस समोर येऊन थांबली व त्यातून शिवमूरतजी उतरताना दिसले. काखेत एक झोळी होती. त्यांना पाहून आम्हाला धक्काच बसला. प्रशांत तर गमतीने म्हणाला " हा काही आपला पिच्छा सोडत नाही. इतक्यात शिवमूरतजी जवळ आले. तसे मी म्हणालो " आईये शिवमूरतजी "

एक खुर्ची समोर करत म्हणालो " बैठिये, चाय लिजिये

ते झोळी तून स्वेटर काढून प्रदिपच्या हातात देत म्हणाले " ये लिजीये आपका स्वेटर "

आम्ही चौघेही त्यांचे कडे बघतच राहिलो. निशब्द झालो. काही वेळाने भानावर येत म्हणालो " शिवमूरतजी बहूत बहूत शुक्रिया. आपका आभार कैसे व्यक्त करु समझ नही रहा है "

कैसे बात रहे संजयजी, जब मै हंडिया वापस पहूचा तो ये स्वेटर नजर आया और विचार आया ये तो नेपाल जा रहे वहां तो बहूत थंड होगी, थंड से इनका क्या हाल होगा ? मुझसे रहा नही गया और बस पकड कर मै आ गया.

इतक्यात चहा आला. चहा पिऊन ते उभे राहत म्हणाले " अच्छा मै चलता हू. मुझे सायम शाखा मे जाना है " आणि ते चालू लागले. इतक्यात विरुध्द दिशेने बस येताना दिसली तसे ते निरोप घेऊन जायला निघाले. त्यांच्या पाठमोरी शरीराकडे पाहून सर्वांच्या डोळयात पाणी आले. मला गितेतला दुसऱ्या अध्यायातला तो श्लोक आठवला

" कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषू कदाचन

मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते सड्गो स्त्वकर्मणि " खरोखर कुठल्याही फलाची अपेक्षा न करता आपले कार्य निस्वार्थपणे करणारे शिवमूरतजी सारखे निर्मळ मनाची माणसं या पृथ्वीतलावर आहेत याचा प्रत्यय येतो.

आम्हीही वाराणसीकडे मार्गस्थ होऊन दुपारी ३ वा. घटाटे यांच्या राममंदिरात (संघ कार्यालय ) पोहोचलो. मालवियजी यांनी आदरतिथ्य केले. जवळच दशाश्वमेध घाट असल्याने संध्याकाळची गंगेची आरती पाहून भोजन घेऊन कार्यालयात पोहोचलो.

थोड्या वेळातच माझे परिचित श्री काशीनाथ शास्त्री यांचा फोन आला, उद्या तुमचा प्रवास कसा असेल, तुमच्या मदतीला कोण स्वयंसेवक असतील, कोणकोणती प्रेक्षणीय स्थळे आम्ही बघणार आहोत याचा प्लॅन सांगितला. तो प्लॅन कसा होता, यात संघाचे व्यवस्थापन कसे होते ते पाहूया **पुढील भागात**.

## काशीविश्वेश्वर/ सारनाथ दर्शन

गुरुवार दि २३ ऑक्टोबर १९८६

काल शिवमूरतजी यांच्या त्यागमय जीवनाचा छोटासा प्रसंग अनुभवलात. आज काशी बनारस वाराणसी हे तीन नाव असलेल्या पवित्र शहराचे दर्शन आपण करणार आहोत. प्रातःकाली जाग आल्यावर प्रातः स्मरणीय कार्यक्रमात सहभागी झाल्यावर गंगा स्नानासाठी दशाश्वमेध घाटावर पोहचलो. घाटावर सुरवातीला दोन मोठे जलकुंभ असून त्यावर चढून दूरवरचे दृश्य पाहावयास मिळते. गंगामाईचे विशाल पात्र खुप मोठा जलप्रवाह पहिल्यांदा पाहत होतो. येताना प्रयागला पाहिले होते. पण इथे तिची विशालता खुप आहे. घाटावर स्नानासाठी गर्दी असल्याने एक नावाडी बोलला " उस पार चलिये बाबूजी बस चार का बीस रु लुंगा "

आम्ही नावेत बसून पैलतिरावर जाऊन मनसोक्त स्नान केले. स्नान केल्याने एक वेगळाच ताजगी चा अनुभव येत होता. तिरावर येत असताना सिने नट सुनिल दत्त उभे होते. काठावर चाहत्यांचा गराडा होता. आम्ही मात्र तिथे न थांबता श्री काशी विश्वेश्वराचे दर्शन घेण्यासाठी रांगेत उभे राहिलो. रस्त्यात फुल, मिठाई यांची दुकाने होती. मंदिरात दर्शन घेण्या पुर्वी बाजूला असलेली एक मस्जीद लक्ष वेधून घेत

होती. मनोभावे काशी विश्वेश्वराचे दर्शन घेऊन कार्यालयात आलो. एक वेगळीच प्रसन्नता अनुभवास येत होती.

काल म्हणालो होतो संघाचे व्यवस्थापन कौशल्य सर्वांनी शिकावे असे आहे. आमचा दिवसभराचा प्लॅन तयार होता श्री सुरेशजी आमची वाट पहात उभे होते.

आमच्या चार सायकली सोबत त्यांची पाचवी सायकल पुढे रस्ता दाखविण्यासाठी चालत होती. त्याची गरज ही होती. कारण काशी बनारस ज्यांनी यापूर्वी पाहिले असेल त्यांना कल्पना आहे. हे शहर असंख्य अरुंद गल्ली बोळा यांनी व ६००० पेक्षा जास्त मंदिरांनी बनलेले आहे. जशी बनारसी साडी हे वैशिष्ट्य. तसे रेल्वे स्टेशनचे नाव वाराणसी तर विश्वविद्यालयाचे नाव बनारस हिंदू विश्वविद्यालय तर मंदिराचे नाव काशी विश्वेश्वर मंदिर असे तीन नावाने प्रख्यात असलेले एकमेव शहर आहे.

सुरेशजी आम्हाला हनुमान घाटावरील श्री काशीनाथ शास्त्री यांचेकडे घेऊन आले. काशीनाथजीचा नागपूर लाच परिचय झाला होता. ते दक्षिण भारतीय असल्याने त्या पध्दतीचा " इडली सांबार " यांची व्यवस्था होती. खाली बसून केळीच्या पानावर सांबार पिण्याची मजा काही और होती. त्यांच्या मातोश्रीनी आग्रहाने खाऊ घातले. येथून सुरेश जी वापस आपल्या कामाला गेलेत व श्री गिरीधर जी आमचे मार्गदर्शक म्हणून सोबत आले.

प्रथम आम्ही दुर्गाकुंड, मानस मंदिर, व सर्वात पुरातन अश्या संकटमोचन हनुमानजीचे दर्शन घेतले. पुढे बनारस हिंदू विद्यापिठाच्या परिसरात शिरलो. अतिशय भव्य व रम्य असा शैक्षणिक परिसर विविध इमारतीत सजलेल्या या परिसरातील ग्रंथालय पाहण्याचा योग आला. तर पुढे श्री बिर्ला यांनी बांधलेले विश्वनाथ मंदिर.

हे मंदिर संपूर्ण संगमरवर दगडानी बांधलेले आहे. मंदिराचे भव्य गर्भगृह ज्याला चारही बाजूंनी प्रवेशद्वार असून आत पांढरी शुभ्र भव्य शंकराची पिंड लक्ष वेधून घेते. मंदिराचे भितीवर रामायणाचे दोहे कोरले आहेत. मन प्रसन्न करणारे असे वातावरण असल्याने काशी दर्शन करणाऱ्या प्रत्येकाने हे मंदिर पहावे.

आमचे दुपारचे भोजन श्री काशीनाथ सिंहजी यांच्याकडे ठरले होते त्याप्रमाणे गिरीधरजी नी आम्हाला त्यांचे कडे सोडून आमचा निरोप घेतला. जेवण खुप स्वादिष्ट होते. खुप आग्रहाने वाढत होते. भोजन होताच श्री हरिचंद्रजी आम्हाला घ्यायला आले होते.

हरिचंद्रजी आम्हाला सर्वप्रथम भारत माता मंदिरात घेऊन आले. भारत मातेचे हे एकमेव मंदिर असावे. एका मंदिराचे आकार असलेल्या हॉल मध्ये भारत मातेचे मानचित्र तयार केले होते. त्यात पर्वत नद्या प्रमुख शहरे देवालये विद्यापिठ दर्शविलेले हे मंदिर एकदा तरी पहावे असे आहे.

पुढे काशी संस्कृत विश्वविद्यालय परिसरात प्रवेश केला यात शिक्षण घेण्यासाठी स्वदेशीयांसोबत परदेशातील विद्यार्थी ही होते. त्यापैकी श्री रमापती (ब्रम्हदेश) श्री मोहन पांडे व सुधाकर शर्मा (मॉरिशस) यांचा परिचय झाला. मॉरिशस मध्ये फ्रेंच भाषेचा उपयोग जास्त होतो असे त्यांनी सांगितले. त्यांनीच आमच्या दुपारच्या चहाची व्यवस्था केली. आजच्या दिवसाचे शेवटचे व भव्य प्रेक्षणीय स्थळ म्हणजे १२ कि. मी. अंतरावरील सारनाथ " भगवान बुध्दांनी आपल्या पहिल्या पाच शिष्यांना उपदेश केला ते पवित्र स्थान. "

सारनाथ हे स्थान अनेक पुरातन स्तुप व बुध्द मंदिरांनी सजलेले आहे येथील वस्तू संग्रहालय फारच सुंदर आहे. आम्ही पोहोचलो तेव्हा पाच वाजायला काही मिनिटे बाकी बाकी होती व ते संग्रहालय बंद होणार होते. लिपिकाने तिकिट देण्यास नकार दिला पण आम्ही सायकलने नागपूर हून आलो आहे असे सांगितल्यावर मात्र दारे उघडून दिली. या संग्रहालयात मुळ अशोक राजाचे चिन्ह ठेवलेले असून त्यावर चारही बाजूंनी सुंदर पाषाणात तयार केलेले चार सिंहाची प्रतिकृती आहे. तर इतरही बुध्द कालीन वस्तू ठेवलेल्या आहेत.

याच परिसरात पुरातन भव्य स्तुपाच्या दुरुस्ती चे काम चालू होते. तर भारतीय बुध्द मंदिर, बर्मी टेंपल, व कोसेटसू नोसू या जपानी कलाकाराने तयार केलेली अष्टधातूची मुर्ती तर अप्रतिम आहे तसेच तिबेटी मंदिर आदी मंदिरे आहेत. इथे एक चक्र असून ते फिरविल्याने मनातील इच्छा पुर्ण होतात अशी श्रध्दा आहे. एव्हाना अंधार पडून सात

वाजले होते. मग परतीच्या मार्गात प्रसिद्ध कालभैरवाचे दर्शन घेऊन तेथील काळे व लाल गंडे बांधून घेतले.

श्री रामेश्वरजी कडे रात्रीचे दाल रोटीचे भोजन करुन कार्यालयात परत आलो.

यावरुन आपल्या लक्षात आले असेलच एवढे मोठे गजबजलेले शहर असताना आमची गैरसोय झाली नाही. रस्ता विसरलो नाही. किंवा कोणी लुबाडले पण नाही. तर आज निद्राधीन होण्यापुर्वी उद्या चा प्रवास कसा असेल काय अडचण आल्या असतील ते पाहू या **पुढील भागात**.

## आजमगढ शहरात मुक्काम

शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर १९८६

काल आपण बनारसला भेट दिल्यानंतर नेमके आणि मोजके सर्वांसुंदर काशीचे दर्शन कसे करावे व व्यवस्थापन कसे असावे याचा वस्तूपाठच मिळाला. योग्य व्यक्तींची नेमणूक करुन आम्हास काशी दर्शन घडविले. आज सकाळी उठून सर्वांचे आभार मानत प्रेमपुर्वक निरोप घेत श्री रामप्यारे पांडेय यांच्या मदतीने वाराणसी, शहरातून आजमगढ कडे कुच केले. नेपाळकडे जायचे असल्याने गोरखपुर मार्गे जाताना आजमगढ मधून जाण्याचा मार्ग आहे.

आजचा प्रवास जेमतेम १०० कि. मी. होता व रस्ता ही फार वर्दळीचा नसल्यामुळे शांतपणे मार्गक्रमण सुरु होते. मार्गात मुन्शी प्रेमचंद या थोर हिंदी साहित्यकाराची जन्मभुमी " लमही " या गावाला भेट दिली. काही स्मृती जतन केल्या होत्या. पण तरी घर मात्र दुर्लक्षित होते.

पुढे गोमती नदीचा सुंदर परिसर पार करुन देवगाव या ठिकाणी पोहचून नास्ता करण्यासाठी थांबलो. उ. प्र. मध्ये सकाळचा नास्ता पुरी भाजी चटणी असा असतो, त्याचा स्वाद घेऊन पुढे निघालो असता काही वेळाने माझे अंग खाजवायला लागले. अंगावर छोटे चट्टे येणे सुरु

झाले. कुठलासा खाद्य पदार्थ सहन न झाल्याने पित्त उमटले होते. वाहनाचा वेग कमी झाला.

पुढे मुहम्मदपूर, लालगंज आदी गावे पार करत, टौस नदीच्या पुलावर आलो. पाणि खुप स्वच्छ होते. तेव्हा स्नानाचा आनंद घेत आजमगढ शहरात प्रवेश केला. गावात पोहचताच संघ कार्यालयाचा पत्ता विचारत मिल्लत प्रेसपाशी पोहोचलो.

मिल्लत प्रेसच्या वरच्या मजल्यावर संघ कार्यालय होते. तिथे जिल्हा प्रचारक श्री दिनेशजी यांनी स्वागत केले. येताच माझे स्वास्थ्य ठीक नाही हे कळताच मला डाॅक्टर कडे घेऊन गेले. औषधे घेऊन विश्रांती घ्यावी अशी विनंती केली. दरम्यान माझे मित्र यांनी आजमगढ शहर दर्शनाचा आनंद घेतला.

कार्यालयात नागपूरचे स्वयंसेवक सायकलने आले आहे असे कळताच श्री पारसजी, श्री जगन्नाथ मिश्र, मिथिलेश्वरजी भेटावयास आले आमच्या प्रवासा बाबत आस्थेने चौकशी केली आम्ही बिहार रक्सौल मार्गे नेपाळला जाणार असे सांगताच आपण या मार्गाने जाऊ नये. कारण तेथे लूटल्या जाऊन सर्व सामान घेऊन जातील हि भिती आहे तेव्हा आपण गोरखपूर सौनोली मार्गे नेपाळला जावे असा मोलाचा सल्ला ही मिळाला. पुढे गोरखपूरला पण असेच जाण्याचे निर्देश मिळाले.

रात्री कार्यालयात राहणाऱ्या निवासी विद्यार्थ्यांनी स्वतः स्वैपाक करुन आम्हास भोजन करविले. रस्सेदार आलूची भाजी पोळी व भात, असा रुचकर भोजन घेऊन आम्ही निद्राधीन झालो.

उद्या योगी आदित्यनाथ यांचे गोरखपूर शहरात जाऊन सुप्रसिद्ध गीता प्रेस व श्री गोरक्षनाथाचे मंदिर व परिसर किती सुंदर व रमनीय आहे याचा अनुभव घेऊ या **पुढील भागात**.

## गोरक्षनाथ मंदिर/ गीता प्रेस दर्शन

शनिवार दि. २५ ऑक्टोबर १९८६

कालच्या भागात आपण गोमती व टौस या नद्यांना पार करुन आजमगढच्या मुक्कामात काल नेपाळला बिहार मार्गे न जाता गोरखपूर सौनोली मार्गे जावे हा मोलाचा सल्ला मिळाला होता. म्हणतात ना " इच्छा असेल तिथे गुरु योग्य तेच मार्गदर्शन करतात हाच अनुभव पुढे येणारच आहे.

आज सकाळी दिनेशजीच्या हातचा गरमागरम चहा पिऊन गोरखपूर कडे प्रस्थान करावयाचे ठरले. कार्यालयात सारे लोक आम्हाला निरोप द्यायला एकत्र आलेत. सर्वांना कुकुंमतिलक लावण्यात येऊन भारतमातेच्या जयघोषात आम्ही मार्गस्थ झालो. दिनेशजी आजमगढच्या वेशीपर्यत आम्हाला सोडायला आलेत. त्यांचा निरोप घेतला व पुढे निघालो.

इथे " सारे जहॉ से अच्छा हिंदूस्थान हमारा " या घोषणेचा अनुभव आला. कुठलीही ओळख नसताना, पुर्वी कधी भेटलो नसताना सुध्दा इतक्या आत्मियतेने आमचे आतिथ्य होत होते. भारतीयांचा आत्मा माणसा माणसात जागृत आहे याची प्रचिती येते. अडलेल्या गरजू वाटसरुला मदत करणे हे भारतीयांच्या रक्तातच आहे.

सकाळची गुलाबी थंडीची वेळ, सुखद गारवा असताना आमच्या सायकलची चाके बरहंज बाजार या गावाकडे वळली. इथे काही काळ थांबून सकाळचा नास्ता घेतला. नास्त्यामध्ये आज आलू पराठे होते. तसेही म. प्र. व उत्तर प्रदेशात आलू चे उत्पादन व वापरही मोठ्या प्रमाणात होते. . चव खुप चांगली असल्याने पुन्हा मागविले. कारण आज दुपारनंतर गोरखपूरला पोहचू असा अंदाज होता. त्यावेळी भोजनाची वेळ निघून गेली असेल त्यामुळे भरपेट नास्ता करुन घेतला. काही वेळानंतर आज प्रथमच शरयू नदीचे दर्शन झाले. खुप सुंदर परिसर, पाणी तर स्वच्छ नितळ भासत असल्याने निसर्गाचा आनंद घेत स्नान करण्याचा मोह आवरता आला नाही. थंडगार पाण्याचा स्पर्श होताच अंग अंग पुलकित झाले. मनसोक्त स्नान करुन कपडेही धुवून घेतल्याने बराच वेळ गेला. पण आज जेमतेम ११३ कि. मी. प्रवास अंतर पार करायचे असल्याने घाई नव्हती. पुढे वडहलगंज मार्गे दुपारी २ नंतर आर्यनगर उत्तरी या भागात असलेल्या गोरखपूरच्या संघ कार्यालयात पोहोचलो. नेहमीप्रमाणे महानगर प्रचारक श्री जयप्रकाशसिंहजी यांनी स्वागत केले. आमच्या जवळ नागपूर च्या संघ कार्यालयाचे पत्र असल्यामुळे आम्हाला कुठेच त्रास होत नसे. नागपूरकर म्हणून चांगली सोय होत असे.

थोडा वेळ विश्रांती घेऊन आम्ही सुप्रसिद्ध गीता प्रेस पहावयास गेलो. अबब, केवढा मोठा हा परिसर. एखाद्या मोठ्या कारखान्याचा परिसर असावा इतका भव्य व सुंदर परिसर. सुरवातीलाच भगवान

श्रीकृष्ण व गीता मंदिर आपले मन मोहून घेते. दर्शन घेऊन बाहेर आलो तर सुंदर अनुभुती येत होती. प्रसन्न वाटत होते. त्याच वातावरणात प्रेस च्या विविध भागाना भेटी दिल्यात. सोबत महानगर प्रचारक असल्यामुळे कुठलीही अडचण जात नव्हती. खीळे जुळविणे, प्रुफ रिडिंग. छपाई विभाग, बाईडिंग आदी विभागांना भेटी देत भांडार विभागात आलो. त्यात भगवद् गितेचे विविध आकाराची पुस्तके रॅकमध्ये लावली होती. अन्य धार्मिक पुस्तके ही उपलब्ध होती. आम्ही ही नवीन पुस्तके हातात घेऊन पुस्तकाचा सुगंध मनात, हृदयात साठवून बाहेर पडलो.

संध्याकाळचे सात वाजले होते. भोजनाची वेळ झाली तेव्हा आमची व्यवस्था सरस्वती शिशू मंदिर येथे करण्यात आली. संपूर्ण देशात जेव्हा सरस्वती शिशू मंदिराची स्थापना झाली. तेव्हा पहिले शिशू मंदिर गोरखपूरला सुरु करण्यात आले. तेच हे पहिले शिशू मंदिर जिथे आज आम्ही आलो होतो. भव्य आणि सुंदर शैक्षणिक परिसर शाळेची इमारत, मुलांचे व मुलींचे वेगवेगळे वसतीगृह. शिक्षकांची निवास व्यवस्था. विविध खेळांचे मैदान बगिचा आणी भोजनशाळा. सारे काम शिस्तशीर, अतिथीची वेगळी बैठक व्यवस्था सुरुवातीला आमचा परिचय करुन देण्यात आला. आम्ही नेपाळ ला सायकलने जात आहोत याची माहिती दिली. सर्वांनी टाळया वाजवून स्वागत केले. मग भोजनमंत्र झाल्यावर मग भोजनाची सुरवात. जेवण साधेच मुगडाळीचे

तिखट न घालता हिरव्या मिरच्या वापरुन केलेले फोडणीचे वरण पोळी व भात सलाद म्हणून मुळा होता. कांदा लसूण याचा वापर नाहीच.

भरपेट भोजनाचा आनंद घेऊन आम्ही श्री गोरक्षनाथ मंदिर परिसरात पोहचलो. सध्याचे उ. प्र. चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ज्या मठाचे मठाधिपती आहेत तोच परिसर. संपूर्ण संगरमरवर दगडांनी बांधलेल्या परिसरात प्रमुख श्री गोरक्षनाथ मंदिर. अन्य नाथांचे मंदिर भगवान शंकराचे मंदिर, भीमाची निद्रावस्थेतील मुर्ती व भैरवनाथाचे मंदिर इ. मंदिरे आहेत. सर्वच मंदिरे सुंदर व रमणीय आहे. प्रत्यक्ष भगवान शंकर तेथे अवतरले आहे असा भास होतो.

आपणास जर कधी गोरखपूर ला जाण्याचा योग आला तर गीता प्रेस व गोरक्षनाथ मंदिर पाहायला जरुर जावे. रात्री कार्यालयात मुक्काम.

उद्या पासून आपण नेपाळ सिमेकडे प्रयाण करणार आहोत. नेपाळ हा राष्ट्र निसर्ग सौदंर्याने नटलेला, हिमालयाच्या पर्वत रांगानी सजलेला प्रदेश आहे ते पाहू या **पुढील भागात.**

## नेपाळ सीमा सोनौली कडे

रविवार दि. २६ ऑक्टोबर १९८६

काल आपण गोरखपूर ला गोरक्षनाथाचे मनोरम दर्शन घेतले तर आज नेपाळ च्या सिमेजवळ नौतनवा या गावाला जाणार आहोत. येथून सोनौली हे बॉर्डर वरचे गाव फक्त ८ कि. मी. वर आहे.

आज सकाळी प्रातःकर्म आटोपून व जयप्रकाशसिंहजी यांच्या शुभेच्छा सह प्रयाण केले. सुरवातीचे गाव ४४ कि. मी. वर "फरेंदा " हे होते. हिमालयाच्या पर्वत रांगा जवळच असल्यामुळे खुपच निसर्गरम्य परिसर होता. आजूबाजूला शेतात गहू व सरसो ची पिके लावली. सरसोची पिवळी धम्म फुले तर वेगळाच आनंद देत होती. हवेत सुखद गारवा असल्याने प्रवास आनंद दायी होता. थकवा ही जाणवत नव्हता.

सहजपणे सायकल चालवत पिपीगंज, कंपॉसगंज ही गावे मागे टाकली आणि घनदाट सागाचे जगंल सुरु झाले. जगंल एवढे दाट की सुर्यकिरणांना पण प्रवेश मिळत नव्हता. हिमालय जवळ असल्याने निसर्ग आपले रुप दाखवत होता व त्याला पाहण्यात आम्ही गर्क होतो असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरु नये. या सुखद अनुभवातून आम्ही फरेंदा येथे पोहोचलो हे कळलेच नाही.

सकाळच्या नास्त्याची वेळ झाल्याने आमच्या सायकल ची चाके एका हॉटेल समोर थांबली. समोर गरम पकोडे तळण्याचा सुंगधाने

पावले हॉटेल कडे वळली. मालक आम्हा सायकल स्वारांना पाहताच स्वतः च म्हणाला “आईये बाबूजी, गरम पकोडे है.”

असे म्हणताच आम्हीही एका टेबल समोर बसलो. मालक स्वतः प्लेट टेबलावर ठेवत म्हणाला “लिजीये, चटणी के साथ पकौडी का आनंद लिजीये "

पकोड्याचा आनंद घेत असताना मालक म्हणाला " कहा जा रहे बाबूजी "

“जी, नेपाल काठमांडू " - मी

" कहां से चले थे ?”

“जी, नागपूर महाराष्ट्र से "

“अरे बाप रे, बहूत लंबी छलांग मार दी, हम लोक तो २०-२५ कि. मी. से ज्यादा कभी गये नही. बहूत परेशानी हूई होगी?”

“वो तो चलता है. बिना परेशानी, बिना मेहनत के मंजील कहाँ मिलेगी.”

वा भई, पते की बात की. मजा आ गया आपकी बाते सुनकर. बहूत खर्चा भी आया होगा "

सो तो है. लेकिन इंतजाम हो जाता है. उपरवाला कोई ना कोई व्यवस्था कर देता है "

तो भई आज हम भी आपसे पैसा नही लेंगे, चाहे तो और भी ले लो. "

टमाटरच्या चटणी बरोबर पुन्हा पकोडे आले. भरपेट नास्ता व चहा झाला. आता दुपारी जेवण नाही झाले तरी चालणार होते. बरेच दा दुपारचे जेवण समोरच्या गावी पोहचायचे असेल तर होत नसे. आज ही तसेच होणार होते.

फरेंदा ला हॉटेल मालकाचा निरोप घेतला तेव्हा तो म्हणाला " वापीस आनेपर यही रुकना बाबूजी "

आम्हीही होकार भरुन पुढे निघालो. आता दुरून हिमालयाची शिखरे दिसायला लागली. हिरवागार व उंचच उंच हिमालय पर्वताला पहिल्यांदा च पाहत होतो. त्याचे मनभावन रुप पाहताच प्रेमात पडावे असे आमचे झाले. अगदी रमत गमत आम्ही नौतनवा या गावी पोहोचलो. तेथे सरस्वती शिशू मंदिरात व्यवस्था झाली. प्रधानाध्यापक कैलासनाथजी यांनी स्वागत केले. रविवार असल्याने शाळा ही बंद होती. आज सायकल त्रास देत होती. ती ठिक करण्यात वेळ गेला. कारण पुढे चढाईचा रस्ता होता. रात्री कैलासनाथजी च्या सोबत भोजन झाले. बराच वेळ ते आम्हाला प्रवासा बद्दल मार्गदर्शन करत होते. गप्पा चे ओघात च झोप लागली.

उद्या आम्ही नेपाळ च्या सिमेत प्रवेश करणार होतो. तो दिवस ही अविस्मरणीय करुन गेला ते पाहू या **पुढील भागात.**

## भारत सीमेतून नेपाळ मध्ये प्रवेश

सोमवार दि. २७ ऑक्टोबर १९८६

कालच्या भागात आपण नेपाळ सिमे जवळील नौतनवा या गावी पोहोचलो होतो. आज आपण नेपाळ हद्दीत प्रवेश करुन हिमालयाच्या कुशीत बुटवल मध्ये जाणार आहोत.

आज सकाळी तयार होऊन कैलासनाथ जीचा निरोप घेण्यापुर्वी गरम वाफाळलेला चहा घेतल्याने नवीन देशात प्रवेश करण्यासाठी स्फुर्ती मिळाली.

नेपाळ देश कसा त्यावेळी कसा होता. म्हणजेच ३४ वर्षापूर्वी आमच्या चश्मातून आम्हाला कसा दिसला याचे वर्णन आपणास वाचावयास मिळणार आहे.

मी स्वतः दुसऱ्यांदा २०१२ मध्ये नेपाळ काठमांडू दर्शन करुन आलो. पण १९८६ साली आम्हाला पाहिलेला निरागस नेपाळ आता नजरेस पडत नाही. आता व्यवसायीकतेचा स्पर्श झालेला नेपाळ पाहावयास मिळतो. म्हणूनच त्या निरागस निर्मळ नेपाळचे दर्शन तुम्हाला माझ्या नजरेतून घडविणार आहे. नेहमीप्रमाणे सकाळी प्रस्थान ठेवल्यावर फक्त ८ कि. मी. अंतरावरील सोनौली हे गाव अवघ्या २२ मिनिटात आले. समोर भारत देशाचे भव्य प्रवेश द्वार नजरेस पडले. तर १०० फुट पलीकडे नेपाळ देशाचे प्रवेश द्वार होते.

सकाळचे ८ वाजले होते. नेपाळ मध्ये प्रवेशताच करंसी चेंज करावी लागते. त्यासाठी आमचे जवळ फारशी कॅश नव्हती. जे होते ते टॅव्हलर चेक च्या स्वरुपात, त्यासाठी स्टेट बँक उघडण्याची वाट पहावी लागणार होती. समोरच रेल्वे स्टेशन दिसत होते. सिमेवरील सर्वात शेवटचे रेल्वे स्टेशन हे पाहण्यात, नंतर भारतीय चेक पोस्ट पाहण्यात वेळ घालविला. पुढे नेपाळ ची चेक पोस्ट नेपाळ नॅशनल बँकेची इमारत दिसत होती. आज सकाळचा नास्ता राहिला होता तो ही करुन घेतला. कारण पुढे देश, संस्कृती, खानपान, चालीरीती सारेच बदलणार होते.

एकदाची स्टेट बँक उघडली आमचे चेक एनकॅश करुन बाहेर पडेपर्यंत बराच वेळ लागला. समोर भारतीय चेक पोस्ट वर आमचे व सामानाचे चेकिंग झाल्यावर आम्ही " नो मॅन्स लॅंड " मध्ये प्रवेश केला. दोन देशाच्या सिमे मधील जागेस " नो मॅन्स लॅंड " म्हणण्याचा प्रघात आहे. नेपाळ सिमेत प्रवेश केला तेव्हा दुपारचा एक वाजला होता.

नेपाळ च्या सैनिकांनी पण आमचे व सामानाचे चेकिंग केले. एक एक सामान त्यांना दाखवावे लागले यात बराच वेळ गेला. पुढे करंसी चेंज करायला नेपाळी बँके समोर रांगेत लागलो. प्रत्यक्ष कंरसी मिळेपर्यंत दिड तास गेला. त्यावेळी भारतीय १०० रुपयाचे नेपाळी १६८रुपये मिळत असत.

या सर्व सोपस्कारानंतर नेपाळ सिमेतला प्रवास सुरू झाला. हाताशी फार वेळ नसल्यामुळे जवळच मुक्काम करायचा निर्णय घेतला.

चार कि. मी. व भैरावा हे पहिले गाव व पुढे ३० कि. मी. वर बुटवल हे मुक्कामाचे गाव एवढाच आजचा प्रवास. साधी छोटी छोटी दुर दूर बांधलेली घरे घरांच्या मागे दुरवर भात शेती व त्या मागे हिमालयाच्या हिरव्यागार पर्वत रांगा असे, सरळ सरळ रस्ता, वाहतूक फारशी नाही. त्यामुळे सायकल चालवितांना मजा येत होती. पण बुटवल येता येता अंधार झाला, स्ट्रीट लाईट ही नव्हते.

बुटवल आले तेव्हा छोटी छोटी घर तर मागे हिमालय पर्वत. जणू हिमालयाच्या कुशीत वसलेलेछ सुंदर गाव. जेमतेम ५००० लोक वस्तीचे गाव असावे. कुठे थांबावे हा विचार येताच शोधाशोधीत नगर पंचायत कार्यालय नजरेस पडले. चला इथे विचारु या म्हणून आत प्रवेश करुन विचारले

" हम लोक नागपूर इंडिया से सायकल पर आये है. यहा रात मे रहनेका जगह मिलेगा ?

ओ इंडियासे वो भी सायकलसे इतना दुर आया ?

जी, सायकलसे - मी

ओ बडा बहादूर लडका है. देखो इधर इंडिया जैसा लाॅज होटल नही है. लेकिन हमारा पंचायतका गेस्ट हाऊस है. उधर तुम लोग रह सकते है. कोई चार्ज नही.

मग काय ? आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन " असे काहीसे झाले.

आम्ही गेस्ट हाऊस वर पोहोचलो. साधी पण छान व्यवस्था होती. भिंतीवर नेपाळी राजा विरेंद्र व राणी यांचे फोटो लागले होते. राजाबद्दल लोकांचे खुप प्रेम व आदर होता. पहिले थंडगार पाण्याने स्नान केले. दिवस भराचा शीण निघून गेला फ्रेश वाटत होती. पण भुक ही कडाक्याची लागली होती. जवळच एका हॉटेल मध्ये नेपाळी पध्दती चे जेवण झाले. जेवणात चपाती, भाजी भात असे जेवण घेऊन लवकरच झोपी गेलो.

उद्या आपण ११५ कि. मी. वरील नारायण घाट करावयाचे ठरवले होते. पण प्रत्यक्षात आम्ही तिथे पोहचण्यात काय अडचणी आल्यात ते पाहू या **पुढील भागात**.

## बर्दघाटची चढाई

मंगळवार दि. २८ ऑक्टोबर १९८६

काल आपण नेपाळच्या सिमेत प्रवेश केला असला तरी खरा निसर्ग माझ्या नजरेतून आपण आज पाहणार आहोत.

सकाळी प्रातःस्मरण म्हणून आम्ही आज ११५ कि मी. वरील नारायणघाट पर्यत जायचे निश्चित करुन प्रवास सुरु केला पुन्हा भैरावा मार्गे बर्दघाट हा पहिला थांबा होता. गर्द हिरवे दाट जगंल सुरु झाले, रस्त्यावर २७ कि. मी. पर्यत आम्ही होतो. गर्द हिरवाईचा आनंद घेत असताना इथे अंतरा बद्दल चे अंदाज चुकतात. म्हणजे इतक्या वेळेत अमुक स्थळी पोहचू असे असा अंदाज खोटा ठरतो. सततचा तिव्र उतार चढाव व रस्त्यावरचे खड्डे पहायला मिळतात.

बर्दघाटला पोहोचलो तेव्हा ९. ३० वाजले होते. २७ कि. मी. अंतरात छोटे घाट व नदी नाले यांची संख्या खुप होती. आता काहीतरी पोटात घातले पाहिजे याचा विचार आला. तसेच प्रदिप ची सायकल पंचर झाली होती. ती दुरुस्त होईपर्यंत भरपेट नास्ता झाला. कारण पुढे जंगल व घाट रस्ताच आहे. "आगे कुछ नही मिलेगा", असे नेपाळी बाबाने सांगितले.

आता परिक्षाच असणार होती कारण थोड्या वेळात घाट सुरु झाला. आतापर्यंत भारतात ५-६ घाट चढणे उतरणे झाले होते. पण हा

घाट त्यापैकी नव्हता. त्या घाटाचा बाप म्हणावा एवढा मोठा व खुप चढाईचा होता. १ कि, मी. नंतर सायकल सामाना सकट हातात घेऊनच चालणे सुरु झाले. ऊन जाणवू लागले. घामही निघत होता तहानही लागली होती आणि जवळ पाणी बाॅटल पण नव्हती. अर्धा तासानंतर एक झरा वरुन वाहताना दिसला. एकदम हायसे वाटले. शुध्द निर्मळ पाणी ओजंळीत घेऊन पोटभर प्यायलो. थोडी तरतरी आली. पुन्हा हातात सायकल घेऊन सुरु झालो. खडी चढाई मुळे दम लागला, पायही दुखायला लागले. काही वेळ एका झाडाच्या सावलीत बसावे पण तीव्र उताराच्या भागावर नीट बसण्याची जागा सापडेना.

कसेतरी अंदाजे १० कि. मी. चालून झाल्यावर पहाडातून पाण्याचा मोठा प्रवाह वाहत येण्याचा आवाज येत होता. वर चढलो तर एक मोठा ओढा वाहत असलेला पाहून आनंद झाला. त्याठिकाणी एक छोटे शंकराचे मंदिर बांधले होते. विसाव्यासाठी ओटाही होता. सायकली उभ्या करायला काही सपाट भागही होता. सायकली उभ्या करुन थंडगार पाण्याने चेहरा धुतला व गारेगार पाणी पिऊन तरतरी आली. भगवान शंकराचे दर्शन घेऊन जरा विसावलो. समोर दोन-तीन टपरी वजा हॉटेल दिसलेत तिथे स्रीया खाद्य पदार्थ विकताना दिसल्या. नेपाळी पद्धतीचा भात व पहाडी झाडपाल्याची भाजी असे जेवण मिळत होते, भुकही लागली होती. कारण घाट चढताना शरीराची वाट लागली होती.

जेवण घेऊन विश्रांती घेतली. दरम्यान त्या महिला सिगारेट फुकत बसल्या होत्या. पण इकडे हे खुप कॉमन होते. पुढे पुढे सर्वत्र हेच दृश्य होते. एका ठिकाणी तर पोरं रडत बसले असून महिला दारु सिगारेट पित गप्पा मारताना दिसल्या.

आम्हालाही संध्याकाळच्या आत पल्ला गाठायचा असल्याने पुन्हा सायकल वर स्वार झालो. आता मात्र घाटाचा तीव्र उतार सुरु झाला. पहाड फोडूनच रस्ता तयार केल्यामुळे दोन्ही बाजूला उंचच उंच पहाड व मध्ये रस्ता. रस्त्यावर पहाडाची पडलेली माती, छोटे दगड व माती यातून चालविणे अवघड झाले होते. दगडाला चुकवत तीव्र उतारावर चालविताना ब्रेक मारला तर घसरुन पडण्याची भीती होती ४-५ कि. मी. नंतर तीव्र ऊतार कमी झाला. तेव्हा जीवात जीव आला. कारण कोणत्याही क्षणी पडण्याची शक्यता होती. इतक्यात काही घर झोपडी वजा हॉटेल पाहून थांबलो. या सर्व प्रकारात प्रदिपच्या सायकलाची सीट तुटली. सुदैवाने एक दुकान मिळाले. गावाची लोकवस्ती ९०- १०० असावी. रस्त्याच्या बाजूला ढाब्या सारखं हॉटेल होतं. तिथे भोजन व निवासाची सोय होती. सर्वच लाकडाची घरे दुमजली होती. खाली ढाबा व वरच्या मजल्यावर राहण्याची व्यवस्था. काही चहाची दुकाने होती. सायकल दुरुस्ती होईपर्यंत चहा मागवला. गावाचे नाव " अरुणखोला " अर्थात खोला म्हणजे पहाडातून वाहत येणारी नदी असा अर्थ होतो आणि खरोखरच बाजूला नदीचे पात्र होते. पाणी तर इतके नितळ स्वच्छ होते की नदीचा तळ स्पष्ट दिसत होता.

पहाडी नदी असली तरी इथे खुप खळखळणारा दगड धोंड्यातून जाणारा प्रवाह नव्हता. पाणी पण खुप खोल नव्हते जेमतेम फुटभर, खाली मऊसर वाळू व त्यातील चमकणारे छोटे दगड दिसत होते. सुंदर नदी किनारा पाहून स्नान करण्याची इच्छा झाली. नदी पलीकडे उंच उंच डोंगर, दाट हिरवी वनराई पाहून आम्ही "निसर्गाच्या गावात" उभे आहोत असे वाटत होते, कुणीही प्रेमात पडावे असेच ते गाव होते. राहण्याचा मोह ही झाला. पण अद्याप तीनच वाजले होते व नारायण घाट ला जायचे होते. वापस येताना एक रात्र इथे राहायचे असे ठरवून पुढे निघालो.

आपण ठरवतो तसे होईलच असे नाही ४०-५० कि. मी. तर आहे, सहज नारायणघाटला जाऊ असे वाटत होते पण रस्ता तसा नव्हता.

पुन्हा १-२ कि. मी. घाट रस्ता, मध्येच एखादा पाण्याचा ओढा पण पूल नाही. दगड, पाणी यातूनच वाट काढावी व पुढे जात रहावे. असे पाण्याचे ओहोळ जागोजागी पार करुन जावे लागायचे या दमछाकीत अंधार व्हायला लागला. हा पूर्वेकडील देश असून इथे दिवस लवकर मावळतो. सुदैवाने आता जंगल भाग कमी होऊन नागरी वस्तीच्या खुणा दिसू लागल्या होत्या. भातशेती व लहान लहान घरे व रॉकेलचे दिवे लावल्यामुळे उजेड दिसू लागला.

समोर एक गाव दिसले. साधारण ७०-८० घरांची वस्ती असावी. अंधार झाल्याने पुढे जाणे शक्य नव्हते तेव्हा विचार आला. इथे रात्रीचा

आसरा मागीतला पाहीजे. गावाचे नाव " प्रगती नगर " होते. सायकली उभ्या करुन समोरच्या घरा जवळ गेलो. एक नेपाळी गृहस्थ उभे होते. त्यांना पाहून अनिलने हात जोडत विचारले "अंकल यहा कोई रहनेकी व्यवस्था हो सकती है". क्यौ नही. अपना इस्टाफ हॉटेल तो है.

आम्ही जरा स्मित करत पाहिले. त्याचे घर हॉटेल या परिभाषेत बसत नव्हते. होते ते लाकडी बांधनीचे दुमजली घर. खालच्या मजल्यावर एका बाजूला ढाबा सारखी भट्टी व किचन तर दुसऱ्या बाजुला टेबल खूर्च्या ठेवलेल्या. मागे त्यांची झोपायची खोली व वरच्या मजल्यावर राहण्याची व्यवस्था या घरात वीज नव्हती. मालकाचे नाव होते ऋषीराम शर्मा.

आमच्या जवळ पर्याय नव्हता. सर्व घरे सारखीच. आम्ही वरच्या मजल्यावर बिछाने लावले. वरचा भाग ही पुर्ण बंद नव्हता. बाहेरुन थंड हवा येत होतीच. श्रीमती शर्मानी गरम भात व पहाडी पालेभाजी असे जेवण करुन वाढले. हि भाजी कोणती होती ते मात्र कळले नाही. शर्माजीच्या शेतातीलच होती हे कळले. जेवण छान झाले.

रात्री शर्माजी बरोबर संस्कृती, भाषा यावर चर्चा झाली. नेपाळी भाषेतील काही शब्द मराठी भाषे सारखेच होते. भात कांदा इ. काही हिंदी सारखेही. थांबा - राक्नूस, धिरे चलिये - विस्तारे हाक्नूस. तिमर नाम के हो इ. इ. येथे स्त्रीप्रधान संस्कृती आहे. तीच हॉटेल चालवीते.

सिगारेट दारु स्त्रीयांनी पिणे हि सामान्य बाब आहे असल्याचे शर्माजीनी सांगितले. आज थंडी खूप नसल्याने झोप चांगली लागली.

उद्याच्या भागात रात्र कुठे व कशी काढावी लागली हि कथा जास्त चित्त थरारक आहे हे पाहूया **पुढील भागात**.

## महूखोलाची अविस्मरणीय रात्र

बुधवार दि २९ ऑॅक्टोबर १९८६

ला आपण महाखोला या हिमालयाच्या कुशीत धबधब्याचा आनंद घेत रात्री मुक्काम करणार आहोत.

काल आपण बर्दघाटची खडी चढाई, अरुणखोला या निसर्गाच्या गावाचे वर्णन वाचलत व प्रगतीनगर च्या ऋषीराम शर्मा यांच्या घरी मुक्काम केला.

आज सकाळी ६.३० लाच ऋषीरामजीच्या हातचा चहाचा आस्वाद घेऊन निघालो तर धुक्यानी आपली चादर सर्व आसमंतावर पांघरली होती. हळूहळू प्रकाश दिसत होता. पण अद्याप सुर्यनारायण देवाचे आगमन व्हायचे होते. डांबरी रस्ता बरेच ठिकाणी उखडून गोटे वर आल्याने सायकल त्या दगडावर उसळून चालत होती आणी धूळ ही उडत होती. सोबतीला दवबिंदूची वर्षा कपड्यांवर होऊन कपडे धुळीने माखले जात होते. इतक्यात एक ट्रक भरधाव वेगाने येऊन धूळ उडवून गेला. एकदम डोक्यात तिडिक गेली. प्रदिपने तर शिवीच हासडली. ट्रकने उडविलेल्या धूळीने सर्वांग धूळीने माखले होते. त्या क्षणी हसावे की रडावे अशी स्थिती झाली. आम्ही खुप वेळ एकमेकांकडे पाहुन हसून घेतले

पुढे थोड्यात वेळात नारायणी नदी आली. तिचे पात्र खोल नसल्याने आम्ही स्नान करुन नारायणघाटला पोहोचलो

नारायणघाट हे सोनौली ते काठमांडू दरम्यान असलेले एकमेव शहर आहे. लोकसंख्या अंदाजे त्यावेळी ४०- ५० हजारच्या आसपास असावी. येथे नास्ता करावा म्हणून एका हॉटेल मध्ये घुसलो तर समोर काउंटर वर एक महिला सिगारेट ओढत उभी होती. आम्ही नास्त्या बद्दल विचारले. तेव्हा ती बोलली

" सिरफ भाजी पुडी मिलेगा "

ठीक है, चार प्लेट दो "

भाजी पूरी चा आस्वाद घेत मुगलिंग कडे निघालो.

हा काठमांडू कडे जाणारा महामार्ग संपुर्ण घाट रस्त्याने भरलेला आहे. अरुंद व नागमोडी रस्ते. समोरुन ट्रक आली तर जायला जागा नाही. पण इथे खुप शिस्त होती. सायकल स्वारांना पाहून ट्रक चालक आपले वाहन डांबरी रस्त्यावरुन उतरवून आम्हाला वाट करुन देत. तर एखादा दिल्ली कडील कारचालक असल्यास आम्हाला जीव वाचवावा लागे. अश्यातच समोरुन येणाऱ्या कारची प्रशांत च्या सायकलला धडक बसली. कारवाल्याचे फारसे नुकसान झाले नाही पण सायकलचे ब्रेक तुटले. थोडक्यात प्रशांतला दुखापत होता होता वाचली. या जीवघेण्या प्रसंगातून वाचलो म्हणून आम्ही परमेश्वराचे आभार मानले व पुढे निघालो. नारायणघाट तर मागे पडले पण पुढे

एकही गाव दिसेना. पण निसर्गाने आम्हांला धक्क्यातून सावरले. या चढ उताराच्या घाट रस्त्यावर उजव्या बाजूला उत्तुंग हिमालयाच्या उंच कडा व त्यावरुन पडणारे असंख्य छोटे छोटे धबधबे. त्यामुळे अंगावर उडणारे तुषार, हे दृश्य खुप मनोहारी दिसत होते, बराच वेळ आम्ही जलतुषारांचा आनंद घेत होतो. आमच्या जवळ तेव्हा कॅमेरा नव्हता. नाहीतर त्या वेळचे दृश्य आता दाखवता आले असते. डाव्या हाताला खोल दरीत खळखळणारी नारायणी नदी. कित्येक कि. मी. पर्यंत असणारे हे दृश्य आम्ही पहिल्यांदा पाहत चाललो होतो. या निसर्गाचा आनंद घेत आम्ही दुपारी दोन वाजता मुगलिंग या गावी पोहोचलो.

मुगलिंग हे पोखरा व काठमांडू या दोन गावाला जोडणारे महत्वाचे गाव. नारायणी व कोसी नद्यांचा संगम मध्ये महादेवाच्या पिंडीच्या आकाराचा पर्वत. लोखंडी दोराच्या साह्याने तयार केलेल्या पुलावरुन पोखरा येथे जाता येते. येथे रिव्हर राफ्टींग सोय असल्याने विदेशी पर्यटकांची गर्दीने गजबजलेले छोटेशे गाव. जेमतेम १०० घरांची हॉटेल व्यवसायीकांची वस्ती. घरे म्हणजे पुर्वी वर्णन केलेली लाकडी बांधणीचे घरे. इथे रात्र वस्ती करावी म्हणून थांबलो. भुक ही लागली असल्यामुळे एका हॉटेलात शिरलो. रुपसी रेस्ट्राॅ असे त्याचे नाव भोजन म्हणजे इथे भात भाजी हेच. चपाती मिळत नाही. पण सामिष जेवण मिळते. जेवण झाल्यावर राहण्या बाबत चौकशी केली. पण प्रत्येक जण इथे नकार देत होता. कारण रिव्हर राफ्टींग साठी आलेल्या विदेशी पर्यटकांमुळे सर्व हॉटेल बुक होते. ते लोक पैसेही खुप

देत त्यामुळे सायकल स्वारांना ठेवण्यास कुणीही तयार नव्हते पुढे जावे तिथे व्यवस्था होईल असेच सांगत होते. नाइलाजाने पुढे निघालो. तोपर्यंत दुपारचे ३. ३० वाजले होते. रस्ता म्हणजे संपूर्ण घाट रस्ताच. उजवीकडे उंच हिमालय व डावीकडे दरीत नदी याशिवाय कोणतेही दृश्य नव्हते. सुरवातीला आनंद दायी वाटणारा हा निसर्ग आमची परिक्षाच घेत होता. रस्त्यावर वाहने पण दिसत नव्हती. १०-१२ कि. मी. चाललो तरी एकही गाव दिसेना अंधार पडायला लागला. मात्र आणखी चार कि. मी. नंतर एक मोठा धबधबा डोंगरावरुन पडून नदीला मिसळत होता. त्याच्या आवाजाने आणखी भयाणता जाणवत होती. पुर्ण अंधार झाला.

पण देव पाठीराखा, काही तरी सोय करणारच होता. पूल ओलांडून पुढे गेलो तर अंधूकसा प्रकाश येताना दिसला तेव्हा आशेचा किरण दिसला. समोर जाऊन पाहतो तर दोन तीन घरे रस्त्याच्या डाव्या हाताला त्यामागे खोल दरीत नदीचा आवाज येत होता. तर रस्त्याच्या उजव्या बाजूला आणखी चार घरे व त्यामागे डोंगर, जीवात जीव आला डावीकडील घरातून प्रकाश येत होता.

सायकल वरुन उतरत एका घराचा दरवाजा वाजवला. एक नेपाळी व्यक्ती बाहेर आले. प्रश्नार्थक नजरेने पाहत विचारले.

क्या होना?

" हम लोक इंडिया से सायकलसे आये है. रहनेका कोई व्यवस्था नही हो रही. मुगलिंगमे भी जगह नही मिली. आज की रात हमे आपके घर रहने दो. "

मी एका दमात बोलून त्याला आमची अडचण सांगितली.

" पर इतना लोगोंका रहनेका जगह हमारे पास नही. हमरा छोटासा मकान है. "

" थोडी सी जगह दे दो. हम लोक रह लेंगे. "

" घरमे तो जगह नही है. पर ये सामने बालकोनी है उसमे रह लो."

घर म्हणजे एक खोली खालच्या मजल्यावर त्यातून वर जायला जीना व वर एक खोली व त्यांची लाकडीच बालकनी एवढेच.

आम्हाला हो म्हणण्या शिवाय पर्याय नव्हता म्हणून सामान वर बालकनीत ठेवले.

गावाचे नाव " महाखोला " खोला म्हणजे पाण्याचा सोय असलेले ठिकाण

वरुन पडणाऱ्या मोठया धबधब्यामुळे तो महाखोला. नेपाळी बाबाचे नाव " मनीराम "

घरात रॉकेलचे दिवेच. नेपाळी अम्माने गरम भात व त्यांच्या शेती तील भाजी असे जेवण प्रेमाने वाढले,

आतल्या खोलीत त्यांचा परिवार झोपला होता. व बाहेर आम्ही बालकनीत. थंडीने जोर धरला होता. आम्ही आमचे जवळचे सर्व कपडे स्वेटर अंगावर चढवले. हातमोजे पायमोजे घातले. दोघे बालकनीच्या एका बाजूला. तर दोघे दुसऱ्या बाजूला वरुन दोघांचे ब्लँकेट तरीही थंडी वाजत होती. थंडीने कुडकुडीतच रात्र काढली.

त्यांनी एवढया अडचणीतही आसरा दिला म्हणून आम्ही मनीरामजीचे आभार मानले.

दुसरे दिवशी आम्ही काठमांडूला पोहचू असे वाटत होते. पण खरेच आम्ही पोहोचलो काय? ते पाहू या **पुढील भागात**.

## पहाडावरचे गाव नौबिसे

गुरुवार दि ३० ऑक्टोबर १९८६

काल कडाक्याच्या थंडीत मौखोलाच्या मनीरामजीनी रात्रीचा आसरा व जेवण दिले म्हणून आम्ही पुढचा प्रवास करण्यास सिद्ध झालो होतो.

आज सकाळी मनीरामजीच्या हातचा काळा चहा घेऊन नौबिसे कडे प्रस्थान केले. धूक्याची दाट चादर वातावरणात पसरल्याने अंधुकसे दिसत होते. सुर्य नारायण यांनी अजून दर्शन दिले नव्हते आज ६५ कि. मी. नौबिसे व पुढे २६ कि. मी. काठमांडू हा प्रवास अजून बाकी होता. या भागात नागरी सुविधेचा अभाव असल्याचे जाणवल्यामुळे काल नारायणघाट ला काही बिस्कीटाचे पुडे सोबत घेतले होते. कारण या मार्गात छोटी छोटी ५०-६० लोकसंख्या असलेली गाव होती. तेथे जेवण मिळेल अशी शक्यता कमी होती.

आजही आमच्या सायकल प्रवासाचा कस लागत होता. सतत चढ उताराचा घाट रस्ता. गत तीन दिवसापासून रस्त्याच्या उजव्या हाताला हिरवाकंच हिमालय पर्वत व सुंदर सुंदर वरुन पडणारे झरे, धबधबे तर डाव्या बाजूला खोल दरीत वाहणारी नदी व त्या पलीकडे पुन्हा पर्वत. दुरवर बांधलेली छोटी छोटी घरे, शेजारी उतारावर भातशेती असे दृश्य दिसे तेव्हा मनात विचार येई हे लोक नदी पार करुन पलीकडे घरी कसे जात असतील. पण प्रश्नाचे उत्तर थोड्या वेळातच मिळाले.

दोरांनी बांधलेला पूल दिसला व त्या पुलावरुन लोक डोक्यावर सामान घेऊन जाताना दिसत होते हे पाहताना वेगळाच आनंद मिळत होता.

तिथल्या रहिवाश्यांना पण आम्ही सायकलने जात आहोत यांचे कौतुक वाटत असायचे. एकदा तर रस्त्यात थांबवून विचारलेच. कुठून आलात आदी चौकशी केली व आग्रहाने चहा व बिस्कीटे दिलीत. पुढे २० कि. मी. चालल्या वर भोजनालयाची चौकशी केली. पण कुठेच हॉटेल नव्हते. एका ठिकाणी बोर्ड पाहिल्यावर गेलो तर हॉटेल बंद असल्याचे सांगितले. पुन्हा पंधरा कि. मी. पुढे गेल्यावर वरही हॉटेल मालक बाहर गये है असे उत्तर मिळाले. मग काय आदल्या दिवशी खरेदी केलेली बिस्कीटे खाऊनच भुक भागवावी लागली.

दुपारी दोनच्या सुमारास शेजारी वाहणाऱ्या नदीचा भाग रस्त्यापासुन खुप खोल भागात नव्हता जेमतेम ३-४ फुट खाली उतरुन जावे लागत होते. पाणी पण खोल नसून थोडे उथळ व गोटाड भाग असल्यामुळे स्नान करण्यासाठी सोयीचे होते म्हणून नदी पात्रात उतरलो.

बर्फ वितळून वाहत आलेले पाणी शुध्द व स्वच्छ होते. दुपारची वेळ असल्याने थंडीचे प्रमाण कमी झाले होते. त्यामुळे बराच वेळ स्नानाचा आनंद घेतला. व कपडे ही धूवून टाकले. यात मात्र बराच वेळ गेला.

सुर्यदेवाचे दर्शन पर्वतामुळे उशीरा झाले असले तरी पर्वताआड ही तो लवकर जात असे त्यामुळे दुपारी पाच नंतर अंधार होण्याच्या आत निवारा शोधावा लागायचा. आजही तसेच झाले होते. अंधार पडता पडता आम्ही फक्त नौबिसे या गावा पर्यतच पोहोचलो होतो. नौबीसे हे गाव पहाडावर वसले होते. कारण रस्त्यानंतर घरे बांधायला जागा नसल्याने पहाडावर छोटी छोटी घरे बांधली होती. हतौंडा बिहार कडून येणारा रस्ता येथे मिळत होता. त्यामुळे दोन चार हॉटेल चे फलक दिसत होते.

आता स्नान झाल्याने भुक ही लागली होती. म्हणून वर पाहिले तर एका घरावर " पासंग गोपर्ण लामा होटल" असा देवनागरी भाषेत लिहिलेला फलक दिसला व आशा वाटली इथे भोजनासाठी विचारावे म्हणून टेकडीवर चढून गेलो तर एक बुटकेसे गोरे मध्यमवयीन नेपाळी गृहस्थ दिसल्यावर विचारले

" लामाजी, इधर खाना मिलेगा ?

क्यौ नही, सब मिलेगा अंडा, चिकन, मटन सब बोलो, क्या बनाके दू ?

" हम लोक वेज खाते है, रोटी सब्जी मिलेगा ?

हॉ मिलेगा. लेकिन एक घंटा लगेगा.

हां चलेगा " प्रदिप

पुढे केव्हा जेवायला मिळेल हे सांगता येत नसल्यामुळे जेवूनच पुढे जायचे ठरवले.

लामाजी, सब्जी कौनसी है ? प्रदिप

आलू की बना देता हू - लामाजी

चलेगा " प्रदिप, कारण तीन दिवसापासून भात वा पहाडी पालेभाजी असेच जेवण झाले होते.

आज वेगळे काही मिळणार म्हणून आनंद होता. या दरम्यान पुर्ण अंधार झाला.

लामाजी " काठमांडू कितना दूर है ? - अनिल

" बस सिर्फ २६ माईल का घाटी है " लामाजी

" खाना खाकर जा सकेंगे - अनिल

नही, बाबूजी सबसे बडा घाटी है. अभी तक जितना घाटी चढे हो. उससे भी बडा घाटी है. पूरा पैदल जाना पडेगा. साइकिल नही चलेगी, आज इधर ही सो जाव. - लामाजी.

म्हणजे आम्ही आज काठमांडू ला जाऊ शकणार नाही हे निश्चित झाले. सायकल वरचे सामान हॉटेल मध्ये आणून सायकली एका उंच भागावर लावून ठेवल्या मग निर्धास्त पणे जेवणाचा आनंद घेतला. तीन दिवसांनी आज भाजी पोळी हे जेवण मिळाले होते. रात्री गाण्याच्या भेंड्या खेळून उशीरा झोपी गेलो. उद्याचा प्रवास फक्त २६ कि. मी. असला तरी सर्वात मोठा घाट चढून जायचे होते. तो कसा चढून गेलो व काठमांडूला कुठे मुक्काम केला ते पाहू या **पुढील भागात.**

## २६ कि मी घाट चढाई / काठमांडू प्रवेश

शुक्रवार दि ३१ ऑक्टोबर १९८६

आपण काठमांडूला पोहोचणार आहोत. तत्पुर्वी कालच्या भागात केवळ ९० कि. मी. अंतर सुध्दा गाठू न शकल्याने नौबिसे या पहाडावरच्या गावातील लामा हॉटेल मध्ये थांबलो होतो.

आज सकाळी दिवस उजाडल्यावर लामाजीच्या हातचा कडक चहा पिऊन प्रवासास सुरवात केली. आजचा प्रवास फक्त २६ कि. मी. असला तरी महा कठीण होता. अद्याप सहस्त्ररश्मी नारायणाचे आगमन व्हायचे होते. बोचरी थंडी कायम होती.

गावापासून घाट सुरु झाल्याने कसेबसे १ कि. मी. अंतर सायकलने पार केले मग मात्र सायकल हातात धरुन चालत राहिलो. ३ कि. मी. आल्यावर पहाडाच्या टोकावर पोहोचलो तर समोर त्याहून मोठे पर्वत शिखर दिसत होते आणि त्यावर पोहोचण्यासाठी दोन तीन टेकड्या चढून जावे लागणार होते. थोडा हिंमत दाखवून म्हणालो " चलो, हर हर महादेव "

त्या तालात सर्वानी नारा देऊन चढायला सुरवात केली. " जोर लगाके हैया " हर हर महादेव म्हणत त्या पर्वत शिखरावर पोहोचलो. आता घाट रस्ता संपेल असा आमचा कयास होता, पण तो साफ खोटा ठरला. पर्वत शिखरावर पोहोचताच आणखी मोठे शिखर दिसले तेव्हा

प्रशांतच्या तोंडून सहजपणे बाहेर पडले " अरे बापरे " सर्वाचे हात तोंडावर गेलेत. पण हिंमत हारायची नव्हती. एकूण असे सात शिखर पार करुन जायचे होते. तिसरे शिखर चालून जेमतेम दहा कि. मी. अंतर चालून झाल्यावर एक चहा टपरी मिळाली. गरम चहा व ब्रेड मिळाल्याने नव्या उत्साहाने वाटचाल सुरु झाली.

अजून ४ पर्वत शिखर पार करावयाची होती. उजवीकडे मोठा पर्वत तर डावीकडे खोल दरी. नौबिसेपासून मात्र नदी सोबत नव्हती. समुद्र सपाटी पासून ३००० फूट उंचीवर आल्यावर आम्हाला पेरुची झाडे दिसली. थोडा ब्रेक घेऊन भरपूर पेरु तोडून घेतले. आता एका हातात सायकल तर एका हाताने पेरु खात आणखी तीन पर्वत चढून झाले. पण आता खुप थकलो होतो. पाय दुखत होते, दम लागला होता. म्हणून जरा वेळ सायकली बाजूला लावून बसलो. पुढचा सातवा व शेवटचा पर्वत चढून जायचे आव्हान बाकी होतो. दुरुन डोगंरावरुन एक पाण्याचा झरा वहात असल्याचा आवाज येत होता. जवळचे पेरु ही संपले होते. प्रदिप सहजपणे बोलला " अरे यार, काहीतरी खायला मिळाले तर बरे होईल "

असे म्हणताच मला आठवण झाली. आपल्या जवळ सातूचे पीठ आहे. नागपूरहून निघतांना आईने सातूच्या पीठात बारीक साखर घालून दिली होती. जवळच पाण्याचा झरा होता. पिठात पाणी घालून सर्वांनी सातूपीठ खाऊन घेतले व चढाईला सुरूवात करुन शेवटचा टप्पा गाठला. सर्वात वर भारतीय सैनिकांनी १९५३ ते १९५७ या

कालावधीत काठमांडू ते सौनोली हा " त्रिभुवन राजपथ" बांधताना ज्या सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले त्यांचे स्मरणार्थ नेपाळ सरकारने " शहीद स्मारक बांधले होते तिथे येऊन पोहोचलो.

हा राजमार्ग आपल्या भारतीय सैनिकांनी बांधला हे स्मारकावर लिहिलेले वाचल्यावर आमचा ऊर स्वाभिमानाने भरुन आला. कारण गेले चार दिवस आम्ही ज्या रस्त्यावरून चालत आलो, अनेक मोठ्या पर्वतांना कापून, मध्ये येणारे अनेक छोटे मोठे पाण्याचे प्रवाह होते, त्यावर पूल बांधून तयार केला होता. भारतीय सैनिकांना श्रध्दांजली अर्पण करुन पुढे निघालो तर ४-५ कि. मी. उतारच होता केवळ अर्धा तासातच आम्ही काठमांडू शहरात पोहोचलो.

आता इथे मुक्काम कुठे करावा हा प्रश्न आला ?. हा देश हे शहर आमच्या साठी नवीन होते. कुठलेच परिचय पत्र ओळख ईथे चालणार नव्हती. तितक्यात अनिल म्हणाला " नगर पंचायत मध्ये विचारु या "

रस्त्यात एकाला नगर पंचायतचा पत्ता विचारुन " न्यू रोड " वार आलो. हा काठमांडू चा मेन रोड व प्रमुख बाजारपेठ आहे. नगर पंचायत कार्यालयात पोहोचलो तेव्हा ११ वाजले होते.

आमच्या पैकी अनिल व प्रदिप पंचायत कार्यालयात चौकशीसाठी गेले तोवर आम्ही समोर रस्त्यावर उभे होतो. पलीकडे स्पेअर पार्टच्या दूकानातून सरदारजी आमचेकडे पाहत होते. आमच्या

पेहराव व अवतारावरुन आम्ही भारतातून सायकलने आलोत असे त्यांनी ताडले व इशारा करत मला बोलावून आस्थेने चौकशी केली.

भई, कहां से आ रहे हो. " सरदारजी

नागपूर महाराष्ट्र से " मी

इतनी दूर से भई बहोत हिमंत कर ली. हमने इंडियासे सायकलसे आये हूए बहूत लोक देखे लेकिन इतनी दुरसे तो पहली बार देखा है.

कहां रुके हो ?

वो ही रहनेका ठिकाणा ढुंढ रहे है "हमारे साथी सामने ऑफीसमे गये है. -मी

अरे भाई, डरनेकी कोई बात नही. अपना गुरुद्वारा है ना. जितने दिन रहना है रह लो. मै अभी फोन करता हू.

त्यांनी लगेच गुरुद्वारात फोनने कळविले व एक चिठ्ठी हातात देत म्हणाले

" कहना की चरणजीतसिंगने भेजा है.

इतक्यात प्रदिप व अनिल ही नगर पंचायत ऑफीसातून बाहेर येत म्हणाले. " त्यांच्या कडे गेस्ट हाऊस नाही. पण त्यांनी २५० रु डोनेशन दिले आहे.

मी पण त्यांना राहायची सोय सरदारजीमुळे झाल्याचे सांगितले. व आम्ही गुरुद्वाराकडे निघालो.

थोड्याच वेळात बागमती नदीच्या पूलाजवळील गुरुद्वारा गाठले. आमच्या जवळील चिठ्ठी पाहताच सरदारजींनी एक मोठा हॉल उघडून दिला व सोबत एक जाड सतरंजी दिली जी हॉलभर पूरेल एवढी मोठी होती.

आम्ही स्नान करुन पुन्हा सायकलने येऊन न्यु रोडवर एका पंजाबी हॉटेल मध्ये जेवण घेतले. व परत जाऊन गुरुद्वारात येऊन झोपलो.

संध्याकाळी पून्हा फिरत फिरत न्यु रोड ला आलो. काठमांडू शहराचा मुख्य भाग असलेला हा परिसर व्यापारी पेठ, विविध प्रकारच्या दुकानांनी व गर्दीने गजबजलेला होता.

आम्ही महाराष्ट्र पद्धतीचे भोजनालय शोधत होतो. कारण सकाळचे पंजाबी जेवण फारसे आवडले नव्हते. एका हिंदू व्यापाराने आम्हाला " ओम भोजनालय " चा पत्ता सांगितला.

हे ओम भोजनालय मारवाडी पद्धतीचे छान हॉटेल होते. दोन भाज्या दाल, रोटी व भात आदी गरमागरम भोजन मिळाल्याने पोटभर मनसोक्त भोजन झाले.

पुढील पाच दिवसात आम्ही विविध स्थळांचे दर्शन घेतले. त्याचे वर्णन आपण दररोज वाचून आनंद घेणार आहोत ते पाहू या **पुढील भागात**.

## काठमांडू शहर दर्शन

शनिवार दि. १ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आपण काठमांडू शहरात कसे पोहोचलो व मुक्काम कुठे केला ते वाचलत तर आज काठमांडू ची धमाल गम्मत आज वाचणार आहोत.

काल रात्री जेव्हा गुरुद्वारात पोहोचलो तेव्हा थंडी वाढली होती. त्या दृष्टीने सोय करायची म्हणून मोठ्या सतरंजीच्या चार घड्या घालून त्यावर आमचे नेहमीचे आथंरुण घातले. खिडक्या पुर्ण बंद केल्या तरी थंडी जाईना म्हणून स्वेटरही घातले, व पायमोजे घालून झोपलो. प्रवासातला थकवा असल्याने गाढ झोप लागली.

सकाळी जेव्हा उठलो तेव्हा काचेच्या तावदानावर आतल्या बाजूने दवबिंदू साचले होते. व गंमत म्हणजे ज्या सतरंजीवर बिछाने घातले होते. त्या सतरंजीच्या खालच्या बाजूने दवबिंदू जमा झालेले होते. तुम्हाला खरे वाटणार नाही. पण ही वस्तूस्थिती होती.

आज अनिल माहूरकर याचा वाढदिवस, दिवाळीचा पहिला दिवस व नेपाळी नव वर्षाचा पहिला दिवस असा तिहेरी योग आल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. त्यात गुरुद्वाराचे लालबहादूरसिंग यांनी सांगितले

" आज दिवाली है. आज सभी लोग यही खाना खायेंगे " दोपहर दो बजे "

म्हणजे आज भरपूर वेळ होता. आज सायकल न घेता पायीच निघालो तर गुरु द्वाराच्या समोर दिवाळी चा बाजार लागला होता. भाजीपाला, खेळणी, फळे. विविध खाद्य पदार्थाचे बरोबर मासांहारी वस्तूंचे पण दुकाने लागली होती. नेपाळ हे हिंदू राष्ट्र असले तरी मासाहार करण्याचे प्रमाण जास्त आहे. वैशिष्ट्य म्हणजे गाय, बकरी, बैल, म्हैस. रानरेडे, जगंली प्राण्यांचे मुंडके एका रॅकवर सजवून ठेवले होते व ग्राहक जे मागतील ते मांस कापून देत होते. आमच्या साठी हा प्रकार नविन होता. कारण मांसविक्रीचे दुकाने वेगळया जागी असत. त्यातही बकरा सोडून अन्य मांसाची विक्री सार्वजनिक ठिकाणी पाहिली नव्हती.

आम्ही लवकरच बाहेर पडलो आणि पोहोचलो ते न्यु रोड वर. तिथले वातावरण खुप छान होते. दिवाळी व नववर्ष म्हणून दुकाने खुप सजली होती. मिठाई च्या दुकानात विविध खाद्य पदार्थाची आकर्षक सजावट होती. अनिलचा वाढदिवस असल्यामुळे आम्हीही मिठाई खरेदी केली.

बाकी बाजारात ज्वेलरी, अमेरिकन डायमंड, विविध ज्योतिष विषयक रत्ने, कृत्रिम दागिने ज्योतिष विषयक वस्तू रुद्राक्ष यांची दुकाने

भारतीय लोकांची होती. तर कॅमेरे, टार्च कॉस्मेटीक्स, परफ्यूम, , शूज, , कपडे, जीन्स, बेल्ट आदी सारे चिनी वा जपानी बनावटीची होती.

काठमांडू हे पुरातन शहर असल्याने या भागात जुन्या पध्दती ची घरे. वाडे इमारती राजवाडे आदी वास्तू मोठ्या प्रमाणात आहे. हाच भाग दरबार चौक म्हणून ओळखला जातो. याच भागात राजाचा जूना राजवाडा. दरबार भरवण्याची व्यवस्था, राण्यांना राहवयाचे महाल आदी वास्तू व प्रसिध्द " काष्ठमंडपम " आदी वास्तू आहेत. या सर्व वास्तू लाकडावरील कलाकुसरीने सजलेल्या आहेत. विविध मुर्त्या, वेलबुट्टी, लाकडी खांब खिडक्या दरवाजे छत यावर विविध दृश्य चितारली आहेत. काष्ठकलेचा अप्रतिम नमूना म्हणून वर्णन करता येईल.

जवळच हनूमानढोका म्हणून हनूमानाचे जागृत मंदिर सुध्दा कलाकुसरीने सजलेले आहे. तसेच कालभैरवाचे येथील मंदिर भारतातील मंदिरापेक्षा वेगळेच आढळले. आज दिवाळी असल्यामुळे विशेष सजावट केली होती.

आज काठमांडूचे दर्शन करतांना बराच वेळ घालवल्यावर आम्ही गुरुद्वारात पोहोचलो. तेथील शीख समूदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता. त्यांचे बरोबर काली दाल, तंदूरी रोटी, पुलाव असे स्वादिष्ट भोजनाचा आनंद घेतला.

संध्याकाळी फेरफटका मारायला बाहेर पडलो तेव्हा जाणवले की रस्त्यावर विदेशी बनावटीच्याच कार दिसत आहेत त्यात सुझुकी, टोयॅटो, मित्सुबिसी फोर्ड आदी कंपन्यांची वाहने फिरताना दिसताच टॅक्सी सुध्दा आलिशान टोयाटो कंपनीच्या आहेत. दुचाकी वाहने ही विदेशी बनावटीची आहेत. रात्री अनिलचा वाढदिवस नेहमीच्या ओम भोजनालयात साजरा करुन बाहेर पडलो तर सारे काठमांडू शहर विद्युत रोषणाईने झगमगले होते.

उद्या दिवाळीचा मुख्य दिवस व रविवार त्यामूळे काही स्थाने बंद राहणार होती. तेव्हा पंचताराकिंत हॉटेल " सोलेट ओबेराय व कॅसिनो. राजाचा राजवाडा व भारतीय दुतावास आदी पाहणार आहोत तर ते पाहू या **पुढील भागात.**




काठमांडूच्या न्यु रोड वरील दृश्य

## नेपाळ नरेशचा राजवाडा

रविवार दि. २ नोव्हेंबर १९८६

आज रविवार दिवाळीचा दुसरा दिवस लक्ष्मी पूजन, तर नेपाळ मध्ये दिप पूजनाचा दिवस काठमांडू मध्ये आनंदाला उधान आलेला दिवस जिकडे तिकडे तोरण पताका यांनी सजलेले शहर पाहण्यात वेगळा आनंद होता. म्हणून आज वाहन न घेता फिरायच ठरवलं.

आज सरदारजी बरोबर चहा घ्यायला गेलो तर म्हणालो " आज इतवार और दिवालीकी छूट्टी होगी. सरकारी जगह म्युझीयम वगैरा बंद होगा. ऐसा करो आज फाईव स्टार होटल और कॅसीनो देख कर आव "

आम्ही पण तयार होऊन एक टॅक्सी थांबविली. काय झकास गाडी होती. त्याकाळी भारतात फक्त अॅबेसेडर व फियाट या गाड्या काळे पिवळे पट्टे लावून टॅक्सी म्हणून वापरत, इथे तर विविध रंगातली पाॅश टोयाटा गाडी आमचे समोर उभी होती, गाडी मध्ये बसल्यावर प्रदिप दिमाखात म्हणाला " चलो Hotel Solate Oberoi

टॅक्सी चालकाने पण एकदा आमच्याकडे मागे वळून पाहिल, त्याला कारण ही तसच होत. कारण प्रवासात आमच्याकडे फार काही चांगले कपडे नव्हते त्यात दाढी वाढलेली, चेहरा प्रवासाने रापलेला. एकंदरीत पंचताराकिंत हॉटेल मध्ये जाण्यासारखा आमचा अवतार नव्हता. अगदी १० मिनिटांत टॅक्सी हॉटेल च्या गेटमध्ये उभी, टॅक्सीचे

बील अवघे २० रु. देऊन चालू लागलो. हॉटेल ची भव्य इमारत पाहून आत जावे किंवा नाही या विचारात असताना अनिल म्हणाला " अबे काय पाॅश आहे बे, आपण तर नाही जात बा "

जाऊन तर पाहू रेट खुप वाटले तर वापस येऊ - प्रदिप

जाऊ न, इथे आपल्याला ओळखते कोण ? प्रशांत

एकदाचे दबकत दबकत मुख्य दरवाजापाशी पोहोचलो. दरवानाने सलाम करुन काचेचा दरवाजा उघडला. पाउल ठेवताच एक सुंदर झुंबर टांगले होते. अंतर्गत सजावट तर लक्ष वेधून घेत होती. सर्वत्र सुटाबूटात माणसे वावरत होती. हॉटेल चे कर्मचारी सुध्दा कडक युनीफॉर्म मध्ये वावरत होते. त्यांच्या समोर आम्ही खरच वेगळे दिसत होतो. आम्ही चुळबुळत काय विचारावे, काय बोलावे, या विचारात असताना एक सुंदर तरुणी जवळ येत म्हणाली " वेलकम टू हॉटेल ओबेराय. व्हाट कॅन आय डू फॉर यू "

एवढं जोरदार स्वागत झाल्यावर काय बोलावे ते कळेना तरी मी धैर्य एकवटून म्हणालो " ब्रेकफास्ट मॅडम "

ओ, शुअर, यु विल गेट अॅट दॅट साइड "

एका गेट कडे अंगुलीनिर्देश करुन म्हणाली. आम्ही थॅंक्यू म्हणून तिकडे पाहिले.

त्या काचेच्या दारावर रेस्टॉरेंट असे लिहिले होते, तिकडे वळालो. दार उघडून आत गेलो. खुप सुंदर काचेची चकचकीत टेबल, आरामदेही

चेअर व सजावट पाहून जरा चरकलोच पण ठरवले काहीतरी खाऊन जायचे, म्हणून एका जवळच्या टेबलवर बसलो. इतक्यात वेटर आला काचेच्या ग्लासमध्ये पाणी देत अदबीने म्हणाला

क्या लेंगे साब " तो भारतीय वेटर होता.

मेनू कार्ड लाव -" - प्रदिप

त्याने अदबीने मेनू कार्ड दिले व ऑर्डर ची वाट पहात उभा राहिला. अनिलने मेनूच्या रेट कडे नजर फिरवत ऑर्डर दिली " चार वेज सँडविच " अभी लाता हू " म्हणून आत गेला. तेवढया वेळात हॉटेल चे इंटिरियर वर चर्चा करत असताना तो सँडविच घेऊन आला वेज सँडविच खुप छान होते ताजी ब्रेड काकडी टमाटर सॉसने सजविलेले सँडविच खाऊन बाहेर पून्हा हॉलमध्ये आलो. सजावट पहात पहात हॉटेल बाहेर पडलो. बाजूलाच प्रसिद्ध कॅसिनो होता.

भारतात सर्वत्र कॅसिनो नसल्याने जूगारी जूगार खेळायला येतात. तेथे जुगार खेळण्यासाठी विविध मशीन लावल्या होत्या, त्यात टोकन घाला व जुगार खेळा. आम्ही पण बराच वेळ हा जूगार पाहत राहिलो. आम्ही पण पाच पाच रुपयाची टोकन घेऊन नशीब अजमावून पाहिले. पण पहिल्या वेळेतच बाद झालो. मग इतर टेबलावर असणारी मशीन व त्यांचे जूगार पाहत थोड्या वेळातच बाहेर पडलो. पुन्हा टॅक्सीने न्यु रोडला जाऊन ओम भोजनालयात जेवण घेऊन झोप काढली.

संध्याकाळी नेपाळ नरेश विरेंद्र विक्रम शाह यांचा पॅलेस पाहावयास गेलो. राजवाडा व परिसर भव्य होता. तरीही राजस्थान मधिल राजवाडे जास्त सुंदर आहेत. दिवाळी असल्याने विद्युत रोषनाई केल्याने खुपच सुंदर दिसत होते. जागोजागी. सुरक्षा रक्षक उभे राहून पहारा देत होते. चौकशी केली असता आज पाहण्यास परवानगी मिळणार नाही असे सांगितले, फक्त दसरा उत्सवात जनतेसाठी खूला करतात.

मग पुढे भारतीय दुतावास पाहायला गेलो तेव्हा भारतीय राजदूत " देव, " नावाचे महाराष्ट्रीय अधिकारी होते. चौकशी अंती कळले तेही दिल्लीला गेलेत, म्हणून परत निघालो या परिसरात नेपाळ सरकारचे ऑफीसेस असल्यामुळे सर्वत्र विद्युत रोषणाई केलेली होती. मंदिरावर तर तेलाचे दिवे लावून सुंदर सजावट केली होती. आमच्या जवळ ही कॅमेरा नसल्यामुळे फोटो काढू शकलो नाही. इथे फटाके फोडण्यास मनाई आहे. त्यामूळे फटाक्याचे दणादण कानठळया बसणारे आवाज. व फटाक्याचा कचरा इथे नव्हता. पण नागरिकांनी केलेल्या दिप सजावटीचा आनंद घेत रात्री गुरुद्वारात पोहचून निद्राधीन झालो.

उद्याचे भागात आपण प्रसिद्ध भगवान पशुपतीनाथाचे दर्शन करण्यासाठी जाणार आहोत व नेपाळमध्ये नेपाळी सिनेमा " हामी एक हो " कसा होता याचे वर्णन ऐकणार आहोत ते पाहूया **पुढील भागात**.

## पशुपतीनाथ दर्शन

सोमवार ३ नोव्हेंबर १९८६

आज काठमांडू मधिल मुक्कामाचा चवथा दिवस आज भगवान पशुपतीनाथाचे दर्शन घ्यायचे ठरवले. हे स्थळ आमच्या मुक्कामापासून लांब ही होते व त्या बरोबर अन्य स्थळे ही पाहता पाहता काठमांडू शहराची ही माहिती मिळेल या उद्देशाने सायकलने जायचे ठरवले.

३४ वर्षापूर्वी हे शहर नागपूर शहरापेक्षाही लहान होते. न्यु रोड वरील भाग सोडता सर्व साधारण भारतीय शहरा सारखेच होते. किंबहुना विदेशी वाहने व विदेशी वस्तूची दुकाने सोडता काही वेगळे नसून आपण भारतीय शहरातून जात आहोत असे वाटत होते.

बागमती नदीच्या किनारी या परिसरात जेव्हा पोहोचलो तेव्हा मात्र वेगळे सुखद वातावरण भासत होते. परिसराची सुरूवात होते तो परिसर विविध रंगबेरंगी फुलांच्या वृक्षांनी आच्छादलेला रम्य परिसराने. एका बाजूला नेपाळ ची विशेषता असलेली पुजा सामग्री ची दुकाने. विविध आकारातील रुद्राक्ष माळा, रंगबेरंगी धाग्यांनी विणलेल्या माळा. अन्य लाकडाची कलाकुसर केलेल्या आकर्षक वस्तू लक्ष वेधून घेत होत्या. त्यानंतर पुजेसाठी लागणारी विविध रंगी फुले, प्रसाद, पुजा सामग्रीची दुकाने दिसताच आम्ही पुजा साहित्य घेऊन निघालो तेव्हा दुरुनच भगवान पशुपतीनाथ मंदिराचे भव्य प्रवेशद्वार दिसत होते. सर्वात

वर मध्यभागी भगवान शंकराचे विक्राळ रुप खाली डावीकडे चंद्र व त्याखाली श्री गणेशाची मुर्ती तर उजवीकडे सुर्यदेव व त्याखाली कालभैरवाची मुर्ती आहे, सर्वात खाली दोन सिंह स्वागतासाठी उभे आहेत. या चितारलेल्या मुर्त्या त्याचे सौंदर्यात भर घालत होत्या. आजूबाजूला अन्य इमारती परिसराची भव्यता दर्शवत होत्या तर हिंदू शिवाय अन्य धर्मियांना प्रवेश वर्जित हा फलक दिसत होता.

प्रवेशद्वारातून आत जाताच प्रथम भव्य नंदीदेवाचे दर्शन होते. सामान्यपणे भारतातील शिव मंदिरात आढळणाऱ्या नंदी पेक्षा सुंदर कलाकुसरीने सजलेले चांदीचा पत्रा लावलेले हे नंदीदेव खरोखरच सुंदर दिसत होते. आजूबाजूचा परिसर चारीबाजूनी बंदिस्त असुन मध्यभागी पशुपतीनाथाचे पुरातन मंदिर असून मंदिराचे गर्भगृहास चारही बाजूनी चांदीचा पत्रा लावलेली प्रवेशद्वारे असून कोणत्याही द्वारातून शिवपिंडीचे दर्शन घेता येते. आज सोमवार व दिपावली असल्याने मंदिरास व मुख्य शिवपिंडीस विविध रंगाच्या फुलाने सुशोभित केले असल्याने वातावरण प्रसन्न वाटत होते. आम्ही पुजा साहित्य पूजारी बाबाचे हातात सोपवून मनोभावे दर्शन घेतले व दर्शन घेऊन बाहेर येत असताना एका माकडाने माझ्या हातातील प्रसाद पळवला.

आम्ही प्रसन्न मनाने मंदिराचे मागील प्रवेशद्वाराने बाहेर आलो तर बागमती नदीचे पात्र नजरेस पडले. नदीत पाऊल भिजेल एवढेच पाणी वाहत होते. पण स्वच्छ व निर्मळ भासत होते. त्या जलात पाय

बुडवून आनंद घेत असतानाच नदीकिनारी थोड्या अंतरावर प्रेत जळत होते. मंदिराजवळच हा प्रकार पाहून जरा विचित्र वाटले.

येथूनच " त्रिभुवन इंटरनॅशनल एयरपोर्ट " जवळच असल्याने तेथे जाण्याचा मोह आवरला नाही. परिसरात पोहोचलो पण पुर्व परवानगी न घेतल्याने संपूर्ण परिसर पाहता आला नाही. परंतू छोट्या एअरलाईन्सची छोटी छोटी विमाने व आंतरराष्ट्रीय विमाने दुरुनच पाहून आम्ही आमचा मोर्चा " थुंडीखेल "या नेपाळी सेनेचे परेड ग्राउंडकडे वळविला. हा परिसर ही खुप रम्य असून नेपाळी सैन्याचे महत्वाचे ठिकाण आहे

संध्याकाळी विशेष असे काही नसल्यामुळे आज नेपाळी सिनेमाचा आनंद घ्यावा असे ठरले. सिनेमाघर नागपूरच्या रिगल सिनेमा सारखे सामान्य दर्जाचे होते. तिकिटाचे दरही ५ '-१० नेपाळी रु इतकेच होते. सिनेमा होता " हामी एक हो " आम्ही बालकनीचे तिकिट काढून आत गेलो तर नेपाळी भाषेत जाहीराती सुरु होत्या. थोड्या वेळातच सिनेमा सुरू झाला. सिनेमाची नायीका बंगलादेशी गायिका सलमा आगा रिक्षा चालकाच्या भुमिकेत होती. सिनेमाचे कथानक आता पूर्ण आठवत नाही पण मारधाड व विनोद यांनी परिपुर्ण असल्याने आम्ही सिनेमा एन्जॉय केला.

रात्री जेवून परतताना पून्हा काठमांडू शहराचे अंतरंग नवरी सारखे सजले होते. विविध रंगाच्या पताका तोरणांनी सजलेले व विद्युत दिपांनी

श्रृगांरलेले रुप शहराचे सौदंर्यात भर टाकत होते. त्यावेळी संवत ११०७ हे चालू होते. नववर्षाच्या स्वागतासाठी व शुभेच्छा देण्यासाठी फलक लावले होते त्यावर " नववर्ष शुभकामनाः”, “हुन्दया भितुंना”, " Happy new Year " असे लिहिलेले होते.

रात्री निद्राधीन होण्याआधी उद्या महाबुध्द स्तुप पहायचे ठरवून झोपी गेलो. ते कसे होते ते पाहु या **पुढील भागात**.




**पशुपतीनाथ मंदिराचे प्रवेशद्वार**

## महाबुद्धस्तुपाचे दर्शन / पाटण दरबार चौक

मंगळवार दि. ४ नोव्हेंबर २०२०

आज सकाळी पहाटेच जाग आली अंदाजे ४ वाजले असावेत खुप थंडी वाजत होती पांघरुणातून बाहेर पडायची इच्छा नव्हती. पण प्रातःकर्मासाठी बाहेर यावेच लागले. बाहेर दवबिंदूची वर्षा सुरु होती. कोपऱ्यात सरदारजी गार पाण्याने स्नान करताना पाहून माझेच अंग शहारले न राहवून मी विचारलेच " इतनी सुबह स्नान वो भी थंडे पाणीसे"

हां जी, बारह महिने ये ही समय नहाके पूजा करता हू. अभी तो कुछ नही, दिसबंर मे इससे भी ज्यादा थंड होती है. लोग तो ठिठोरने लगते है. फिरभी इसी समय मै नहाता हू. "

मला कुडकुडताना पाहून म्हणाले " अरे भाई, जल्दी अंदर जाव बाहर ओस गिर रही है. पूरे गिले हो जाओगे "

आणि खरोखरच मी स्वेटरला हात लावला ते ओले झाले होते. मी ताबडतोब आत जाऊन पांघरूणात दडलो.

आज सर्वप्रथम महाबुध्द स्तुपाचे दर्शन घ्यायचे व जमेल तर अन्य स्थळही पाहायचे ठरले. सर्वानी तयार होऊन पहिले गरमागरम नास्ता घेतला. हे स्थळ बरेच दूर होते रस्ता विचारत पोहोचायला दिड तास

लागला. हे महास्तुप खरोखर खुप मोठे होते. आपल्या दिक्षाभूमीला आहे तेवढे मोठे. त्या स्तूपावर कळसाचे खाली दोन सुंदर नेत्र काढले होते. वरचा कळस तर सुर्यकिरणांनी खुप चमकत होता. खालच्या भागात दोन द्वारे सुंदर सजवली होती. सभोवताली वरच्या छायाचित्रात आपणास जसे चक्र दिसते आहे तसे अनेक चक्र लावले होते भाविक भक्त ते श्रध्देने फिरवत होते व देवाजवळ मागणे मागत होते. तर काही इच्छा पुर्ण झाल्या म्हणून देवाचे आभार मानत होते. काही पितळीचे दिवे घेऊन देवासमोर ठेवत होते. इथेच आम्हाला मुंबईचे जोशी व फाटक कुटुंबिय भेटले. आपले माणसे भेटल्याचा त्यांना व आम्हाला ही खुप आनंद झाला.







तिथे सभोवताली जे चक्र लावले आहेत त्यांना स्पर्श करत प्रदक्षिणा करण्याची पध्दत आहे ती आम्ही करुन काही शोभेच्या वस्तूंच्या दुकानाकडे वळलो. तिथल्या शोभीवंत वस्तूत वेगळेपणा होता. विविध प्रकारच्या रंगबेरंगी माळा नक्षीकाम केलेल्या कट्यारी चाकू. विविध कलाकुसर केलेली भांडी पाहून विकत घेण्याची इच्छा झाली. पण आमचे सर्व सामान सायकल वर असल्याने वजन वाढविता येत नव्हते म्हणून नाईलाजाने परत फिरलो. ते थेट जेवण घ्यायला ओम भोजनालयात आलो. आज तिथे दिवाळी निमित्त भोजनाची विशेष व्यवस्था होती. गुलाबजाम पकोडे कढी वरण भात भाजी पोळया पापड इ. भोजन करुन गुरुद्वारात येऊन थोडा वेळ झोप काढली.

दुपारी पाटण या गावी येथील दरबार स्वेअर व कृष्ण मंदिर बघायला निघालो. मार्गात नेपाळी युवक युवतींनी स्कुटर मोटर रॅली काढली होती. हातात झेंडे पताका धरुन नारे देत फिरत होते. " नेपाल संवत राष्ट्रीय संवत " हुदंया लसताय भितुंना " नववर्ष शुभकामना असे नारे लावत शहर भर फिरत होते. आम्ही पाटण ला पोहचलो तेव्हा शेकडो युवकांनी नारे देत दणाणून सोडले. पाटण चा परिसर खुप पुरातन असून अनेक जुन्या इमारती भग्नावस्थेत आहेत. येथील श्रीकृष्ण मंदिर मात्र खुप सुंदर आहे सुंदर कलाकुसरीने नटलेले मुख्य मंदिर व त्यावर चितारलेल्या देवताच्या मुर्त्या तर शिल्पकलेचा अप्रतिम नमूना असे म्हणता येइल. नेपाळ सरकार कडे देखभालीची व्यवस्था नाही स्वच्छता कुठेच दिसत नव्हती सर्व बाजूला प्लास्टिक चे तुकडे रिकाम्या बाटल्या

पडलेल्या होत्या. ती अनावस्था पाहून विदेशी पर्यटक निराश होऊन परतत होते. तसेही येथे भारतीय पर्यटकांची संख्या कमी होती. त्यामूळे विदेशी पर्यटक सांगेल ती किंमत देत असल्याने भारतीय पर्यटकांना ते टाळत असत. विक्रेत्या मध्ये तरुण महिलांची संख्या जास्त होती. पोटपाण्यासाठी त्या महिला कोणताही व्यवसाय करण्यात तरबेज होत्या. तसेच धुम्रपान सुध्दा खुलेआमपणे करताना दिसत होत्या. मात्र शैक्षणिक दृष्ट्या कुणी फारसे प्रगत दिसले नाही.

आज बरेच फिरणे झाले होते. व दुपारी भरपेट भोजन झाल्याने पाणीपूरी भेळ याचा आनंद घेऊन रात्री लवकरच निद्राधीन झालो.

उद्या नेपाळ मधील मुक्कामाचा शेवटचा दिवस यात आम्ही स्वयंभुनाथाचे मंदिर, नॅशनल म्युझीयम, बालूजा वाॅटर गार्डन, आदी पहाणार आहोत. पण ते पाहू या **पुढील भागात**.

## स्वयंभूनाथ दर्शन

बुधवार दि. ५ नोव्हेंबर १९८६

आज काठमांडू मधील मुक्कामाचा शेवटचा दिवस म्हणून जे जे बघता येईल ते आज बघायचे. व छोटी मोठी खरेदी असल्यास ते ही करायची असे रात्री झोपण्यापूर्वी ठरवले होते.

आज सकाळी ताजेतवाने वाटत होते. कारण घरुन निघून आज २० दिवस झाले होते. त्याकाळी टेलीफोन आदी सोयी नसल्यामुळे संपर्क घरी झाला नव्हता. व उद्या परतीचा प्रवास सुरू होणार याचा व आपण ठरविलेले लक्ष पुर्ण करण्यात यशस्वी झालो याचा आनंद ही होता.

सकाळी लवकर तयार होऊन स्वयंभूनाथाचे मंदिराकडे प्रथम दर्शनासाठी निघालो. साधारण ३ कि. मी. अंतरावर असलेले सुंदर अश्या निसर्ग रम्य टेकडीवर विराजमान भगवान स्वयंभूनाथाचे मंदिर काठमांडू मधील एक सुंदर प्रेक्षणीय स्थळ आहे.

सोनेरी पत्रा लावून सजवलेले मंदिर खरोखर पाहण्यासाठी जरुर जावे असेच आहे

सुंदर महिरपी तोरण पताका खाली काढलेले दोन नेत्र यामुळे तो परिसर आकर्षणाचे केंद्र आहे. त्या मंदिरातील भगवान स्वयंभूनाथाची

मुर्ती तर तेजाने लखलखीत होती. अन्य देवतांच्या मुर्त्याही लक्ष वेधून घेत होत्या. आम्ही तिथे पोहोचलो तेव्हा खुप विदेशी पर्यटक शाळेतील मुले भेट द्यायला आली होती. सुंदर व गोडंस मुले पाहून आम्हीही चाॅकलेट खरेदी करुन त्या मुलांना वाटलीत. भगवान स्वयंभूनाथाचे दर्शन घेऊन आशिर्वाद घेतला व नतमस्तक होऊन वापस जाण्यासाठी परवानगी घेतली तेव्हा खुप प्रसन्न वाटत होते. एक नवी ऊर्जा अंगात संचारली असे वाटत होते. येतांना एक दुकान लक्ष वेधून घेत होते. विविध प्रकारचे चाकू, त्यावर केलेली कलाकुसर खुपच छान होती, त्यात काही हस्तीदंतापासून तयार केलेल्या वस्तू होत्या. विकत घेण्याचा मोह झाला होता. पण जवळ हत्यार बाळगणे म्हणजे गुन्हाच ठरला असता म्हणून मोह आवरता घेतला.

आज सकाळी सुंदर सुरवात झाल्याचे आनंदात आम्ही न्यु रोड कडे वळलो आज काही खरेदी केली. सर्वांनी जिन्स पॅन्ट विकत घेतल्यात तर काहीनी कॅमेरे खरेदी केलेत. त्याची किमंत नेपाळी रुपयात ७९० रु एवढी म्हणजेच भारतीय रुपयात अंदाजे ४०० रु असावी. पॅन्ट २७५ रु. कापडी पट्टा ७ रु, गाॅगल १०रु. तर गिफ्ट द्यायला १०-१० रु च्या कि -चेन आदी वस्तू घेऊन ओम भोजनालयात भरपेट भोजन झाले. गंमत म्हणजे तिथे नेपाळी १०रु. भरपेट व स्वादिष्ट भोजन मिळत असे, त्यात पापड लोणचे ताक याचाही समावेश असल्याने आम्हास विशेष आवडत असे. या पाच सहा दिवसात आमची त्या हॉटेलचे मालक व कर्मचारी यांची चांगली ओळख झाली होती. व आम्ही

इतक्या लांब सायकलने आलो याचे त्यांना नेहमीच कौतुक वाटत असल्याने ते प्रेमाने वाढत असत. आज तर आम्ही वापस जाणार म्हणून मालकाने मिष्टान्न भोजन खाऊ घातले.

आम्ही पैसे देत असताना थांबवून आवर्जून सांगितले " आज का खाना मेरे तरफसे "

" आप लोगोंके साथ बहूत आनंद आया. आपने हमे सेवा करनेका मौका दिया, इसमेही सब कुछ आया. "

त्यांचे प्रेम पाहून आमच्या मुखातून शब्द ही फुटेना. भावस्पर्शी वातावरणात आम्ही निरोप घेतला. कारण संध्याकाळी गुरुद्वारातील सरदारजींनी पण जेवायचे निमंत्रण दिले होते. त्यामुळे पुन्हा रात्री येणार नव्हतो.

संध्याकाळी नॅशनल म्यूजीयम साठी निघालो. पण ते बंद होते म्हणून बालूजा वाॅटर गाॅर्डन कडे मोर्चा वळविला. हे उद्यान राजधानीचे शहर असल्याने खुप वेगळे व भव्य असेल असे वाटत होते पण प्रत्यक्षात मात्र ते छोटेसेच पण छान उद्यान होते, फुलांची विविध रंगी झाडे. गुलाबाचे ताटवे. विविध रंगाच्या बोगनवेली मन मोहून घेत होती त्यात सोडलेले कारंजे उद्यानाची शोभा वाढवित होते. तरी पण भारतातील उद्याना पेक्षा सरस वाटत नव्हते. पण आल्हाद दायक वातावरण असल्याने मन प्रफुल्लीत होते हे विशेष. मनामध्ये विविध

फुलांचे मनमोहक सुगंध साठवत आम्ही उद्यानाचाही निरोप घेऊन गुरुद्वारात पोहचलो.

सरदार लालबहादूरसिंग आनंदात होते. त्यांनी प्रेमाने केलेले साधेच जेवण, राजमा याची भाजी तंदूरी रोटी व पुलाव असे स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला.

उद्या प्रस्थान ठेवायचे होते. काठमांडू शहरातील मुक्कामाच्या सतरंगी आठवणीची शिदोरी उश्याखाली ठेवून झोपी गेलो.

उद्याचा प्रवास कसा झाला ते पाहू या **पुढील भागात**.





स्वयंभूनाथ मंदिर



## परतीचा प्रवास

गुरुवार दि. ६ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आपण काठमांडू मधील स्वयंभूनाथ मंदिर व बालूजा वाॅटर गार्डन याचा आनंद घेतला. आज मात्र परतीचा प्रवास सुरु होणार होता. आज सकाळी स्नान करुन गुरुद्वारात जाऊन गुरु ग्रंथ साहिब यांचे दर्शन घेतले. लालबहादूर सिंग खुप भावूक झाले होते. अगदी सहजगत्या बोलून गेले. " अरे इतनी जल्द जा रहे हो क्या ? रुक जाव ना दो चार दिन और "

" भाईजी कभी तो जाना है ही. आज छह दिन हूए यहा आकर, अब तो जाना होगा. - मी

" आप लोगोंको हम नही भुल सकते. अपने घर जैसे आपका व्यवहार था. " भावूक झालेल्या लालबहादूर सिंग यांचेशी सर्वांची गळाभेट झाली. अतिशय भावूक वातावरणात आम्ही निरोप घेऊन भारताकडे प्रस्थान केले.

आज चे लक्ष होते महूखोला वा महाखोला या गावचे. अंतर होते अवघे ९१ कि. मी. पण इथे महापर्वत हिमालय पार करताना सायकल प्रवासाचे अंदाज चूकतात, निघालो तेथून शहीद स्मारक १० कि. मी. अंतर होते पण पुर्ण चढावाचा रस्ता होता. धुक्याने सर्व शहरावर मायेची दाट शाल पांघरली होती. अर्धेअधिक काठमांडू शहर दाट निद्रेत

असताना आम्ही सायकलवर स्वार झालो. रस्त्यावर अंधूक प्रकाश होता. सुर्यदेव आकाशात येण्यासाठी धडपडत होते पण मेघराज त्यांना अडथळे आणत होते. मेघराजांनी दवबिंदूचा वर्षाव सुरु केला. थंडीने अंग कुडकुडत होते. हात गारठले होते सायकल चालवणे कठीण जात होते. पुढे पुढे तर चढाव तीव्र झाला व सायकल हातात घेऊन पायी चालणे सुरु झाले तेवढे दहा कि. मी. पायी चालता चालता साडे नऊ झाले. येवढ्या वेळात सुर्यदेव ही मेघराजाशी भांडत पुढे येत होते. त्यामुळे थोडी उर्जा आली. एकदाचे शहीद स्मारकापाशी पोहोचलो.

सुंदर दृश्य होते हिरवागार हिमालय व त्यामागे बर्फाच्छादीत शिखरे दिसत होती पुन्हा एकदा भारतीय नरवीर सैनिकांना अभिवादन करुन पुढे निघालो तर सुरु झाला जिवघेणा उतार, काठमांडू ला येताना जेवढा तीव्र चढावाचा सामना करावा लागला होता, तेवढेच आता उतरताना आज कठीण वाटत होते. क्षमतेपेक्षा अनियंत्रित उतार होता. सायकलला ब्रेक मारल्यास तोंडावर पडण्याची भिती होती. कारण रस्तात एखाद्या दगड आल्यास सायकल उसळत होती. कोणत्याही क्षणी पडू ही भिती कायम होती. त्यात काठमांडूच्या दिशेने येणाऱ्या वाहनावर अनियंत्रित होऊन आदळू असेच वाटत होते. पण सुदैवाने तसा प्रसंग आमच्यावर आला नाही. व सुखरूप नौबिसे येथे पोहोचलो. आम्हाला पाहताच लामाजीने लगेच ओळखत आमचे स्वागत केले व गरम पराठे खाऊ घातले. सोबत टोमॅटो ची चटणी खुप स्वादिष्ट होती.

लामाजींचा निरोप घेत पुढे निघालो, रस्ता पुन्हा सतत चढ उताराचा होता, केवळ ६५ कि. मी. अंतर बाकी होते. पण पहा सहा कि. मी. वर दम लागत होता. थोडा वेळ हातात सायकल घेऊन चालणे. थोडा थोडा वेळ उतारावर चालविणे ही कसरत सतत करावी लागत होती. गजूरी नावाचे गाव आले तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. कडाडून भुक लागली होती. मागच्या वेळेस जिथे जेवणाचे विचारले ते बंद असणारे हॉटेल आज खुले दिसले. आत जाऊन पाहिले तर एक दोघे जेवत होते. चौकशी केली तर खाना तैयार है रोटी मिलेगी असे सांगितले म्हणून थांबलो.

हॉटेल मालकाशी गप्पा सुरु झाल्या पहाडी लौकीची भाजी, पोळी व भात असे गरमागरम भोजन होते. पोटभर जेवल्यावर थोडा वेळ विश्रांती घेतली. आता थोडेच अंतर बाकी होते माझीमटार हे गाव मागे पडले. पर्वताआड सुर्य जायला सुरवात झाली. आणि थोड्यात वेळात आम्ही महूखोला या गावी पोहोचलो पुन्हा मनिरामजीनी यांनी निवासाची व्यवस्था केली. नेपाळी अम्मा व मुले बाहेरगावी गेल्यामुळे यावेळी मात्र आतल्या खोलीत व्यवस्था झाली.

अद्याप सुर्य अस्ताचलाला जायला थोडा अवकाश होता म्हणून जवळ असलेल्या धबधबा (खोला) पाहण्यासाठी गेलो. धबधबा खुप सुंदर होता. खुप मोठा प्रवाह १०० फुटावरुन कोसळत होता त्याचा घनगंभीर आवाज आसमंतात फिरत होता. सुर्याची उतरती किरणे त्यावर पडून सप्तरंगाचा भास सतत होत होता. मन प्रसन्न झाले थंडगार

तुषार अंगावर घेत आम्ही बराच वेळ बसून होते खुप छान वाटत होते.



दिवसभराचा थकवा निघून गेला. अंधार झाल्या मुळे परतावे लागले.

आज नेपाळी अम्मा (मनिरामजीची पत्नी) नसल्यामुळे त्यांचा पूतण्या यांने आज जेवण तयार केले. गरम गरम भात, मनिरामजीच्या शेतातील भाजी व कोशिंबीर असे मस्त जेवण झाले. यावेळी त्यांची विनयपुर्वक वागणूक पाहून आम्हीही भारावलो. बराच वेळ नेपाळ व जनजीवन याबद्दल माहिती घेऊन निद्राधीन झालो.

उद्या बुटवल पर्यत जाऊन पोहचू असे वाटत होते परंतु नेमके कुठे रात्र काढावी लागली ते पाहू या **पुढील भागात**.

## अरुणखोलाचे निसर्ग दर्शन

शुक्रवार दि ७ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात काठमांडू वरुन परत येताना झालेला कठीणतम प्रवास आणी महूखोलाचा सतरंगी धबधबा व मनीरामजीचे आतिथ्याचे वर्णन आपण वाचलत, याठिकाणी एक गोष्ट आवर्जून नमुद कराविशी वाटते की अतिशय छोट्या असलेल्या घरात रात्रीचा आसरा देऊन प्रेमाने जेऊ घालणारे मोठ्या मनाची माणसे शहरात मिळणे दुरापास्त झाले असताना आपल्या घासातील घास काढून अतिथीला देणे हा संस्कार आपल्या सनातन वैदिक धर्मातच व छोट्या गावातच मिळू शकतो यात मात्र शंका नाही.

नेहमीप्रमाणे च आज सकाळी उठलो प्रातःकर्म आटोपून जायला निघणार तोच मनिरामजीनी चहाचा आग्रह केला. इथे दुध उपलब्ध नसल्याने काळा चहाचा कप समोर आला. चहाचा पहिला घोट घेताच" अहाहा क्या बात " असे उदगार निघाले. गवती चहा व तुळस घालून केलेला फक्कड चहा घेऊन तरतरी आली कारण बाहेर अजूनच खुप थंडी होती.

आज सकाळी ३६ कि. मी. अंतरावरील नारायणघाट हे आमचे पहिले लक्ष होते. पर्वतशिखरे अद्यापही धुक्यात हरवली होती. बाजूच्या धबधब्याचा धीरगंभीर आवाज आसमंतात निनादत होता. सुर्यनारायण

देवाचे अद्याप आगमन न झाल्यामुळे थंडीने पण आपला मुक्काम हलविला नव्हता. हाताची बोटे गारठली होती. शेवटी हातमोजे घातले तेव्हा कुठे प्रवासाची सुरवात करता आली. निसर्ग तर गाढ निद्रेत होता. रस्त्यावर कुणी चिटपाखरु ही नव्हते. आता थोडे अंधूक दिसायला लागले त्या प्रकाशातच आम्ही सायकली दामटल्या. आता प्रवास परतीचा असल्याने या वेळी हिमालय पर्वत डावीकडे तर नदी उजवीकडे खोल दरीत होती. कधी संथ तर कधी खळखळाट एवढाच काय तो आवाज ऐकू येत होता व नदीपलीकडे पुन्हा हिमालय पर्वत असे दृश्य मैलोनगणती दिसत होते. या पर्वत रांगा संपून मोकळा मैदानी भागात एखादे शहर यावे असे वाटत होते. निसर्ग खरोखर मनोहारी होता, पण म्हणतात ना " अती सर्वत्र वर्जयेत " हाच अनुभव येत होता.

सकाळी ९ वाजले तेव्हा काही गोंडस बालके शाळेत पायी जात असताना आम्हाला " बाय बाय " करत जात होती यावरुन अंदाज आला जवळ पास मोठे गाव असावे असे वाटत असताना मुगलिंग गावातील घरे दिसू लागली. आतापर्यंत सुर्य नारायण देव पण बरेच वर आल्याने हवेतला गारवा कमी झाला. आम्हालाही एका चहा व नास्त्याची गरज असल्याने आम्ही पुन्हा " रुपसी रेस्ट्राॅं " मध्ये थांबलो. नास्त्यामध्ये मोमो नुडल्स सारखे पदार्थ असल्यामुळे आम्ही चहा व टोस्ट याचा आस्वाद घेतला.

मुगलिंगला रिव्हर राफ्टींग ची सोय असल्याने विदेशी पर्यटकाची नदीत उतरून जाण्याची तयारी दिसत होती. काही आनंद घेत होती.

आम्ही पण थोडा वेळ खेळ बघून नारायणघाट कडे निघालो. अंतर केवळ १८ कि. मी. होते, पण सतत चढ उताराचा घाट रस्ता असल्यामुळे पोहोचायला दोन तास लागले प्रचंड थकवा आला होता. दुपारचे १२ वाजले होते. जेवायची वेळ झाली होती व पुढे जेवण घेण्यासाठी मोठे गाव ही नव्हते हे आम्हाला जातानाच लक्षात आले होते. म्हणून नारायणघाट ला जेवायचे ठरविले. रस्त्यात च एक मारवाडी भोजनालय मिळाले. व्यवसायासाठी आलेला मारवाडी समाज नेपाळ मध्ये मोठ्या प्रमाणात आहे, हे आम्हाला काठमांडूलाही जाणवले. भारतीय सायकल पटू अशी ओळख दिल्याने यथोचित स्वागत झाले हॉटेल मालकाने पुरी भाजी बुंदी रायता पापड असे स्वादिष्ट असे पदार्थ प्रेमाने गरम गरम वाढलेत सोबत त्यांचे कडून गोडधोड ही वाढले.

आज संध्याकाळच्या आत ५२ कि. मी. वरील अरुणखोला या मुक्कामाला पोहोचायचे निश्चित केले होते. कारण मधल्या भागात केवळ घाट रस्ता जंगल असेच होते. आता पुर्वी इतका चढ असलेला रस्ता नव्हता पण रस्ता खुप खराब होता. जागोजागी खड्डे असून त्यातील गिट्टी रस्त्यावर पसरली असल्याने सायकल आदळतच चालली होती. मध्ये मध्ये छोटे पूल विहीन नाले पार करावे लागत होते. अशी कसरत करत जात असताना प्रगतीनगर आले. पुन्हा ऋषीरामजीची भेट झाली, चहापान घेऊन पुढे निघालोच. आज नदी नाले व चढ उताराचे रस्ते व घनदाट जंगल याशिवाय काहीही दिसत

नव्हते. दुपारचे साडे चार वाजले तेव्हा मोठ्या नदीचा खळखळ आवाज ऐकू आला, समोर जाताच पुलापलीकडील " अरुणखोला " हे गाव दृष्टीस पडले.

नदीचा पूल पार करुन एका निसर्ग रम्य गावात प्रवेश केला. नेहमी सारखेच पहाडी भागातल्या लाकडी बांधनीच्या हॉटेल मध्ये प्रवेश करुन आज इथेच मुक्काम करणार असल्याचे मालकाला सांगितले. नोकराने पण लगेच वरच्या मजल्यावर आमची राहायची सोय केली. आज दिवसभरच्या प्रवासाने चांगले दमलो होतो. नोकराने गरम चहा आणून दिला. बिन दुधाचा काळा चहा घेताच उत्साह संचारला व सारे नदीपात्रात उतरलो. हे नदीपात्र खुप खोल नव्हते. पाणी इतके स्वच्छ की नदीचा तळ दिसत होता. धोकादायक अजिबात नव्हते. आज स्नान झालेच नव्हते. पण यावेळी स्नान करण्या सारखी वेळ ही नव्हती. दाट जंगल व जवळच नदी व हिमालय पर्वत असल्यामुळे थंडी किती असेल याचा अंदाज येईल. आम्ही फक्त हातपाय धुऊन पाण्यात पाय ठेवून निसर्गाचा आनंद घेत राहिलो. वापस येताना या गावी मुक्काम करु असे मी म्हटले होते ती इच्छा आज पुर्ण होत होती.

इकडे थंडीने आपले साम्राज्य विस्तारण्यास सुरवात केली, अंधार ही झाला म्हणून हॉटेल मध्ये पोहोचलो ते थेट त्याच्या भट्टी पाशीच. बराच वेळ हात शेकत, मालकाशी गप्पा मारल्यात. जंगलातल्या गमती जमती ऐकत असतानाच कुकने जेवण तयार केले. आज पुन्हा गरमगरम भात व रस्सेदार पातळ भाजी असे जेवण होताच थंडी वाजायला

सुरवात झाली. भयानक थंडी होती. एकमेकांचे पांघरूण एकत्र केले. स्वेटर घातले, पायात मोजे घातले तरी थंडी जाईना. एकमेकांच्या जवळ जवळ झोपून रात्र काढली. कारण थंडीने झोप येइना. रात्रभर गंमतच झाली. केव्हातरी पहाटे झोप लागली

तर रात्रभर काय गंमत झाली. ते पाहू या **पुढील भागात**.



## मायभूमीत प्रवेश

शनिवार दि. ८ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आपण अरुणखोलाची भयानक थंडीचे वर्णन थोडक्यात वाचलेत. पण नेमकी काय गंमत झाली ते वाचूया आजच्या भागात

काल रात्री जेवण झाल्यावर पाणी प्यायलो आणी आता झोपायला जाणार तो थंडी भरली. एक स्वेटर घातले होते पण त्याने थंडी जाईना म्हणून जवळ असलेला ट्रॅकसूट घातला,

पायात मोजे, कानाला मफलर गुंडाळले तरी ही थंडी वाजतच होती. कारण वरच्या मजल्यावर खिडकी म्हणून एक झरोका होता. त्याला दार नव्हतेच त्यामुळे बोचरे थंडगार वारे आत येत होते, आम्ही दोघांची पांघरुणे एकत्र केली व झोपलो, पण थंडी जायचे नाव घेईना. कसेबसे थोडावेळ घालविली. घडाळ्यात रात्रीचे १० वाजले होते. हॉटेल मालक कर्मचारी अद्याप झोपले नव्हते. आवर सावर, सफाई चालू होती. म्हणून तसेच खाली हॉटेलमध्ये जाऊन बोललो " भाईजी थंडी बहूत है, कुछ ओढनेके लिये हो तो दो "

आमचा चिंतामय चेहरा पाहून म्हणाला " भेजता हू " नोकराला सांगितले " इनको एक एक ब्लॅंकेट दे दो " नोकराने लगेच चार ब्लॅंकेट आणून दिले. सारे अंगावर घेतले. थोडा वेळ बरे वाटले पण पुन्हा बोचरा

वारा आत येऊ लागला. लगेच मालकाला आवाज दिला " कुछ और है क्या ?

आता काय करावे मालकाला ही सुचत नव्हते म्हणाला " हमारे लोगोंके लिये एक एक ब्लॅंकेट है. क्या करे ? कुछ करता हू " आप उपर जाव "

थोड्याच वेळात नोकर वर आला. त्याने एक चादर झरोक्या समोर लावली. व तंदूर भट्टी चा कोळसा एका घमेल्यात आणला. बरेच वेळ आम्ही हात शेकत होते. मध्य रात्री वा पहाटे केव्हातरी झोप लागली.

आज सकाळी नेहमी पेक्षा उशीराच उठलो. आवरुन तयार झालो. थंडी खुप वाजत होती. पण आज आम्ही पंधरा दिवसानंतर आमच्या मायभूमीत नौतनवा या गावी परतणार होतो. त्या ओढीमुळे काळा चहा घेऊन सायकलवर स्वार झालो. आज काही कि. मी. सायकल चालवल्या नंतर चढ सुरु झाला ६ कि. मी. उभा घाट चढून झाल्यावर घाट माथ्यावर पोहोचणार होतो. रस्त्याचे दोन्ही बाजूला मान वर करुन पाहिल्या शिवाय डोंगर माथा दिसत नव्हता इतके उंच पर्वत होते. डोंगर पोखरुनच रस्ता तयार केला होता. पर्वतावरची माती रस्ता भर पसरली होती, त्यामुळे सायकल चालविणे कठीण झाले होते. जरा जोर लावावा तर सायकल स्लीप होत होती. एक कि. मी. नंतर मात्र उभ्या चढाईमुळे सायकल चालविणे जमेना, शेवटी सायकल हातात घेऊन पायी

चालायला सुरुवात केली. उरलेले पाच कि मी. चालता चालता खुप थकून गेलो. कसेबसे चालत घाट माथ्यावर पोहोचलो. समोर भगवान शंकराचे मंदिर व वरुन पाण्याचा ओढा वाहत होता. सायकल उभी करुन हात तोंड धुतले, थोडी तरतरी आली. जवळ सातूचे पीठ होते. ते कालवून सर्वांनी फस्त केले. बाजूच्या टपरीवर चहा घेऊन आराम केला.

आता १० कि, मी. उतारच होता म्हणून चालविण्याचे श्रम नसले तरी अंखड सावधानतेची गरज होती. येथील घाटउतार ही सामान्य नव्हतेच थेट सिमला मनालीची आठवण यावी इतके तीव्र उतार होते. सायकल चालवताना तारांबळ उडत होती. विरूद्ध दिशेने चढणारी वाहने चुकवता चुकवता तोल जाण्याची भिती खुप होती. पण प्रयत्नाचे पाठीमागे परमेश्वर असतोच याची प्रचिती आली. आम्ही सुखरूप बर्दघाट या गावी पोहोचलो. थोडी बहूत सायकल दुरुस्ती बाकी होती, ती होत असताना समोरच एका हॉटेल मध्ये जेवलो. परवलाची भाजी रोटी चावल दाल असे गरम जेवण करुन थोडा वेळ विश्रांती घेतली, तोवर दुरूस्तीचे ही काम झाले.

दूपारचे तीन वाजले होते. चढ उताराचे रस्ते अजून संपले नव्हते, दाट जंगल ही संपले नव्हते. बुटवल आले पाठोपाठ भैरावाही मागे पडले तेव्हा पाच वाजले होते अंधार थोड्याच होईल अश्या सांजवेळी नेपाळी सिमेपाशी पोहोचलो. इथे सामानाचे चेकिंग झाले. बॅगमध्ये आक्षेपार्ह काही दिसले नाही. उरलेले नेपाळी पैसे परत करुन भारतीय

चलनी नोटा घेतल्या. कारण भारतीय चलन नेपाळ मध्ये चालते. पण नेपाळी चलन भारतात चालत नाही. या धावपळीत संपूर्ण अंधार झाला. नेपाळ सिमा पार करुन सोनौली येथे भारतीय सिमेत प्रवेश केला. सर्व प्रथम सायकल वरुन उतरून भारत मातेला स्पर्श करून वंदन केले मग भारतभू वर प्रवेश केला. भारतीय सैनिकांनी सामानाचे चेकिंग केले. सुदैवाने तेव्हा वीज गेली असल्याने त्यांना काही दिसले नाही, सुटकेचा श्वास सोडला. अजून ८ कि. मी. पुढे सायकल चालवत नौतनवा येथे पोहोचलो. ईथेही वीज नव्हतीच, दोन पोलीस शिटी वाजवत आमच्या मागे आले. आता सामानाचे चेकिंग होणार हे नक्की होते. लगेच हॅंडलला असलेली कॅमेराची पिशवी अंधारात पायापाशी ठेवली. तेवढयात पोलीस टॉर्च घेऊन पुढे आले व तोंडावर धरत म्हणाले

" बॅग खोलो, सामान दिखाव "

आम्हीही सर्व सामान दाखवले त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे सापडले नाही. विचारले " कहा जा रहे हो "

सायकलसे नागपूर तक "

जाव जाव " अच्छेसे जाना "

सहीसलामत सुटलो

" वाचलो रे " प्रशांतने तोंडून सहज निघाले.

रात्री सरस्वती शिशू मंदिर येथे कैलासनाथजी बरोबर जेवण करुन झोपलो.

उद्या आम्ही नेमके कुठे जाणार हे पाहू या **पुढील भागात**.

**नेपाळी राजे विरेंद्र याचा फोटो असलेली नोट**



## रुघौली(उ. प्र. ) मध्ये मुक्काम

रविवार दि. ९ नोव्हेंबर १९८६

काल अरुणखोला या नेपाळी गावातून भारतीय सिमेजवळील नौतनवा या गावी सरस्वती शिशू मंदिरात मुक्काम झाला रात्री प्रवासाबद्दल चर्चा करताना कैलासनाथजी म्हणाले " आप लोक सिधे गोरखपूर होते हुए प्रयाग जाओगे "

हां जी "

तो ऐसा किजीये ना, अयोध्या के नजदीक आये हो तो रामलला के दर्शन कर लो "

अयोध्या इतना नजदीक है ? - मी

हां जी "

लेकिन हमे रास्ता नही मालूम " - अनिल

" अरे भाई मै बताता हू, कौन कौन से गाव बिच रास्ता मे आयेंगे, किसके यहा रुकना है सब बताता हू !

आमच्या पुर्वीच्या प्रवासाच्या आराखड्यात अयोध्या जाण्याचे नियोजन नव्हते. कारण मुळात आम्ही बिहार मार्गे नेपाळ मध्ये जाणार होतो. पण वेळेवर सोनौली (उ. प्र. ) मार्गे नेपाळ ला गेलो असल्याने

पुन्हा उ. प्र. मध्ये आलो होतो. त्यामुळेच आता अयोध्येला जाणे शक्य होते

कैलासनाथजीचे म्हणणे आम्हाला पटले व उद्या अयोध्येला जायचे रात्री नक्की केले.

आज स्नान करुन तयार झालो तर कैलासनाथ जी च्या घरी गरम पोहे व घट्ट दुधाचा चहा आला तेव्हा कैलासनाथजी म्हणाले " लो जलपान कर लो" आम्ही जलपान करुन निघालो. त्यांचे पत्र घेऊन निघालो.

आज चहाने ऊर्जा आली होती, प्रथम पडाव रुघौली कडे प्रयाण केले कुठेही महामार्ग नव्हतेच, खेड्यापाड्यातून शेताशेतातून जाणारे रस्ते असल्याने आल्हाददायक वातावरण होते. गेले चार दिवस चढ उताराच्या रस्त्याने पार थकवले होते. त्या मानाने आज आम्ही येथे बरेच रिलॅक्स होतो, आज जरा निघायला उशीर झाला होताच, कोल्हई या गावाला पोहोचलो तर गरमागरम पकोडे तळण्याचा सुगंध एका हॉटेल मधून येत होता. प्रशांत म्हणाला " चला इथेच जलपान करु " यापुर्वी आम्ही नास्ता या शब्दाचा उपयोग करायचो पण सकाळी जलपान हा शब्द ऐकला व तोच शब्द ओठी आला " जलपान "

आम्ही सारे खळाळून हसलो. अनिल म्हणाला " चलिये महोदय जलपान किजीये "

आम्ही सारे हॉटेल मध्ये पोहोचलो, पकोडे समोर येताच जाताना फरेंदा या गावातील पकोड्याची आठवण आली. त्या हॉटेल मालकाला वापस येताना नक्की येऊ असे आश्वासन दिले होते. पण सारेच काही टाईमटेबलप्रमाणेच होते असे नाही. नियतीला आम्हाला अयोध्येला न्यायचे होते, म्हणून आज या कोल्हई गावात पोहोचलो होतो, भरपेट खाऊन पुढे निघालो.

आता पुढचा टप्पा होता बृजमोहनगंज, अंतर अंदाजे १८ कि. मी. होते. थंडी कमी होऊन ऊन निघाले, पिवळी धम्म सरसोची शेते, मध्ये गव्हाची लागवड मध्ये गन्नेकी खेती (ऊस) असे पाहत जात असताना एका नदीसमोर आलो,

पण तिथे पार करायला पूल नव्हता. पलीकडे जाण्यासाठी काय करावे हा विचार येत असताना एक ग्रामस्थ भेटले. त्यांना विचारले

भाईजी, उस पार जाने के लिये रास्ता कहा है ?

" आप ऐसा करो, ये बाजूमे रेल का पूलीया है ना, उससे चले जाव "

आमच्या साठी हा प्रकार नवीन होता यापूर्वी कधीच अशी वेळ आली नव्हती, पण म्हणतात ना आलेली अडचण तुम्हाला धाडस करण्याची संधी देते.

त्या ग्रामस्थाने सांगितले म्हणून तिकडे नजर वळवली तर पूलीयावरून गावकरी पायी वा सायकल हातात धरुन जाताना दिसले.

मग काय ! आम्ही मोर्चा तिकडे वळविला. पूल फार मोठा नव्हता, सायकल उचलून हातात घेत पूल पार केला, अर्धा तासातच आम्ही बृजमोहनगंज ला पोहोचलो तेव्हा १ वाजला होता, गाव ही बरेच मोठे होते तेव्हा दुपारचे इथेच घ्यावे असे ठरले. मोटरस्टँड जवळ एका हॉटेल मध्ये घुसलो. हॉटेल बरे होते. वर्दळ होती. नेहमीप्रमाणे ऑर्डर देऊन बसलो.

भोजनात परवलाची भाजी, रोटी चावल दाल असे भोजन व सलाद मध्ये मुळा काकडी होते.

गरम गरम जेवण घेतले व एका झाडाखाली सावलीत विश्रांती घेऊन निघालो. पुढे उसका हे गाव मागे पडून नौगढ आले. नंतर पुढचे ३० कि. मी. वरचे बांसी हे गाव आले. इथे दुपारचा चहा घेतला. आता मात्र रुधौली साठी फक्त २२ कि. मी. अंतर बाकी होते ते सहजगत्या पार केले.

रुधौली आले तेव्हा संध्याकाळ झाली होती. आम्हाला मिळालेल्या पत्त्यानूसार शिवमंदिरात गेलो, तिथे श्री जोखीमप्रसाद शर्मा यांची भेट झाली. कैलासनाथजीचा परिचय सांगितला. आमचा परिचय झाला. स्वागत झाले, सामान ठेवण्याची व्यवस्था मंदिरातच झाली. शेजारीच शर्माजी राहत होते. ते या मंदिराचे विश्वस्थ व विद्यार्थी पुस्तक मंदिर या शाळेचे प्रधानाचार्य होते, रात्री जेवनाची व्यवस्था शर्माजीच्या घरीच होती. श्रीमती शर्मा आग्रहाने वाढत होत्या गरम गरम कोबी

बटाट्याची रस्सा भाजी पोळी दाळ भात व अचार असे छान भोजन झाले. रात्री बराच वेळ शर्माजीबरोबर उ. प्र. मधील संघकार्य. त्यात येणाऱ्या अडचणी. राजकीय वातावरण याबद्दल चर्चा झाली. रात्री उशीरा निद्राधीन झालो.

मित्रांनो, उद्या मुक्काम आहे अयोध्येला. आपला आजचा ज्वलंत विषय आहे प्रभू श्रीराम. तर १९८६ साली जेव्हा जन्मभूमीचा ताला उघडल्यानंतर तेव्हा काय परिस्थिती होती ते वाचू या **पुढील भागात**.

रुघौलीचे सुर्यास्त दर्शन



## अयोध्यानगरीत आगमन

सोमवार दि. १० नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आपण रुघौली येथील शिवमंदिरात मुक्काम व श्री जोखीम प्रसाद शर्मा यांचे आपुलकीचे आतिथ्याचे वर्णन वाचलेत. आज आपण प्रत्यक्ष अयोध्या नगरीत प्रवेश करणार आहोत.

रामललाच्या दर्शनाची ओढीने आज सकाळीच जाग आली. लगेच तयार होऊन शर्माजीचा निरोप घ्यायला गेलो तर शर्माजी पुढे येत म्हणाले " आईये जलपान करके जाईये " आम्ही घरात येऊन बसलो, तोच गरम शंकरपाळ्याची डिश समोर आली. येथे चहा सोबत काही पदार्थ देण्याची पध्दत आहे, त्यामूळे त्यांचा मान राखावा म्हणून आस्वाद घेतला. खरोखर खुप छान चव होती, पाठोपाठ गरम चहा आला. शेजारी राहणारे गांधी आश्रम चे मालक जलपान चे वेळेस होते. काल रात्री त्यांना जेव्हा कळले की चार युवक सायकलने नागपूर येथून आले आहेत तेव्हा ते आवर्जून आमच्या भेटीस आले होते आमचे बरोबर बराच वेळ चर्चा करत बसले होते व आजही पुन्हा निरोप देण्यास उपस्थित होते. जलपान झाल्यावर त्यांनी प्रेमपुर्वक कुकुंमतिलक लावून आम्हास निरोप दिला.

आजचा पहिला टप्पा ३० कि. मी. वरील बस्ती हे शहर होते. वातावरणात सुखद गारवा होता रस्ता ही खुप चांगला होता. पण

सायकलच्या पायडल जवळची क्कार्टर पीन खराब झाल्यामुळे पायडल निट मारता येईना सायकल वेग घेत नव्हती, सहकारी मित्र बरेच पुढे चालवत होते. शेवटी बस्ती शहरात पोहोचलो व सायकल ठीक करुन घेतली. सोबत गरमागरम पराठे याचाही आस्वाद घेतला.

जलपान झाले व सायकल चा प्रॉब्लेम संपला त्यामुळे वाहनास वेग आला आता राष्ट्रीय महामार्ग क्र. 28 सुरु झाला तो अयोध्या मार्गे लखनऊ या राजधानी शहराकडे जात असल्याने उत्तम प्रकारे बांधला होता. पुढे विक्रमज्योत शहर आले तेव्हा दुपारचे जेवण घेण्याचा विचार केला तेव्हा एक रहिवासी म्हणाला " भाईजी ऐसा करो, आगे वैष्णो ढाबा है शुध शाकाहारी गरमागरम खाना मिलेगा.

आम्ही पण त्याचा सल्ला मानून पाच कि. मी. पुढे जाऊन वैष्णो ढाबा गाठला. खुप छान जेवण होते. पालक पनीर व तंदूर रोटी व सलाद, मस्त जेवण झाल्याने सुस्ती आली होती. मग तेथील खाटेवर थोडी सुस्ती काढून घेतली व पुढे मार्गस्थ झालो. आता कटरा हे गाव पार करत अयोध्येच्या जवळ असताना ट्रक ची भली मोठी रांग दिसली. आम्ही मार्ग काढत समोर आलो तर संपूर्ण वाहतूक अडवली होती. समोर चौकशी केली असता तेथे १४ कोस ची कार्तीक परिक्रमा सुरु असताना आदले रात्री नवीन पुला जवळील भाग खचून मोठा खड्डा पडला व त्यात पडून २५० लोकांचा मृत्यू झाला बातमी ऐकून मन सुन्न झाले सर्वत्र तणावाचे वातावरण होते. फैजाबादचे खासदार श्री निर्मल कुमार खत्री प्रत्यक्ष पाहणी करण्यास आले होते. सोबत पोलीस

अधिकारी, सरकारी अधिकारी. लोक प्रतिनिधी यांची भीड जमा झाल्यामुळे पुढे ही जाता येईना. कसेबसे आम्ही वाट काढत गर्दी तून बाहेर पडलो. समोर शरयू नदीचे स्वच्छ व निळेशार पाणी पाहून नुकताच आलेला तणाव कमी झाला. सकाळी स्नान झालेच नव्हते व पाणी पाहून स्नान करण्याची इच्छा झाली. लगेच घाटावर पोहचून यथेच्छ स्नान केले. दिवस भराचा थकवा जाऊन आम्ही अयोध्या कार्यालयाचा पत्ता विचारत गेलो तर तुम्ही फैजाबाद (साकेत) कार्यालयात मुक्काम करावा तेथे छान व्यवस्था होईल असे सांगण्यात आले. संपूर्ण अयोध्या नगरी पार करून फैजाबाद कडे निघालो. फैजाबाद व अयोध्या हे जुळी शहरे आहेत. येथे दगडी बांधकाम केलेली अनेक प्रवेशद्वारे आहेत. आम्ही मोठ्या द्वारातून जाऊन फैजाबादच्या घंटाघर परिसरातील नानकपुरा संघ कार्यालयात प्रवेश केला. जिला प्रचारक शिवाजी सिंह यांनी आमचे स्वागत केले. यांचा आमचा नागपूर च्या तृतीय वर्ष संघ शिक्षा वर्गात परिचय झाला असल्याने त्यांनी लगेच ओळखून म्हटले " आइये, विराजीये " आम्ही सामान ठेवून समोर येऊन बसलो चौकशी झाली " कुछ तकलीब तो नही हुई क्यौकी कल ही एक हादसा हूआ.

जी, रास्तेमे पता चला " लेकिन हमने रास्ता निकाल लिया.

" भोजन हूआ क्या ?

" जी रास्ते मे कर लिया मी

थोड्याच वेळात लहैया आले (राजगिरा पापडी) " लिजीये यह यहां की विशेषतः है. आम्ही लहैया चा स्वाद घेतला. संध्याकाळी घडी चौक मध्ये जाऊन भोजन आदी न घेता चाट आदी प्रकार याचा आनंद घेतला. वेगवेगळे प्रकारचे चाट प्रकार होते. व रात्री निद्राधीन झालो.

उद्या प्रभू रामाच्या अयोध्या नगरीचे दर्शन घडणार आहे त्याचे वर्णन पाहू या **पुढील भागात**.

## रामजन्मभूमी दर्शन

मंगळवार दि. ११ नोव्हेंबर १९८६

आज पहाटेच जाग आली. प्रातःस्मरण, स्नान करुन तयार झालो. आज रामललाचे दर्शन होणार म्हणून खुप उत्साह होता. आम्ही जिथे थांबलो होतो ते स्थान होते फैजाबादेत. मुस्लिम राजवटीच्या खुणा मोठ्या प्रमाणात आहेत. जागोजागी दगडी दरवाजे, मस्जीदी या शहरात दिसतात तर अयोध्येत मंदिरे आढळतात.

अयोध्या हे अतिशय पुरातन व दाट लोकवस्तीचे शहर असून प्रत्येक रस्त्यावर एखादे मंदिर आढळेल असे होते, तेव्हा हे एवढे मोठे शहर मार्गदर्शका शिवाय कसे पाहता येईल असा विचार मी बोलून दाखवला तेव्हा शिवकुमारजी म्हणाले " आप चिंता मत किजीये, कल सुबह मै आपके साथ रहुंगा "

त्यामुळे आम्ही शिवकुमारजीची वाट बघत असताना चहा आला. उत्तर प्रदेशात सर्व ठिकाणी दुध खुप चांगल्या प्रतीचे मिळते. त्यामुळे रबडी बासूंदी मिठाई सारे पदार्थ उत्तर भारतात खावेत. चहा सुध्दा घट्ट दुधाचा एक नंबर.

थोड्या वेळातच शिवकुमारजी येत म्हणाले " चलिये आज अयोध्याजी का दर्शन करेंगे "

सारेच आदरार्थी अयोध्याजी, गंगाजी जमुनाजी शरयू मैयाजी

आज निघालो तर सर्व प्रथम अयोध्या संघ कार्यालयात पोहोचलो. हा सर्व परिसर पायी फिरण्यास सोईचा, गर्दीत वाहने कुठे ठेवावी ही अडचणच म्हणून पायीच जाण्याचा निर्णय घेतला, व सायकली कार्यालयात ठेवून जलपानासाठी एका हॉटेल मध्ये गेलो. एका टेबलसमोर बसताच शिवकुमारजी म्हणाले " आज आपको अयोध्या के मिठाई का दर्शन करवाता हू. बाहेरच्या बाजूला भट्टीवर गरम जिलेब्या तळणे सुरु होते. पहिले जिलेबीची प्लेट आली. त्यापाठोपाठ कुल्हड मध्ये रबडी आली. शिवकुमारजी कुल्हड मध्ये जिलेबी बुडवून खात म्हणाले " संजयजी इसका मजा लेना हो तो ऐसा किजीये. आम्ही त्याच पध्दतीने रबडी जलेबीचा आनंद घेतला. त्यानुसार उतारा म्हणून दालमोट मागविली. आज नास्ता खुप झाला होता त्यामुळे पायी चालणे आवश्यक होते

सर्वप्रथम आम्ही पोहोचलो श्रीमंत बिर्ला यांनी बांधलेले सिताराम मंदिर, मंदिराचा परिसर भव्य असून संगमरवरी दगडांनी बांधलेले हे मंदिर सुंदर होते. यात प्रभु राम सिता व लक्ष्मण यांच्या मुर्त्या खुप लोभस होत्या. सुंदर वस्त्रे परिधान केलेली होती व अंलकारानी अलंकृत,

गळयात सुंगधी फुलांचे पुष्पहार घातले होते. त्या मनमोहक मुर्तींचे दर्शनाने आजच्या दिवसाची खुप छान सुरवात झाली. प्रसन्न मनाने बाहेर आलो तो थेट श्री हनुमान गढी वर. , प्रभू रामचंद्र यांचा

राज्याभिषेक झाल्यानंतर हनुमानजीनी जेथे निवास केला ते स्थान. परिसर एखाद्या किल्ल्यासारखा असल्याने गढी म्हटल्या जाते. येथे कायम गर्दी आढळते, कारण हनुमानजी जागृत व भक्ताच्या मनोकामना पुर्ण करणारे अशी ख्याती असल्यामुळे नवस बोलायला, नवस फेडायला येणारे ही बरेच लोक होते. हनुमानजीचे दर्शन घेऊन आम्ही आलो ते थेट श्री रामजन्मभुमी कडे "

इथे नुकतेच जन्मभुमीचे कुलुप उघडल्यामुळे व कार्तीक परिक्रमा सुरु असल्याने भरपूर मोठी रांग होती. आम्हीही रांगेत उभे झालो, रांगेत उभे असताना त्या वास्तू कडे लक्ष गेले तर ते तीन खणी मंदिरच होते. बाहेरून पाहता वर असलेल्या घुमटामुळे मस्जीद भासावी अशीच त्या वास्तूची रचना बदलण्यात आली होती. आत प्रवेश करताच प्रत्येक खांब हा मंदिरातील खांबासारखाच होता. फक्त कळसाचा भाग तोडून घुमटाचा आकार दिला होता. मंदिरावरील नक्षी, वेलबुट्टी शुभ चिन्हे आदी निर्विवाद पणे सांगत होते की हे राम मंदिर आहे, होय हे श्रीराम मंदिर आहे. समोर एका चबूतरा होता त्यावर रामलला विराजमान होते त्या मोहक मुर्तीला डोळ्यात साठवून नतमस्तक झालो. जोरदार रामललाचा जयघोष करण्याची इच्छा झाली, पण जागोजागी पोलीस उभे होते त्यामुळे मनाला आवर घालून बाहेर आलो,

मग आलो " कनक भुवन " या मंदिरात. हे मंदिर खरोखर राजेशाही थाटातले. खुप मोठा परिसर, गर्भगृह, सभामंडप सारेच भव्यच होते. मंदिराचा कळस तर सोन्याचा होता. मंदिरातील प्रभु राम सिता व

लक्ष्मण यांच्या मुर्त्या अप्रतिम, संपूर्ण सुवर्ण अंलकारानी सुशोभित धनुर्धारी राम तर खुपच मोहक होते की नजर हटवू नये असे वाटत होते, पण गर्दी खुप असल्यामुळे फार वेळ थांबता येणे शक्य नव्हते. आम्ही दर्शन घेऊन पोहोचलो ते थेट जानकी उद्यानात, याची पण खुप चांगली देखभाल केली असल्याने सौदंर्यात भर टाकत होते.

आता वेळ झाली होती. दुपारच्या भोजनाची, शिवकुमारजी आम्हाला घेऊन आलेत अयोध्येच्या प्रसिध्द भोजनालयात. संपूर्ण मारवाडी पध्दतीचे हे भोजनालय वैशिष्ट्यपूर्ण होते. जेवणात दोन भाज्या, वरण, कढी, साधी रोटी मिस्सी, दाल भात, व वरून साजूक तुपाची धार. गोड घट्ट दुधाची खीर असा बेत होता. एवढे सारे पदार्थ असलेले जेवण आम्ही बरेच दिवसांनी जेवत होते. सारेच स्वादिष्ट, भरपेट भोजन झाले.

आता जेवण खूप झाल्याने पायी चालणे कठीण झाले होते परंतु एक मंदिर दर्शन घ्यायचे राहिले होते. ते होते " महर्षि वाल्मिकी भुवन. " संपूर्ण संगमरवर दगडात बांधलेले मंदिर म्हणजे आधुनिक शिल्पकलेचा नमूनाच. गर्भगृहात मध्यभागी महर्षि वाल्मिक यांची प्रतिमा आजूबाजूला प्रभू राम सितामाता व लक्ष्मण यांच्या सुरेख मुर्त्या आहेत मंदिरातील भिंतीवर संपूर्ण रामायणातील श्लोक कोरले होते. दर्शन घेऊन आम्ही संघ कार्यालयात आलो व आराम केला. संध्याकाळी फैजाबाद शहराचा फेरफटका मारला तेथे प्रसिद्ध मोठे घड्याळ असलेल्या चौकात आलो. आज सकाळी भरपेट भोजन

झाल्यामुळे भोजन न घेता काही हलके फुलके खावे असेच ठरले. या भागात गोलगप्पे, टिकीया, दहीभल्ला आदी चाटप्रकार याचा आनंद घेऊन रात्री निद्राधीन झालो.

उद्या उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊ शहरात जाणार आहोत. ते शहर आम्हाला कसे भासले ते पाहू या **पुढील भागात**.

## लखनऊ कडे प्रयाण

बुधवार दि. १२ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आपण प्रभु रामाच्या अयोध्या नगरीत प्रवेश केल्यानंतर कोणकोणती मंदिरे प्रेक्षणीय आहेत व विवादित ढाचा पाडण्यापुर्वी राममंदिराचे स्वरुप कसे होते. याविषयी वाचलत. तसेच मिठाई चा आनंद घ्यायचा असेल तर निवांतपणे उत्तर प्रदेशात फिरुन खाण्यातला मजा अनुभवायला पाहिजे हे आवर्जून सांगायला हवे.

आज सकाळी ७ वाजता तयार होऊन शिवकुमारजी यांनी प्रेमपुर्वक निरोप दिला

आज रस्ता खुप चांगला होता. फार कुठे चढाव उतार नाही. महामार्ग असल्यामुळे वाहतूकीची अडचण नव्हती. जागोजागी ढाबे होते. अंदाजे ३० कि. मी. अंतर चालवून झाल्यावर जलपान करण्यासाठी एका हॉटेलात थांबलो. वेगवेगळया आकारात बंगाली मिठाई, खोवा मिठाई अशी व्हेरायटी होती. हॉटेल मालकाला पदार्थाचे नाव विचारत ऑर्डर देत गेलो.

आज आम्ही मिठाई वर ताव मारला व पुढे निघालो. आता रामसनेही घाट या गावापर्यंत चालवून थांबायचे होते. दुपारी एक वाजताच्या दरम्यान रामसनेही घाट येथील रामजी का ढाबा येथे उतरलो. ढाब्यावर ताजा मुळा, गोबी, गाजर बैगन आदी भाज्या मागील

शेतातून तोडून नुकत्याच आणल्या होत्या. आम्ही हातपाय धुऊन समोरील खाटेवर लवंडलो तोच वेटर ऑर्डर घेण्यासाठी आला.

हां बाबूजी क्या खायेंगे - वेटर

कौनसी सब्जी है ?

त्याने सात आठ भाज्यांची नावे घेतली. तसे प्रदिप म्हणाला " बैगन का भरता बनाओगे

हां जी " वेटर

" तो बनाव भरता और दाल फ्राय रोटी भी लाना

तोपर्यंत आम्ही खाटेवर आराम केला. पंधरा वीस मिनिटात त्याने करून गरम गरम वाढले. नागपूर वरुन निघाल्या पासून वर्‍हाडी पदार्थ चाखले नव्हते. इथले भरीत बनविण्याची पध्दत वेगळीच आहे. चव वेगळी पण छान होती. ढाबा स्टाइल दाल फ्राय व ताजा मुळा गाजर याने बहार आणली. जेवण झाल्यावर खाटेवरच थोडा वेळ विश्रांती घेतली.

यापुढे बाराबंकी ४० कि. मी व लखनौ २७ असे ६७ कि. मी. बाकी होते. सहज पणे दोन तासातच बाराबंकी येथे पोहोचलो. पाणी व चहा प्यायचे म्हणून एका हॉटेल पाशी थांबलो. तर हॉटेल मालक चौकशी करु लागला. कहांसे आये हो ? कहा जा रहे हो ? त्याला सारा वृतांत थोडक्यात सांगितला. हे ऐकून तो खुप झाला, लगेच म्हणाला " दुध पियोगे "

" हम लोगोंको इस समय पिनेकी आदत नही. " अंदाजे दुपारी ४. ३० चा वेळ असावा. आम्ही थोडा वेळ काहीच बोललो नाही तहान लागली होती. पाणी पिऊन झाल्यावर तो पून्हा बोलला " अरे भाईजी ले लो, आप हमारे मेहमान हो, ये हमारे तरफसे. "

आता खरे तर चहा प्यायला थांबलो होतो. पण हा तर दुध घ्या म्हणतोय ! मग काय चार कुल्हड मध्ये गरम मसाला दुध आले. दुध खरेच उत्तम होते हॉटेल मालकाचे आभार मानून पुढे निघालो. तो लखनौ जवळ असताना एका गावाजवळ एका चाट वाल्याने आमचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या हातगाडीवर विविध प्रकारचे चाट प्रकार उपलब्ध होते. मनाला आवर घालता आला नाही. जे चाट प्रकार आपल्या महाराष्ट्रात पाहायला ही मिळत नाही असे प्रकार होते त्यापैकी " खस्ता व बैगनी, टिकीया " या पदार्थाची नावे आठवतात. खुप स्वादिष्ट व चटपटे पदार्थ मनाची तृप्ती होईपर्यत आनंद घेऊन निशानगंज चौकातील निरालानगर येथील सरस्वती शिशू मंदिरात पोहोचलो. तेथे श्री मुत्तूलालजी यांची भेट झाली. त्यांनी स्वतः मॉडेल हाऊस कार्यालयात पोहचवून दिले. हे लखनौ चे मुख्य कार्यालय असल्याने सर्व सेवा उपलब्ध आहेत. तेथे श्री रामलखनसिंग यांनी स्वागत केले. त्यावेळी विभाग प्रचारक स्वातरंजनजी व रामचंद्रजी यांचेशी परिचय झाला आम्हाला तिथे जाईपर्यंत रात्रीचे आठ वाजले असल्याने कार्यालयातील भोजनाची वेळ होऊन गेली होती. म्हणून जवळच श्रीराम रोड वरील आदर्श भोजनालय येथे रात्री भोजनाची

व्यवस्था केली. येथील भोजन एकदम साधे व कमी तिखट असलेले होते. बहूधा लाल तिखट याचा वापर कमी करतात. पण जे होते ते स्वादिष्ट होते. भरपेट जेवण घेत आस्वाद घेतला.

आपण भरपेट भोजन घेतले हा शब्द अनेकदा वाचला असेल, कारण ही तसेच होते. एकतर तरुण वय व शंभर शंभर कि. मी. सायकल चालविणे यामुळे आमचा आहार चांगलाच वाढला होता. हे आपणास वाचताना लक्षात आले असेलच. दुसरे दिवशी लखनौ दर्शन हा कार्यक्रम ठरला. सोबत श्री श्यामलालजीनी सोबत येण्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही झोपी गेलो.

उद्या लखनौ हि उत्तर प्रदेश ची राजधानीचे दर्शन कसे झाले ते वाचणार आहोत ते वाचू या **पुढील भागात**.

## लखनऊ दर्शन

गुरुवार दि. १३ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आपण अयोध्या ते लखनौ या प्रवासा दरम्यान खोवा व छेना पासून तयार केलेली मिठाई व विविध प्रकारचे चाट प्रकार याचा आनंद घेतल्याचे सांगितले. खरे तर बनारस मध्ये आपण कधी गेलात तर रबडी, काशी चाट व जलेबा, (मोठ्या आकाराची जिलेबी ) व बनारसी पान खायला विसरु नका. तसेच हे पदार्थ उत्तर प्रदेशात सर्वत्र मिळतात. तर ही खाद्य सफर आजही आपण अनुभवणार आहोत. चला तर जाऊ या.

आज आपली भ्रमंती आहे लखनौ या राजधानीच्या शहरा मध्ये. लखनौ म्हणजे नबाबाचा अंमल असलेले शहर, गोमती नदी किनारी वसलेले शहर. सर्वात मोठा रेल्वे प्लॅटफॉर्म असलेले शहर, नबाबाची शाही बिर्यानी खाण्याचे शहर, असे म्हणता येईल. तर या शहरा मध्ये फिरविण्यासाठी सकाळीच श्री श्यामलालजी हजर झाले, आणी घेऊन गेलेत सकाळचे जलपान करण्यासाठी एका खादाडी साठी लोकप्रिय असलेले हॉटेल "रामभरोसे हॉटेल " येथे. नाव रामभरोसे असले तरी मिठाई अव्वल दर्जाची, शहरातील विविध भागातून केवळ खादाडी साठी येणारे खुप लोक होते. तसेही उत्तर प्रदेशात लोक सकाळी मिठाई खाने जास्त पसंत करतात तर रात्री चाट चटपटा. जसे आपल्या कडे तर्री

पोहा खायला लोक येतात तसे इथे लोक येतात " दही जिलेबी " खायला. मस्त घट्ट खवलेदार दही ज्यात साखर घालायची गरज नाही आणी जलेबी असली की " रंगाखुश "

आम्हीही मागवली, जिलेबीचा तुकडा दह्यामध्ये भिजवून तोंडात घातला आणी शब्द बाहेर पडले ". वा क्या बात है "

एका प्लेट मध्ये समाधान झाले नाही म्हणून पुन्हा एक प्लेट मागवली. व पाठोपाठ " दही कलाकंद". तृप्तीची ढेकर देऊन चालू लागलो ते कुकरेल गार्डन कडे.

शहरातील एका बाजूला असलेली कुकरेल गार्डन बगीचा म्हणून सुरेख आहेच. पण जास्त प्रसिद्ध आहे मगरीच्या विविध प्रजाती मुळे मगरीचे विविध आकार, त्यांच्या हालचाली आक्रमकता पाहण्यात बराच वेळ गेला. इथे मगर प्रजनन केन्द्र ही आहे. तिथे विविध प्रजातीचे संगोपन व संवर्धन केल्या जाते.

कुकरेल गार्डन चा फेरफटका मारल्या वर आम्ही भेट दिली " महामना बाल निकेतन "

अनाथ अंपग बालकांसाठी निर्माण केलेले हे बाल निकेतन हा एक अभिनव प्रकल्प आहे. संगोपन शिक्षण व स्वावलंबन या त्रिसुत्री च्या आधारे स्थापीत झालेली संस्था. आज दुपारची भोजनाची व्यवस्था इथे करण्यात आली होती. अनाथालय असताना सुध्दा भोजनाचा दर्जा उत्तम होता.

भोजनोत्तर आम्ही आलो " विधान सभा भुवन येथे, इंग्रज काळातील बांधलेली ही वास्तू वास्तू कलेचा उत्तम नमूना आहे. लखनौ दर्शन करताना जरुर पाहावे असे. त्यानंतर हजरतगंज मार्गे शहीद स्मारक, या स्थानाला भेट दिली, शहीद स्मारक एक देखणे शिल्प होते, स्वातंत्र्याचा साठी बलिदान केलेल्या क्रांतिकारकांचे स्मारकापूढे नमन करुन " रुमी दरवाजा " पाशी थांबून अवलोकन केले. लखनौ मध्ये असलेल्या अनेक दगडी दरवाजा पैकी आपल्या कोरीव नक्षी मुळे प्रसिद्ध असलेला हा दरवाजा शिल्प कलेचा उत्तम नमूना आहे. आता वळलो ते "भुलभुलैया कडे.

भुलभुलैया ही इमारत नबाब आसीफउद्दोला यांच्या कारकिर्दीत सन १७७३ ते १७८४ चे दरम्यान इराणी इंजीनियर किफायततुल्ला याने बांधली. यात लोखंड वापरले नाही. तर विटा रेती चुना डिंक याच्या साह्याने बांधलेली भव्य इमारत आहे. काचेचे तुकडे वापरून केलेली कलाकुसर मोठमोठी दालने पाहण्यासारखी आहेत. पण खरी गंमत आहे ती भुलभुलैया ची. वरच्या मजल्यावर अनेक दालने पहात असताना आपण वापस येत असतो तेव्हा तिथे वर जाणे वा खाली उतरण्यासाठी अनेक जिने उपलब्ध असतात. त्यापैकी आपण एक जिना निवडून पुढे जावे तर आपण वेगळ्याच दाराने उतरत जातो पण इमारती बाहेर पडत नाही. आमच्या जवळच्या गाईडने एका ठिकाणी आणून सांगितले आता बाहेर पडून दाखवा असे म्हटले. आम्ही आव्हान स्विकारले पण १५-२० मिनिटे झाली तरी इमारतीच्या बाहेर

जायचा रस्ता सापडेना. शेवटी गाईड होता तिथेच पोहोचलो. व गाईड च्या मदतीने बाहेर पडलो. असे आहे " भुलभुलैया "

बाहेर पडलो तेव्हा संध्याकाळ झाली होती पुन्हा हजरतगंज मार्गावर आलो. त्या रस्त्यावर अनेक छोटे मोठे वैविध्यतेने नटलेले पार्क आहेत. काहीमध्ये विविध फुलझाडे आहेत तर काहीमध्ये शोभेची झाडे. तर काहीत सुंदर हिरवळ त्यामध्ये कांरजे व रंगबेरंगी लाईट सोडल्यामुळे खुप मनोरम होते. त्यातही " निंबू पार्क, गौतम बुध्द पार्क, ग्लोब पार्क या सारखे पार्क पाहण्यासाठी तिकीट काढून जावे लागते. त्यातही निंबू पार्क सर्वात सुंदर. या सुंदर पार्कच्या मागच्या बाजूला शांत शितल गोमती नदीचे पात्र आहे. नदीचे काठावर विविध रंगी लाईट लावून सुशोभित केलेले असून तेथे निवांतपणे बसण्याची व्यवस्था आहे. पार्कच्या बाहेरच्या बाजूला मेन रोड वर चाट बजार सजला होता. आज ते चाट प्रकार आमची वाट पहात होते. पाणीपुरीच्या पाण्याचे विविध प्रकार, शिवाय दहीपूरी, भेलपूरी, बैगनी, टिकिया इ. इ. पाणीपुरीला तिकडे गोलगप्पे वा गुपचूप म्हणतात. आम्ही सारे प्रकार टेस्ट करुन कार्यालयात पोहोचलो.

कार्यालयात श्री इंदूभुषण जी पांडेय आमची वाट पहात होते. आदले दिवशी आम्ही पांडेजी पुर्वपरिचित असल्याने भेटीची इच्छा प्रदर्शित केली होती म्हणून आवर्जून भेटायला आले होते त्यांचेबरोबर आज रात्रीचे भोजन झाले. लाल तिखटाचा वापर न करता फक्त हिरव्या मिरच्या व कोथींबिर घातलेले, मुगाच्या डाळीचे फोडणीचे वरण

चपाती व भात असे शुध्द भोजन झाले. कारण त्यात कांदा लसूण याचा वापर केला नव्हता.

रात्री बराच वेळ संघकार्य, रामजन्मभुमी या विषयी चर्चा झाल्यावर निद्राधीन झालो.

उद्या आपण लखनौ शहराचा निरोप घेऊन रायबरेली या शहरात जाणार आहोत. तर तेथील गमती जमती वाचूया **पुढील भागात**.

प्रसिद्ध भुलभुलैया या इमारतीच्या गच्चीवर काढलेले छायाचित्र



## रायबरेली दर्शन

शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आपण लखनौ शहरातील प्रेक्षणीय स्थळे, पाणीपूरीची लज्जत व भुलभुलैया मध्ये कसे हरवलो ते वाचलत. आज सकाळी ७. ३० ला रायबरेली साठी जाण्यास सिध्द झालो. इंदुभुषणजी, रामचंद्रजी यांनी कुकुंमतिलक लावून आदराने निरोप दिला. आम्ही रायबरेलीचा रस्ता पकडून चालू लागलो. आजचे अंतर होते फक्त ८२ कि. मी. रस्ता तर विचारुच नका एकदम मख्खन, कारण ही तसेच होते. हा रस्ता राजधानी लखनौ ते श्रीमती इंदिरा गांधी यांचा मतदारसंघ जोडणारा.

पहिला टप्पा होता मोहनलालगंज अंतर होते २५ कि. मी. वेग छान होता फक्त ५० मिनिटातच गाठले. पुढील टप्पा ५० कि. मी. वरील बछरावाॅं हे गाव असल्याने इथेच जलपान करावयाचे ठरले. इथे रस्त्याच्या बाजूला एका हॉटेल मध्ये समोसे तळण्याचा सुंगध सुटला होता. सकाळचे वेळेस जो गरम पदार्थ मिळेल त्यावर समाधान मानून पुढे जायचे. नशीबाने ग्रामीण नेपाळ सोडता सर्वच ठिकाणी प्रत्येक वेळेस नवीन पदार्थ चाखावयास मिळत होता, आज समोसा होता इतकेच.

आम्ही हॉटेल मध्ये जाऊन बसलो. आमचा वेष अवातार पाहून सर्वांचे चेहरे प्रश्नार्थक होते ? कौन है ये लोक ? कारण उत्तर प्रदेशात जातीपातीचे निर्बंध खुप आहेत, त्यामुळे आम्हाला पाहताच त्यांच्या लक्षात यायचे हे लोक जवळपास च्या गावातील दिसत नाहीत वेष राहणीमान व बोलीभाषा यामुळे आम्ही ओळखले जायचो. गावाच्या हॉटेल मध्ये रिकामटेकडी मंडळी बसलेली असायचीच. त्यातल्याच एक पांढरे कपडे घातलेल्या मध्यमवयीन माणसाने विचारले. जो कदाचित सरपंच असावा

. " कहां से आ रहे हो ?

जी, नेपाल काठमांडू से -- - अनिल

जी, मेरा मतलब कौनसे गाव के रहने वाले हो ?

जी, नागपूर महाराष्ट्र से ---- अनिल

भई, कमाल की बात है, हमको तो सायकिलसे लखनौ जाने कष्ट होता है. और आप लोग इतनी दूर से आये हो. ? कितना किलोमीटर का सफर होगा ?

जी, ३५०० कि. मी. --- अनिल

क्या बोले साढे तीन हजार कि. मी. ?

जी हां ---- अनिल

कितना दिन लगेगा ?

जी चालीस दिन ---- अनिल

फिर तो बडी बात है. इतनी दूर हमरे गाव मे आये हो. ये तो बडी बात है. ऐकून खुश होत हॉटेल मालकाला म्हणाला " भई, इनको गरमागरम समोसे खिलाव.

लगेच आजूबाजूचे लोक जमा झाले. समोसे खाता खाता त्यांच्या प्रश्नांना उत्तर ही देत गेलो.

ग्रामीण भागातले असले तरी समोसे खुप छान होते. नंतर गरम दुध घेतले पैसे द्यायला गेलो तर ते मघाचे गृहस्थ म्हणाले " आरे भाई, रहना दो, आजका जलपान हमरे तरफसे " हम गाॅंव का सरपंच है " आम्ही नाही म्हटले तरी त्यांनी पैसे घेतले नाही.

आम्ही गावकरी लोकांचा निरोप घेऊन बछरावा कडे निघालो पुन्हा ५० मिनीटातच बछरावा गाठले. जेमतेम ११ वाजले असावेत म्हणून पुढेच जायचे ठरवले, कुंदनगंज, हरचंदपूर व रायजादा ही गाव पार करुन आम्ही दुपारी १ वाजताच रायबरेलीच्या कार्यालयात पोहचलो. श्री प्रकाशजी व श्री अशोकजी जिल्हा प्रचारक यांनी स्वागत केले आमचा परिचय करुन दिला. थोड्या वेळात पाणी आणि हलका नास्ता जलपानासाठी आला. विसावल्यावर श्री प्रकाशजी विचारते झाले " कहां से आ रहे हो ?

“सुबह ७. ३० को लखनौ से निकले थे. अभी यहा पहुॅंचे. -- मी

मतलब आपका भोजन होना बाकी है? – प्रकाशजी.

"जी हाँ. रास्ता इतना अच्छा था की चलते रहे. सुबह मोहनलालगंज मे भरपेट नास्ता हो गया था. इसलिये भुक भी नही लगी. सिधे यहा आकर पहुँचे. -- मी

" तो कोई बात नही, हम लोग भी दुसरे गाव से होकर आ रहे है. हमारा भी भोजन होना बाकी है. अभी बना देते है. तबतक आप लोक विश्राम किजीये. -- प्रकाशजी

लगेच प्रकाशजी व स्वयंसेवक स्वयंपाक करायला लागले. तोपर्यंत आम्ही आराम केला. दुपारी ४ वाजता त्यांचा स्वयंपाक तयार झाला. जेवणात बटाट्याची रस्सा भाजी चपाती भात असे सर्व कार्यकर्त्या समवेत सहभोजन झाले.

दुपारी पाच नंतर आम्ही रायबरेली शहराचा फेरफटका मारायला बाहेर पडलो. पुर्वीचा श्रीमती इंदिरा गांधीचा मतदार संघ होता. त्यामुळे त्यांच्या कामाची छाप सापडणार असे वाटले. ते खरे ही होते. सर्वच सरकारी निम सरकारी इमारती चे उदघाटन इंदिरा गांधी यांनी केलेले आढळले. उदा. रेल्वे स्टेशन, बस स्टॅंड, डाकघर सुपर बाजार आदी इमारतीवर नामफलक झलकत होते. स्थानिक लोकांसाठी रोजगार म्हणून " लोहिया मशीन टुल्स " व टेलीफोन फॅक्टरी चालू केल्याने

कामगार कर्मचारी यांचीच लोकसंख्या प्रामुख्याने होती. जवळ असलेल्या एका तलाव पाहण्यास गेलो निसर्ग रम्य परिसर पाहून गावातील मंडळी ना भेटत भेटत कार्यालयात पोहोचलो.

आज उशीराच जेवण झाल्यामुळे रात्री जेवणाची गरज नव्हती तरी एक स्वयंसेवक गरम दुध घेऊन आला. रात्री सर्वा सोबत गावातील गमती जमती ऐकतच झोपी गेलो.

उद्या प्रयाग या शहराकडे परतीचा प्रवास होता. त्या दरम्यान एक घटना घडली ती अविस्मरणीय तर आहेच पण माणूस इतक्या वर्षानंतर ही जातीपातीच्या राजकारणात किती आकंठ बुडाला आहे याचा नमूना आम्ही उद्या पेश करणार आहोत ते पाहू या **पुढील भागात**.

## माणिकपूरचा जातीयवादी तणाव

शनिवार दि. १५ नोव्हेंबर १९८६

काल आपण रायबरेली शहरातील गमती जमती वाचल्यात व श्री प्रकाशजी ची आत्मियता ही अनुभवलीत.

अशी आत्मियता की, आधी कुठलाही परिचय नसताना, व ते स्वतः दुपारी प्रवास करुन आल्यावर ही लगेच स्वयंपाकाला लागून अभ्यागतांना पोटभर जेवू घातले.

आज सकाळी ही लवकर उठून लवकर चहा करून दिला व नंतरच प्रेमाने निरोप दिला. आज प्रयाग ला परत जायचे होते. अंतर होते १४० कि. मी. त्यामुळे वेग वाढवावा लागला, पहिला टप्पा होता " उंचाॅहार " ३५ कि. मी. साधारण दोन तासात पोहोचलो. येथेच जलपान करावे म्हणून हॉटेल शोधत होतो. गाव खुप मोठे नव्हते. एक झोपडी सारखे हॉटेल दिसले तसे थांबलो.

हॉटेल मध्ये प्रवेश करून लाकडी खुर्चीवर विसावलो तोच मालक म्हणाला " रुकिये, कौन लोग हो आप ?

" मुसाफिर है. इलाहाबाद जा रहे थे. तो नास्ता के लिये रुक गये ". मी

कौन गाव के हो. ? हॉटेल मालक

" जी नागपूर से, ये रायबरेली से निकले थे "

" शकल से तो डाकू जैसे दिखते हो, कौन जात के हो "

जी उंचे जात के है --- मी

फिर बैठो, क्या लेंगे पोहा जलेबी पकौडे ?

" पोहा ही दे दो " --- मी

ठीक है अभी देता हू --- मालक

पहले पानी दे देना --- मी

त्याने पोराला इशारा केला. पोराने प्लास्टिक

जारने ओंजळीत घेऊन प्यायला सांगितले

" गिलास नही है क्या ? -- मी

" यहा झूटन नही चलता -- मालक ओंजळीने आधी प्यायलो. शेवटी कागदावरच पोहे दिले. व कुल्हड मध्ये चहा. पैसेही दुरुन ठेवायला सांगितले तेव्हा लक्षात आले इथे छुआ छूत चा स्फोट होऊ शकतो. आपण परराज्याचे प्रवासी, जपूनच वागले पाहिजे. आम्ही लगेच मार्गस्थ झालो. जाताना मनात विचार आला. कदाचित आपण निचले जाती के है असे सांगितले तर पाणी ही दिले नसते.

पहिल्या प्रसंगातून बाहेर पडलो. आता थोडे ऊन तापले होते. सायकल चालवून आणखी दोन तास झाले. तहान खुप लागली होती.

पाणी प्यायला शिवाय पुढे जाणे शक्य नव्हते, समोर गाव दिसताच पाणी पिण्यासाठी थांबलो गावाचे नाव होते " माणिकपूर "

एका घरापाशी थांबून एका महिलेला विचारले पाणी विचारले " हमे थोडा पाणी चाहिये " -- मी.

" आगे कुआँ हे वहा जाकर पियो. घरातील महिला म्हणाली.

नाइलाजाने अजून दो तीन घरी विचारले तर हेच उत्तर आले. लोक असे वागताहेत कळेना. आतापर्यंत असे कधीच झाले नव्हते. लोकांच्या चेहऱ्यावर भिती दिसत होती बोलायला टाळत होती. आम्ही ओळखले, काहीतरी गडबड आहे नक्की पुढे काही अंतरावर पोलीस हवालदार उभे होते. त्यांना विचारले " यहा पाणी मिलेगा क्या ? कोई पाणी नही दे रहा -- मी

पोलीसाचे नाव होते श्री शिवभूषण ओझा.

" हम लोक सायकल से नेपाल गये थे. अभी रायबरेली से प्रयाग की तरफ जा रहे है " - मी

पोलीसाला कारण माहीत असावे म्हणून कुणाला न सांगता म्हणाले

" ये बाजू वाला कुआँ पर जाव "

आम्ही विहिरी पाशी गेलो तिथे एक सवर्ण महिला पाणी भरत होती. जवळ जात म्हणालो "माताजी पिने के लिये पाणी मिलेगा ?

" ये छुओ मत, पूजा के लिये पाणी ले रही हू"

आम्ही रायबरेली हून स्नान करुनच निघालो होतो म्हणून म्हणालो " माताजी सुबह स्नान करके आये है, हमे बहूत प्यास लगी है. थोडा पाणी दे दो "

अजून जवळ गेलो तर ओरडलीच " ये दूर हटो. कौन जात के हो मालूम नही " हम अपवित्र हो जायेंगे "

माताजी पाणी के लिये क्यौ मना कर रही हो ? मी

" यहा सिर्फ उची जात वाले पाणी लेते है.

" पहले तो यहा सत्यानाश कर दिया निचली जातीने " दिन दहाडे भगाकर ले जाते है. हमरे बहू बेटीको "

मला लक्षात आले इथे नक्की काही घटना घडलीय. उची जातवाले सांगितले पाहिजे

मां जी हम तो उची जात वाले है -- मी शकल सुरत से तो डाकू गुंडा लगते हो. " ऐसा करो वो सामने वाले कुआँ मे जाओ. माताजी

मनात म्हणालो " आता आपले अस्त्र दाखवले पाहिजे तरच या गावात पाणी मिळेल"

" माताजी मै तो ब्राम्हण हू " गळयातले जाणवे दाखवत म्हणालो " ये देखो "

अरे बापरे ब्राम्हण देवता " कानाला हात लावत म्हणाली " गलती हो गयी, माफ कर देना " आप जुता उतार लो और पाणी ले लो माताजी

आम्ही जोडे काढून पोटभर पाणी प्यायलो. पिवून वापस आलो तर पोलीस शिवभुषण ओझा उभे होते. त्यांना विचारले, तेव्हा ते म्हणाले

दो दिन पहले एक सवर्ण जाती के लडकीने निचली जाती के युवक के साथ भाग कर शादी की है. ईसलिये तणाव है. थोडा थांबून म्हणाला " आगे भी जरा सभंलकर जाना " माहौल ऐसा ही है. यहां कुछ भी दंगा फसाद हो सकता है "

आता लक्षात आले काय घटना घडली. आता आम्ही जेवणाला ही पुढे न थांबता सरळ प्रयाग गाठायचे ठरवले.

पुढे कुंडा लालमोहनगंज, नबाबगंज प्रतापगढ इथे न थांबता संध्याकाळी ७ वा. प्रयाग कार्यालय गाठले. सामान ठेवून तयार झालो.

आज सकाळपासून जेवलो नसल्याने कडाक्याची भूक लागली होती. अशोकजी बाजपेयी कार्यालयात होते त्यांना घेऊन त्यांच्या नेहमीच्या हॉटेल मध्ये गेलो.

हॉटेल मालकाने बरोबर ओळखले येताच म्हणाले " आईये, नेपाळ हो कर आ गये ?

जी, बस आ रहे है " अनिल

सफर कैसा रहा ? मालक

जी बहूत अच्छा " अनिल

बैठिये खाना लगवाता हू मालक

आम्ही टेबलवर बसून वाट पाहू लागलो. या वेळी मात्र लवकरच जेवण आले. छोले की सब्जी, दाल तडका व चपाती

" आरामसे खाईये. संकोच मत किजीये" मालक

आम्हाला तर भुक लागली होती मागच्या वेळे सारखे आम्ही जेवत होतो. या वेळी मात्र चपाती खाण्याची शर्यत लावली नाही पण प्रत्येकी दहा बारा चपात्या नंतरच थांबलो. सोबत पूलाव पण होता. हात धूवून बील विचारले तर म्हणाले " सतरा रुपये "

सिर्फ सतरा रुपया

जी, जी.

आम्ही पैसे देऊन बाहेर पडलो. इतके स्वस्त जेवण मिळाले याचे आश्चर्य वाटेल पण सत्य होते पायी चालत कार्यालयात पोहोचलो. आज खुप दमलो असल्याने लवकरच झोपी गेलो.

उद्या पासून नागपूर कडे परतीचा प्रवास होणार होता. तो कसा झाला हे पाहू या **पुढील भागात**.

## रिवा (म. प्र. ) मध्ये प्रवेश

रविवार दि. १६ नोव्हेंबर १९८६

काल आपण परतीच्या प्रवासात " प्रयाग" या शहरी येऊन पोहोचलो. मार्गात जातीपातीच्या भयंकर वास्तवाचा कसा सामना करावा लागला हे आपण बघितलत.

आज सुप्रभाती स्नान करुन तयार झालो. प्रयाग कार्यालयातील स्वयंसेवक निरोपासाठी हजर होते. माझे मित्र अशोकजी मालवीय सकाळीच आले होते. कुकुंमतिलक लावून " भारत माता की जय " वंदे मातरम " या घोषणा झाल्यात व निरोप घेऊन मार्गस्थ झालो. सोबत अशोकजी यमूना नदीच्या पुला पर्यत सोडायला आले होते. त्यांचे आभार मानले व निरोप घेऊन यमूना नदीचे शांत शितल दर्शन घेत यमूना नदी पूल पार केला.

आज १२५ कि. मी. पार करुन रीवा हे शहर गाठायचे होते. सुरवातीचे नैनी शहर तर सहज पार झाले. मग धुरपूर आले. पुढे नारी-बारी -जारी असे गमतीदार नाव असलेले गाव आले. सकाळचे ९. ३० वाजले होते. सकाळच्या जलपानाची वेळ झाली म्हणून ढाबा शोधू लागलो. तो गाव ओलांडताच एक ढाबा मिळाला. हा राष्ट्रीय महामार्ग असल्याने नास्ता जेवण यासाठी ढाबे मिळतात. अजून उत्तर प्रदेश सोडले नसले तरी ढाब्यावर जातीपातीचे पालन होत नाही, म्हणून

ढाब्यावर विसावलो. ढाबा असल्यामुळे अन्य नास्ता प्रकार मिळत नाहीत पण पराठे प्रकार खुप छान मिळतो. म्हणून आम्ही आलू पराठे ची ऑर्डर दिली, तोपर्यंत ढाबा मालक सरदारजी आमच्या शी विचार पूस करु लागले.

" भाई, कहां से आ रहे हो ? ये सायकिल ये सामान ? कुछ लंबा सफर करके आये हो ?

" हॉ जी नेपाल से " प्रदिप

" कहां के रहने वाले हो ?

" नागपूर महाराष्ट्र से प्रदिप

" भई वा कमाल की बात है. मान गये". इतक्यात वेटरने पराठे आणले. पराठ्याची चव तर अप्रतिम होती. बरेचदा दुपारी जेवण होईलच असे सांगता येत नसे. म्हणून पुन्हा मागविले व चहा ची ऑर्डर दिली. तर सरदारजी म्हणाले " अरे भाई इतनी मेहनत करते हो, तो दुध पियो. हमारे यहा का दुध पियोगे तो एनर्जी आ जायेगी ". दुध खरोखर घट्ट मलईदार होते. पिऊन मस्त ढेकर दिली. पैसे द्यायला गेलो तर सरदारजी म्हणाले " दुध के पैसे मत देना. वो हमारी तरफसे " सिर्फ पराठे के पैसे ले रहा हू.

खरोखर प्रवासात असा मान खूपदा मिळते. साहसी विरांना पाहून आपण ही यांच्यासाठी काही करावे असे प्रत्येकाला वाटत असते. सरदारजीचा निरोप घेतला आणि चाक घाट ला आलो. तमसा नदीचा पूल पार करुन उत्तर प्रदेशातून मध्यप्रदेशात प्रवेश केला, आता सोहागी

हा घाट ४ कि. मी. चढायचा होता. उभा चढ असल्याने सायकल हातात घेऊनच घाट पार करावा लागला. चांगलीच दमछाक झाली होती. काही वेळ उतारा वरून चालवून सोहागी या गावात पोहचलो. व जरा वेळ विश्रांती घेऊन पाणी प्यायलो. दुपारचे ऊन खुप होते. पण पुढेच जायचे होते. आता कटरा गाव आले. पुढे गढ गाव पार करुन गंगेव गाव इथे आलो. दुपारचे ऊन खुप तापले होते, मोठा पल्ला पार केला होता. कुठेतरी भोजन घ्यावे असे वाटत होते.

रस्ताचे बाजूला आंब्याचे झाडाच्या सावलीत एक ढाबा होता. ऊनाच्या काहीली तून सावलीत आल्यावर एकदम शांत वाटत होते. सर्वांनी ढाब्याचे विहिरीवर जाऊन गार पाण्याने हात पाय धुतलेत, आणी थोडा वेळ खाटेवर विसावलो. ढाब्याचा वेटर विचारत आला " क्या लावू साब ? खाना खायेंगे ?

" जी हा. क्या बनाया है " प्रशांत

" जो बोलोगे वो बना दुंगा " वेटर

" टमाटर की चटणी बनाओगे ?

" हां जी. और हमारे हाथ की आलू बैगन की सब्जी बना देते. "

" बनाओ बनाओ " बहोत दिनोसे बैगन भाटा की सब्जी का आनंद लिया नही " प्रशांत म्हणाला

तो पर्यत आम्ही ढाब्याच्या खाटेवर लोळलोच.

१०-१५ मिनिटात गरम जेवण आले. श्रमाने दोन घास जास्तच झाले. थोडा वेळ विश्रांती घेऊन मार्गस्थ झालो. आता मनगवा व रिवा

हे दोन गाव बाकी होते. दुपारी चार नंतर सायकल चालवणे सूरु केले. संध्याकाळी सहा वाजता रिवा कार्यालयात पोहोचलो. कमलाकरजी यांनी स्वागत केले.

आईये, आईये. बहोत थके हुए दिख रहे हो. अब विश्राम किजीये.

खरोखर ऊन्हामुळे खूप थकलो होतो. स्वयंसेवकानी सामान नेण्यास मदत केली. आम्ही फ्रेश होऊन विश्राम केला. रात्री आठचे दरम्यान जेवायला जायचे म्हणून हॉटेल बद्दल विचारले तर कमलाकरजी म्हणाले " आपको कही जानेकी जरुरत नही. "आपके भोजन का प्रबंध हो गया है. "

आम्ही थांबलो. थोड्याच वेळात दोन स्वयंसेवक चार पाच टिफीन घेऊन आले. चार पाच घरुन जेवण आले होते. कमलाकरजी सोबत होते. स्वयंसेवक स्वतः आदराने वाढत होते. जवळपास ३०-३२ दिवसांनी घरचे जेवण मिळत होते. घरच्या जेवणाची लज्जत काही और असते. ते पाहून घरची आठवण झाली. डोळे पाणावले. आज तृप्ततेचे समाधान होऊन ढेकर आली. आज श्रम खूप झाले होते त्यामुळे लवकरच झोपी गेलो.

उद्याचा प्रवास कटनी जबलपूर कडे होणार होता. त्यातल्या विशेष आठवणी पाहू या **पुढील भागात**.

## कटनीचे आतिथ्य

सोमवार दि. १७ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आपण परतीच्या प्रयाग ते रीवा प्रवासा दरम्यान ऊन्हामुळे झालेली शरीराची काहिली व घाट चढाई मुळे खुप दमलेलो होतो.

आज सकाळी थोडे ऊशीराच तयार होऊन कटनीच्या दिशेने मार्गस्थ झालो. रस्ता बराच चांगला होता, आणी पहिला टप्पा " अमरपाटण ४३ कि. मी. अंतर सहज दोन तासातच पार केले तेव्हा सकाळचे ९. ३० वाजले होते. आणी सकाळच्या जलपानाची वेळ झाली म्हणून एका हॉटेल पाशी थांबलो. सकाळच्या वेळी गरम इंदोरी पोहे तयार होते ते मागवले. बाजूला भट्टीवर पपडी व जिलेबी तळत होते. गरम पोहे वर बिट चा कीस, डाळींबाचे दाणे, खास इंदोरी शेव व चाट मसाला घातलेल्या पोह्याची चव अप्रतिम होती. काही वर्षापूर्वी च आपल्या विदर्भात तर्री दार पोहे मिळायला लागले त्यापूर्वी असेच पोहे नागपूर ला मिळत होते. पोटभर खाल्ले. व चेंज म्हणून गरम पपडी मागवली, जिलेबी खाणे मात्र टाळले. चहा तर खुप चांगला झाला होता. खुप चुस्ती स्फुर्ती आली.

आता न थांबता जास्तीत जास्त अंतर गाठायचे व शक्यतो जेवण ही उशीरा किंवा रात्रीच करायचे असे ठरविले होते.

आमच्या प्रवासात नेपाळचा पहाडी भागात स्वेटर व ट्रॅक सुट दोन्हीही घालावे लागत होते. पण या भागात ऊन तापल्यामुळे नुसता ट्रॅक सुट मुळे ही घाम निघायला लागला. गर्मी मुळे सायकल चा वेग मंदावत होता. मैहेर अवघे २४ कि. मी. असताना दीड तास लागला. मैहरच्या देवीचे दर्शन नेपाळला जाताना च घेतले होते, म्हणून इथे थांबायचे नव्हते, पण पाणी पिण्यासाठी थांबावेच लागले. एका हॉटेल मध्ये थांबून पाणी घेतले, थोडी एनर्जी यावी म्हणून पुन्हा चहा घेतला. माता शारदा देवीच्या कळसाचे दर्शन घेतले व आमची मोहीम यशस्वी व्हावी म्हणून प्रार्थना केली व सभागंज या गावाकडे रवाना झालो.

पुढे २० कि. मी. सायकल चालविल्यानंतर विरुध्द दिशेने वारा येऊ लागला. उन्हाचा ताप कमी झाला. पण वारा वेगाने वाहत असल्यामुळे सायकल चालवताना ताकद लावावी लागत होती. पाऊस पडेल असे वाटत होते. कटनी पर्यत चे अंतर खुप होते. पण वातावरण साथ देईना असे झाले होते. एका तासात फक्त बारा कि. मी. अंतर पार झाले होते. पुन्हा छोट्या गावात पाणी पिऊन चालवायला सुरवात केली. यापुढे मात्र वारा मंदावला, थंडावा आला व रस्ते ओले झालेले दिसत होते, म्हणजेच पाऊस पडून गेला होता. पहा देवाची कृपा, आम्हा प्रवाश्यांना ओले होऊ दिले नाही. काही वेळातच झुकेही (मोड) हे गाव आले. "श्री गुरुजी शाकाहारी भोजनालय " असा फलक दिसताच प्रदिप म्हणाला " आता ईथे थोडा वेळ थांबून मग पूढे जाऊ. " त्याला दुजोरा देऊन आम्ही सायकली ढाब्या समोर थांबवल्या. ढाबा मालक

शर्माजीनी लगेच ओळखत म्हणाले " आईये आईये आपका स्वागत है "

आम्ही समोर ठेवलेल्या खाटेवर बसून पाणी प्यायलो तर शर्माजी म्हणाले " अब खानेका समय हो गया है, खाना खाकर ही जाईये "

दुपारचे तीन वाजले होते " ऊन्हा मुळे थकलो होतोच म्हणून थांबून आराम करावा असे वाटतच होते. भुक ही लागली होती. प्रशांत हा आमच्या मधला सर्वात लहान सदस्य तो म्हणाला " आपण ईथेच जेवण घेऊ " आम्हीही मान्य करून शर्माजींना लगेच हिरवी झेंडी दाखवली. मागच्या वेळेस ढाब्यावर मुक्काम केल्यामुळे शर्माजीशी एक नाते तयार झाले होते, आज ते खुश होते. स्वतः कुक ला सांगून विशेष डिश तयार करायला लावली.

आज जेवणात छोले पनीर ची भाजी, दालफ्राय, तंदूरी रोटी, पूलाव, सलाद व स्वीट डिश म्हणून रबडी होती. शर्माजी जातीने स्वतः वाढत होते. त्यामुळे जरा जास्तच जेवण झाले. तोपर्यंत पाच वाजले होते. शर्माजीनी जेवणाचे पैसै नाकारत सांगितले. " आप इतनी दूर से सफर तय करके आये हो, हमारा भी फर्ज बनता है. आपको सहयोग करे "

शर्माजीच्या आतिथ्याला सलाम करत पुढे निघालो.

कटनी आता १७ कि. मी. अंतरावरच होती अवघ्या ४० मिनिटांत कटनी कार्यालयात पोहोचलो. अरविंद जी नेताम यांनी स्वागत केले. व आराम करावा असा आग्रह केला. आम्हीही जरा वेळ विसावलोच.

थोड्या वेळाने अरविंदजी सायम शाखेसाठी बाहेर जायला निघाले होते. ते म्हणाले

" चलिये नजदीक वाली शाखा मे होकर आयेंगे. आपका परिचय भी होगा. और आपके साहस की कथा भी सुनायेंगे " आम्ही दुजोरा देऊन बाहेर पडलो. शाखेत परिचय झाला अनुभव कथन झाले. यामुळे प्रभावित होऊन एक स्वयंसेवक श्री वर्माजीनी घरी चलण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन घरी गेलो. घरातील सर्व सदस्यांचा परिचय करुन दिला. घरातील मुलांची उत्सुकता वाढली, ते प्रश्न करु लागले पुन्हा अनुभव कथन केले. पण या सर्वासाठी बराच वेळ निघून गेला. आता वर्माजी चा निरोप घेऊन निघणार तोच श्रीमती शर्मा बाहेर येत म्हणाल्या " अब भोजन लेकर जाईये "

" लेकिन हमने अभी चार बजे ही दोपहर का भोजन लिया है. भुख भी नही है " मी म्हणालो

" कोई बात नही लेकिन हलकासा दाल चावल तो चलेगा ना ? "

अरविंद जी आग्रह करु लागले. कारण त्यांचेही जेवण व्हायचे होते. आम्ही संमती दिली.

थोड्याच वेळात पंगत मांडली " सहनाववतू" भोजन मंत्र झाला. सर्व लोकां सोबत सहभोजन झाले. बेत साधाच बटाटा भाजी, दालफ्राय चावल व अचार असे साधेच जेवण घेऊन परत कार्यालयात येऊन निद्राधीन झालो.

दुसरे दिवशी सकाळी जबलपूर कडे रवाना होणार होतो. तो प्रवास छोटाच होता पण कसा होता ते वाचू या **पुढील भागात**.

## जबलपुरात आगमन

मंगळवार दि. १८ नोव्हेंबर १९८६

कालच्या प्रवासात आपण रीवा शहरातून परत येताना विरूद्ध दिशेने येणारा वारा व ऊनाचा ताप सहन करत कटनी जवळील झुकेही मोड येथील श्री गुरूजी भोजनालयचे शर्माजी यांचे आपूलकीचे आतिथ्य वाखाणण्याजोगे होते. काल आपण कटनी कार्यालयात मुक्कामा बाबत वाचलेले आहे.

आज तर फक्त जबलपूर ९२ कि. मी. अंतर होते आज झोप छान झाल्याने प्रसन्न वाटत होते स्नान करुन तयार झालो. हवेतला सुखद गारवा सांगत होता. " अब थोडी चाय हो जाये " असा विचार मनात येताच अरविंद जी चहाचे कप घेऊन हजर झाले. गरम वाफाळलेला घट्ट दुधात तयार केलेला चहाचा पहिला घोट घेताच तरतरी आली. चहा घेऊन अरविंदजी चा निरोप घेतला. प्रेमाने गळाभेट झाली. पून्हा येण्यासाठीचा आग्रह मान्य करुन मार्गस्थ झालो.

आज सकाळी हवेत हलकासा गारवा होता. म्हणजेच थंडीत वाढ होणार याचे संकेत मिळत होते. पहले अंतर होते कटनी ते सिहोरा हे ५० कि. मी. होते. रस्ता चांगलाच होता. व आज खुप घाई नव्हती म्हणून सायकल चालविण्याचा आनंद घेत दोन अडीच तासात सिहोरा गाठले.

सकाळी १०. ३० वाजले होते. सकाळच्या जलपानाची वेळ झाली होती. उदर नावाच्या टाकीत इंधन घालणे आवश्यक होते म्हणून रस्त्यावर एका हॉटेल मध्ये थांबलो. त्यांचा कारागीर कचोरी तळत होता. तेव्हा कचोरीची ऑर्डर दिली. वेटरने प्लेट समोर आणून ठेवल्या. प्लेट मध्ये कचोरी फोडून त्यावर घट्ट दही, इमली चटणी, पूदिना चटणी, स्पेशल मसाला व वरून बारीक शेव पसरुन डिश समोर ठेवली होती. पहिल्या घास जिभेवर ठेवला. " अहाहा " झकास असेच शब्द बाहेर पडले. प्लेट संपताच दुसरी प्लेट मागविली. त्याकाळी एक प्लेट म्हणजे ३० पैसे, पन्नास पैसे असाच दर होता. पाच रुपयात सर्वांचा सकाळचा नास्ता होत असे. व सकाळी भरपेट झाल्यामुळे दुपारचे जेवण उशीरा झालेले चालत असे. तृप्ततेची ढेकर देऊन सिहोरा सोडले.

आता फक्त ४२ कि. मी. अंतर होते. स्लिमनाबाद, पनागर महाराजपूर असे गावं मागे टाकत दुपारी दोन ला जबलपूर कार्यालयात पोहोचलो. आ. नानाजी देशपांडे यांनी स्वागत केले. आज दुपारी भूक नव्हती. त्यामूळे सामान ठेवून मस्त झोप काढली.

जबलपूर कार्यालयात भोजन व्यवस्था नसल्यामुळे संध्याकाळी पायी फिरत फिरत गोल मार्केट परिसरात गेलो. एक शाकाहारी हॉटेल पाहून आत शिरलो. ते हॉटेल स्वच्छ मोकळे हवेशीर होते. जेवण यायला थोडा वेळ होता म्हणून प्रवासाचे सिंहावलोकन करत होतो. कोणते प्रसंग बेतले. आमच्या बरोबर घडलेल्या गमती आठवत असताना लक्षात आले. , आपण अनेक संकटाचा सामना केलाय.

अनेक कठीण चढाई पार केलीत. नेपाळ मध्ये कडाक्याच्या थंडीत बालकनीत झोपलो. म्हणजे अनेक विक्रम केलेत. तर मग उद्या प्रवासाचा शेवटचा टप्पा ही विक्रम करून पार करायचा, अशी कल्पना सुचली, व शिक्कामोर्तब केले. त्यासाठी एक दिवस जबलपूरलाच थांबून आराम करायचा असे ठरले. दरम्यान जेवण आले, जेवण घेत असतानाच वादळी चर्चा झाली. व कृती आराखडा तयार केला. पब्लिक टेलीफोन वरुन आम्ही दोन दिवसांनी नागपूरला पोहोचणार अशी सुचना दोन तीन घरी व कार्यकर्त्यांना दिली. आणी कार्यालयात वापस येऊन निद्राधीन झालो.

# भेडाघाटची सफर / विक्रमाची तयारी

बुधवार १९ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आम्ही जबलपूरला पोहोचलो असताना एक भन्नाट कल्पना सुचली ती कल्पना काय होती याची उत्सुकता आपणास असेलच म्हणून ते आपणास शेवटी सांगणार आहेच पण तत्पुर्वी आज चा दिवस कसा घालविला याचे वर्णन वाचून आपणास मजा येणार आहेच. आज आम्हाला सायकल न चालवता पब्लिक ट्रांॅन्सपोर्टने प्रवास करुन जवळचे प्रेक्षणीय स्थळ पाहायचे होते म्हणून नानाजी जवळ बोलून दाखवताच ते म्हणाले " ऐसा करो टेम्पो लेकर भेडाघाट चले जाव. जाते जाते " मदनमहल भी देख लेना " इससे अच्छा क्या है"

आम्ही ही भेडाघाट धबधब्याच्या प्रेमात पडलो होतो म्हणून तयार होऊन जबलपूरच्या बस स्टॅंडवर आलो. पहिले नास्ता करुन मोठे टेम्पो वाले उभे होते तिथे आलो. टेम्पोवाले " भेडाघाट भेडाघाट " असे ओरडत होते. आम्ही टेम्पो ठरवला. असे टेम्पो भिलाई द्रूग कडेही पुर्वी होते त्याला आम्ही डुक्कर म्हणायचो. त्यात आठ दहा लोक बसायची व्यवस्था होती. अश्याच एका टेम्पोत ४-५ लोक आधीच बसले होते. प्रवास भाडे देऊन टेम्पोत आम्ही चौघेही बसलो. थोड्याच वेळात

आणखी ४-५ लोक अजून बसलेत. आता टेम्पो चालू करा असे म्हटले तर टेम्पोवाला म्हणाला. " अभी तो आधा ही नही भरा " बैठो बैठो अभी निकलेगा ही " असे आम्हाला आश्वासन दिले. थोड्याच वेळात आणखी ७-८ लोक बसले आणी टेम्पो सुरु झाला. दाटीवाटीने बसण्याची सवय नसल्याने पुढे त्रास वाटायला लागला. मार्गात पून्हा तो हाक मारुन लोकांना बसवत असे. आम्ही मध्येच बसल्यामुळे उठता ही येत नव्हते. पण आपल्याला बसायला मिळाले याचे समाधान होते. बाकी तर लटकत, एक पाय बाहेर ठेवत चालले होते. किती लोक बसवले याचा अंदाज येईना. कसेबसे भेडाघाटला उतरलो तेव्हा बाहेर आलेले लोक मोजले ते अठ्ठावीस होते.

भेडाघाट ला नर्मदा माईचे दर्शन घेताच प्रवासाचा थकवा विसरलो. " धुवाधार " धबधबा पाहताच आनंद गगणात मावेना. मग काय नदी पात्रात उतरलो. सोबत स्नानासाठी कपडे आणले होतेच, मनसोक्त स्नानाचा आनंद घेतला. खरोखर नदी स्नानाचा आनंद वेगळाच असतो तो अन्य पाण्याने येत नाही. विहिर, तलाव, समुद्र वा घरातला नळ याने तो आनंद येत नाही. त्यासाठी नदीत डुबकी मारल्यावर जो ताजगी चा अनुभव येतो तो अवर्णणीय असतो. मनसोक्त स्नान करुन " धुवाधार " धबधबा खालच्या बाजूने पाहण्यासाठी नावेत बसून जायचे असे ठरवले व तशी नाव ठरवली. दर होता ३ रु. नाव सुरु झाली तसे नावाड्याने सांगितले " पाणीमे हात मत डालना, मगरमच्छ हात पकड लेगी. उसने अगर हाथ पकड लिया. तो नाव पलट जायेगी

और कोई नही बचेगा. यहा पाणी दो सौ फीट गहरा है. आमची सटारलीच आम्ही चुपचाप त्याची कॉमेंट्री ऐकत होते. मध्येच प्रदिप विचारत होता " भाईजी यहा कितना गहरा है " त्याचे उत्तर यायचे " साहब ३०० फिट " पुढे पुढे ते ४०० फिट, ६०० फिट असे सांगत असे. आम्ही आजूबाजूचे संगमरवरी दगडातील सौदंर्य पाहत धबधब्याच्या खालच्या बाजूला पोहोचलो. अहाहा! काय तो सुंदर जलप्रपात. जवळपास ५० फूट रुंद अशी धारा खाली कोसळत होती. आमच्या दोन्ही बाजूला उंचच उंच संगमरवरी पहाड व मध्ये पाणी पडण्याचा घनगंभीर आवाज असे मनोहारी दृश्य होते. धबधब्याचे तुषार अंगावर घेत थोडा वेळ थांबून परतलो.

आता भुक लागली होती. म्हणून जवळचे हॉटेल शोधून जेवण घेतले व टेम्पोपाशी आलो. आता ज्यात कमी माणसे बसली आहे असा टेम्पो शोधून त्यात बसलो. पून्हा १०-१२ माणसं बसल्यावर टेम्पो सुरु झाला. रस्त्यात पुन्हा माणसं बसवली. घाट सुरू झाला तसा टेम्पो वर चढेना. मग टेम्पो मधिल काही माणसे उतरून धक्का मारु लागले. आम्ही दाटीवाटीने बसलो होतो व हलताही येईना. आम्हीही उतरून धक्का मारु लागलो. कसाबसा भेडाघाट चढून वर आलो. काही माणसं रस्त्यात उतरत होती चढत होती. तासभराने टेम्पो बसस्टॅंडवर पोहचला. खाली उतरलो तेव्हा माणस मोजलेत ते ३२ होते. तिथून पायी चालत कार्यालयात पोहोचलो.

तर मंडळी कार्यालयात पोहोचताच आमची कल्पना श्री नानाजी देशपांडे यांना सांगितली. तर काय होती ती कल्पना ते आता सांगतोय

" आम्ही जबलपूर ते नागपूर हे २७५ कि. मी. अंतर चोवीस तास सतत सायकल चालवून नागपूर ला पोहचायचे असे ठरवले होते. "

आमची कल्पना ऐकून नानाजी हिंदीतच म्हणाले

" नेपाल जाकर आये हो, तो तुम्हारे लिये कुछ कठीण नही है. जरुर जाओ. कल सुबह मै तुम्हे जगाउंगा. लेकिन अभी थंड बहोत गिर रही है तो संभालके जाना. " नानाजी प्रोत्साहनाने आमची हिंमत वाढली त्या आनंदातच झोपी गेलो.

तर मंडळी उद्या वाचूया एका दिवसात २७५ कि. मी. कसे पार केले ती रोमहर्षक कथा **पुढील भागात**.

## **२७५ कि. मी. चा अविरत प्रवास**

गुरुवार दि. २० नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात जबलपूर भेडाघाट मध्ये घडलेल्या गमती जमती चा अनुभव घेतला

आज आपण जबलपूर नागपूर या २७५ कि. मी. हे अंतर एका दिवसात कसे पार केले याची थरारक कथा वाचणार आहोत.

आज अंधार पडण्याच्या आधी दोनशे कि. मी. अंतर पार करुन महाराष्ट्रात प्रवेश करणार असल्यामुळे एक वेगळाच उत्साह संचारला होता. पहाटे ३. ३० ला नानाजीनी उठवले. आम्ही प्रातःकर्म आटोपून तयार झालो. आज सकाळी खुप थंडी होती म्हणून ट्रॅक सुट वरुन लोकरीचे स्वेटर पायात बूट, कानाला मोठा पंचा बांधून सज्ज झालो. नानाजीनी गरम चहा करुन दिला. कुकुंमतिलक लावून पुढील प्रवासा साठी शुभेच्छा दिल्यात. आम्ही निरोप घेऊन निघालो तेव्हा रस्त्यावर कुत्री सोडता कुणीही दिसत नव्हते. थंडीने तर कहरच केला होता. शहरातून बाहेर पडे पर्यत तर जाणवले नाही पण मदनमहल परिसर पार करुन जेव्हा नर्मदा नदी पुलाजवळ आलो तर धुके इतके पडले होते की पाच फुटावरचे दिसेना. आम्ही टार्च सुरु केले तेव्हा नदी पूल पार करता आला. पुढे उजेडात बरगी घाट चढू लागलो. जबलपूर ते बरगी हे अंतर ३० कि. मी. होते पण जबरदस्त थंडीमुळे आमची वाट लागली होती.

खुप धिम्या गतीने घाट चढू लागलो पण हात पूरते गारठून गेले त्यामुळे सायकलचे हॅंडील निट पकडता येईना. शेवटी सायकल वरुन उतरलो व पायी चालू लागलो. जवळपास पंधरा कि. मी. पायी चाललो असू तेव्हा सकाळी सहा वाजता बरगी येथील ढाब्याजवळ पोहोचलो. ढाब्यासमोर शेकोटी पेटवून लोक हात शेकताना दिसले तसा जीवात जीव आला. सायकल उभी करुन हात शेकोटीवर धरले. अंदाजे एक तास आम्ही शेकोटीजवळ बसून होतो. तेव्हा हात पाय नाॅर्मल झाले. मग ढाब्यावर चहा घेऊन प्रवासाला सुरवात केली.

सुर्यनारायण देवाचे दर्शन झाले. जसजसे सुर्यदेव वर येऊ लागले तसा गारठा कमी होऊ लागला. त्यातच आम्ही धुमा घाट चढणे सुरु केले. पण घाट खुप तीव्र होता पार करुन धुमा गावात पोहचायला दोन तास लागले. आता शरीरात ऊर्जा येण्यासाठी काही खाणे आवश्यक होते म्हणून हॉटेल समोर थांबलो आतून पकोडे तळण्याचा सुंगध येत होता. सर्वांनी गरम पकोडे खाण्याचा आनंद घेतला व पून्हा चहा घेतला. आतापर्यंत तीनदा चहा झाला होता. पुढे लखनादौन गाठायचे होते. ऊन निघून तापायला सुरवात झाली होती. दुपारी ऊन व रात्री कडाक्याची थंडी अश्या वातावरणात प्रवास सुरु होता. दुपारी बाराचे सुमारास लखनादौन आले तेव्हा महामार्गावरील ते पुर्वीचे हॉटेल दिसले. नेपाळ कडे जाताना ज्या हॉटेल मध्ये जेवलो होतो. त्याच हॉटेल मध्ये प्रवेश केला.

आज दिवस भर सायकल चालवायची असल्यामुळे पोटभर न जेवता नास्ता करुन पुढे जायचे होते. " लखनादौन " म्हणजे खोव्याचे माहेरघर. उत्तम प्रतिचा खोवा मिळण्याचे प्रसिध्द ठिकाण. पूरी भाजी ची ऑर्डर दिली. आम्हाला पाहताच मालक उठून आमचे जवळ आले प्रेमाने

विचारपूस केली. आम्ही प्रवास पुर्ण करुन परत चाललो याचे त्यांना कौतुक वाटत होते. आमच्या साठी मिठाई मागवली. खाऊन झाल्यावर मात्र पैसे घेण्याचे नाकारुन म्हणाले " अगले समय मेरे हॉटेल मे आओगे तो जरुर लुंगा " खरोखर अशी प्रेमळ हृदयाची माणस मिळायला भाग्य लागतं. निरोप घेऊन मार्गस्थ झालो. आता लखनादौन छपारा हा घाट चढायचा होता. ऊन तापतच होते. थोडा उतार आला तेव्हा विरुध्द दिशेने चार पाच यूवक घाट चढत वर येत होते. सायकलवर सामान बांधलेले पाहून त्यांना हात दाखवून थांबविले.

सहजच शब्द निघाला " कहा जा रहे हो ?

" हम नेपाल जा रहे है. " आमच्या चेहऱ्यावर चमक आली. आमच्या सारखे आणखी कोणी प्रयत्न करतोय ऐकल्यावर खुप आनंद झाला.

कौन गाव के रहने वाले हो ? मी

" जलगाव महाराष्ट्र से युवक

" अरे मग मराठीच की, आम्ही पण काठमांडू वरुन परत येतोय. मी

" मग आम्हाला सांगा की कसे जायचे ". थोडक्यात त्यांना प्रवासाची माहिती सांगून निरोप घेतला व छपाराला पोहोचलो.

छपारात चहा पाणी घेऊन छपारा घाट चढायला सुरवात केली. छपारा घाट ही पार केला वैनगंगा नदीचा पुल पार करुन सिवनी शहरात प्रवेश केला तेव्हा साडे चार झाले होते. थंडीच्या दिवसात सुर्यास्त लवकर होत असल्याने चहा पाणी या साठी न थांबता अंधार होण्यापूर्वी घाट पार करुन जायचे होते. घाट उतरता उतरता अंधार झाला. अंधूक प्रकाशात खवासा हे गाव पार करुन महाराष्ट्राच्या सिमेत प्रवेश केला तेव्हा सायकल वरुन उतरून आनंदाने नाचलो ". भारत माता की जय, वंदे मातरम " अश्या घोषणा दिल्या. रस्त्यावरील माणसे काय झाले म्हणून पहायला लागली पण आम्ही आमच्याच धुंदीतच होतो.

आता संध्याकाळ चे सात वाजले होते. सकाळ पासून जेवण झाले नव्हते. जवळचा एक ढाबा गाठला. नेहमीप्रमाणे च विचारपूस झाली. त्यानंतर जेवायची ऑर्डर दिली. शांततेत गरमागरम जेवण झाले तेव्हा दुरवर काळोख पसरला होता. पुढचा प्रवास कसा करावा विचार होता. आकाशात चंद्राचे आगमन होईपर्यंत कुठेतरी वेळ काढणे आवश्यक होते. कारण खवासा ते मनसर पर्यत दाट जंगल होते. दाट सावलीमुळे रस्ता ही दिसत नव्हता. जंगली प्राण्यांची सुध्दा भिती होतीच म्हणून

जवळच आरटीओ च्या मानेगाव चेक पोस्ट वर माझे मित्र श्रीराम गोतमारे तैनात होते. त्यांची भेट घेण्यासाठी चेक पोस्ट वर पोहोचलो. इन्स्पेक्टर व सहकारी भेटलेत परिचय झाला. प्रवासाची माहिती ऐकून सारे प्रभावित होत म्हणाले. " काही वेळ इथेच थांबा, चंद्राचा उजेड येऊ द्या तरच तुम्ही सायकल चालवू शकाल. तोपर्यंत कॉफी बोलावतो. ती घेऊन मग च जा. " लगेच दोघांना मोटरसायकलवर रवाना केले.

रात्री चे दहा वाजले होते, चंद्रमा आकाशात येऊन छान चांदणे पडले होते. गप्पा रंगात आल्या ते अनेक प्रश्न विचारत होते आम्ही सांगत होते यात बराच वेळ गेला. तेवढयात कॉफी आली, ती घेऊन सर्वाचा निरोप घेतला. रात्रीचे अकरा वाजता पुन्हा प्रवास सुरू झाला. जंगलात रातकिडे व आम्हा चौघाचा आवाज येत होता. एखादी ट्रक जात असताना आवाज यायचा तेवढाच. डोळयांत झोप यायला लागली म्हणून हिंदी गाण्याच्या भेंड्या खेळायला सुरूवात केली. देवलापार आले. आमच्या जवळचा गाण्याचा स्टॉक संपला. मग मराठी गाणे सुरू झाले. शेवटी मराठी कविता श्लोक झाले. या कालावधीत तोतालाडोहचे गेट पार केले. पुढे धाबे पवनी चोरबाहूली हि गावे पार केली. कांद्री पार करुन मनसरला पोहोचलो तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. जयस्वाल चे हॉटेल मध्ये कोळश्याची भट्टी धगधगत होती. रात्री जाणाऱ्या ट्रक चालकासाठी एक कर्मचारी चहा तयार करुन देत होता. सर्वात आधी गारठलेले हात भट्टीवर शेकत बसलो. झोप येत होती म्हणून चहा घेतला. नागपूरला दिवसा उजेडी प्रवेश करायचा होता

म्हणून बराच वेळ थांबलो. चार वाजले तसे चंद्राचे प्रकाशात चालविणे सुरू केले. सकाळी सहा चे दरम्यान कन्हान नदी पार करुन कामठी शहरात प्रवेश केला.

आता इथेच थांबतो. नागपूर शहरात कसे स्वागत झाले याची उत्सुकता आपणास असेलच पण ते पाहू या **पुढील भागात**.

## नागपुरात भव्य स्वागत

शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर १९८६

कालच्या भागात आम्ही कामठी शहरात पोहचल्याचे सांगितले होते. कामठी शहरात प्रशांत रथकंठीवार यांचे काका व परिवार यांनी जोरदार स्वागत केले " युवाचेतना" या संस्थेने सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. या संस्थेने हार घालून सर्वांना भेटवस्तू दिल्यात गौरव पर भाषणे झालीत. अल्पाहाराची व्यवस्था केली. त्यांनतर निरोप घेऊन नागपूरकडे कुच केले. घर जसे जवळजवळ येते तशी उत्सुकता वाढत जाते कधी आपण आपल्या घरच्या लोकांना, मित्रांना भेटतो असे होऊन जाते. कामठी मार्गाने रिझर्व्ह बँक चौकात केव्हा पोहोचलो ते कळले नाही. सिव्हिल लाइन्स मार्गे अमरावती रोडवर येऊन लाॅ कॉलेज चौकात पोहोचलो तिथे दिनेश बक्षी, श्याम घरोटे, मोहन जोशी आदी मित्र स्वागतासाठी उपस्थित होते. गुलाल उधळला. हारतुरे घातलेत, गळाभेट झाली. संदल बँडचा गजर सुरु झाला. आम्ही पायी उतरुन चालायला लागलो. दोन दिवस आधी आम्ही येणार असल्याचे कळविले होते. तशी वर्तमानपत्रात बातमी आल्यामुळे अनेक मित्र भेटण्यासाठी उत्सुक होते. गुलाल लावून हार घालत, गळाभेट घेत होते. अनेक मित्र रॅलीमध्ये बँडचे तालावर नाचत होते. अनेक आमच्या मागे चालत होते. मोठा जनसमुदाय आमच्यामागे होता. लक्ष्मी भुवन

चौकात रॅली आली. हारतूरे घालत भव्य स्वागत झाले. गुलाल उधळत चालले होते सकाळी आठच्या दरम्यान रॅली शंकरनगर चौकात पोहोचली. पेट्रोल पंपासमोर भव्य शामीयाना उभारुन स्वागताची जय्यत तयारी केली होती. लाऊडस्पिकर वरुन आमचे आगमन झाल्याची घोषणा झाली. आमच्या स्वागतासाठी समाजातले प्रतिष्ठित मान्यवर हजर होते

त्यात नागपूर नागरिक सहकारी बँकेचे पुर्व अध्यक्ष अँड. अण्णाजी ऊधोजी. नागपूरातील ख्यातनाम बांधकाम व्यवसायी मा. प्रभाकरराव मुंडले अध्यक्ष स्थानी होते. डाॅ. काशीकर, प्रा. विजय डिडोळकर. ना. ना. बँकेचे जनरल मॅनेजर सुभेदार साहेब, शाखाधिकारी मारोडे साहेब. प्रा. अनिलजी सोले, राजन भुत, बाबा मैद, दिनेश फाटक, जयंत गर्गे, शिव अग्रवाल, राजवैद्य आदी खुप मोठा मित्र परिवार उपस्थित होता. या सर्वानी गळयात हार घालून स्वागत केले. सुवासिनीनी ओवाळले, गुलाल लावला. "हमलोग" या संस्थेतर्फे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आमचे कौतुक करण्यासाठी सर्वांचे माता पिता नातलग व धरमपेठ, शंकरनगर, शिवाजीनगर या परिसरातील शेकडो मित्र नागरिक हा सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते. सुरवातीला विजय डिडोळकर यांनी प्रास्तविक करुन आमच्या साहस यात्रेची माहिती दिली. मग अनेक मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला. अनेक संस्था सहभागी होत्या. साहस विरातर्फे मी संपूर्ण प्रवासाचे अनुभव कथन केले. आणि जेव्हा मी सांगितले की

काल सकाळ पासून जबलपूर ते नागपूर हा २७५ कि. मी. प्रवास कुठेही मुक्काम न करता अविरत सायकल चालवत इथे पोहोचलो आहे तेव्हा प्रचंड टाळ्यांचा कडकडाट झाला.



मान्यवरातर्फे श्री अण्णाजी ऊधोजी यांनी कौतुक केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रभाकरराव मुंडले म्हणाले "आज या साहसविरांनी एवढा मोठा प्रवास करुन आपल्या नागपूरचा व या परिसराचा गौरव वाढविला आहे. नेपाळ सारख्या दुर्गम पहाडी भागात सायकल चालवून नवा किर्तीमान स्थापीत केला आहे. यापुढे ही या परिसरातील वीर साहस यात्रा काढतील त्यांना "हमलोग " ही संस्था सर्वोतपरी मदत करेल असे जाहीर आश्वासन दिले.





कार्यक्रम संपल्यावर सर्वाना पेढे वाटलेत. प्रत्येक मित्र अभिनंदनासाठी येऊन गळाभेट घेत होता. जेष्ठ नागरीक जवळ येऊन अभिनंदन करत होते. आम्ही आमचे माता पिता व मान्यवर जेष्ठ नागरिकांच्या पाया पडलो. मित्र परिवाराने आग्रह धरला गळ्यातले हार काढू नका. आम्ही संदल च्या जयघोषात घरी पोहचवू त्याप्रमाणे सर्वांना घरी पोहचवून निरोप दिला.

List of places visited during cycle yatra

1. Seoni M.P.
2. Bhedaghat Jabalpur m.p.
3. Katni
4. Maihar Shardadevi Mandir
5. Rewa ( M.P.)
6. Prayagraj (U.P.) Allahabad
7. Varanasi( U.P)
8. Gorakhpur
9. Butwal ( Nepal)
10. various Places of Kathmandu

    including Pashupatinath Mandir ,Old Buddha sthupa, New Road ,Swayambhunath Mandir Etc

11. Ayodhya city Ram janmabhoomi
12. Lucknow

## ऋणनिर्देश

हि सायकल यात्रा सफल होण्यासाठी सर्वप्रथम आमचे माता पिता यांनी परवानगी देऊन भक्कम पणे पाठीशी उभे राहीलेत. माझे बँक व्यवस्थापनाने रजा मंजूर करुन सहकार्य केले. अधिकारी सहकारी कर्मचारी यांनी प्रोत्साहन दिले. असंख्य मित्र सत्कार सोहळा अनुभव करण्यासाठी आले होते अनेक संस्था सन्मित्र सभा, रोटरी क्लब हमलोग. मा. दत्ताजी डिडोळकर, गजाननराव बापट आदी असंख्य लोकांनी सहकार्य केल्यामुळे आमचा सायकल प्रवास यशस्वी होऊ शकला. त्या सर्वांचे मी आभार मानतो व या लेखमालेचा समारोप घेतो.

दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

## सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं

सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला..." सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com